|| श्री गणेशाय नमः ||

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078


रुक्मिणी स्वयंवर
अमोल
प्रकाशन

श्री संत एकनाथ महाराज विरचित

# ।। रुक्मिणी स्वयंवर ।।।

संपादक

(विद्यावाचस्पती) डॉ. ज्ञानेश्वर तांदळे

एम.ए., पीएच.डी. (मराठी), पंडित व आचार्य (हिंदी)

For Hariom Astrologers

Proprietor

मूल्य : ६० रुपये

अमोल प्रकाशन, पुणे ३०.

गुरुकृपा धार्मिक ग्रंथ भांडार
सर्व पुजा साहित्य उपलब्ध
फोन : 24710817 मोबा. : 9969107980, 9892570177

सर्व व्यक्तिरेखांच्या माध्यमातून पुनः पुनः श्रीकृष्णस्तुती केली आहे.
कथा अंगांना रूपके जडवीत कथानिवेदन करण्याचा नाथांचा छंद आहे. पौराणिक कथेच्या निवेदनातून

- **प्रकाशक**

  संजय शिवाजीराव काकडे

  अमोल प्रकाशन

  १३२४, सदाशिव पेठ,

  भरत नाट्य मंदिराजवळ, पुणे ४११ ०३०.

  फोन : (०२०) २४४३३९९०, २४४३३९९१

- **प्रथमावृत्ती :**

  श्रावण शुद्ध प्रतिपदा शके १९२३

  २१ जुलै २००१

  **नवीन आवृत्ती :**

  २०२२

- **अक्षरजुळणी**

  'अक्षरवेल'

  का. वि. शिगवण

  सी १८, प्लॉट नं. ५७२,

  स. नं. १२९, दत्तवाडी, पुणे ३०.

- **मुद्रक :**

  श्री शिव समर्थ प्रिंटर्स

  धायरी, पुणे.

- **मुखपृष्ठ**

  रमेश भारताल




# ॥ प्रस्तावना ॥

संत एकनाथ महाराजांनी विपुल ग्रंथलेखन केले. त्यांनी आपल्या आख्यान काव्यात 'रुक्मिणी स्वयंवर'चा कथाभाग श्रीमद्‌भागवताच्या चौकटीत बसविला आहे. नाथांनी 'रुक्मिणी स्वयंवर' या कथेला वारकरी संप्रदायाभिमुख बनविले. नाथांच्या अंतःकरणात कोणत्याही प्रकारचे द्वैत नव्हते. त्यामुळे रुक्मिणी स्वयंवर अंतर्बाह्य अद्वैत विचाराने व्यापलेले आहे. त्यांच्या निरूपणाचे लक्ष्य पूर्णतः जीवशिव ऐक्य हे आहे.

'रुक्मिणी स्वयंवर' आख्यानकाव्य जेवढे कथानिवेदनपर तेवढेच तत्त्वज्ञाननिरूपणपर बनलेले आहे. अनेक वेळा नाथांचे तत्त्वचिंतन प्रमुख ठरून त्यांचे कथानिरूपण दुय्यम ठरू लागते. जनार्दन स्वामी हे नाथांचे लौकिक गुरू आहेत, तसेच संत ज्ञानेश्वर महाराज हे मानसिक गुरू आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या 'ज्ञानेश्वरी'चे नाथांनी अनेक वेळा सखोल वाचन व चिंतन केले होते.

व्यक्तिचित्रण हे नाथप्रतिभेचे 'रुक्मिणी स्वयंवरा'त जाणवणारे एक सामर्थ्यस्थळ आहे. ही स्वयंवर कथा श्रीकृष्ण व रुक्मिणी या दोन व्यक्तिरेखांवर तोललेली आहे. श्रीकृष्ण व रुक्मिणी यांची व्यक्तिचित्रे नाथांनी उत्तमप्रकारे रेखाटली आहेत. तसेच युद्धवर्णनेही नाथांनी लिहिली आहेत. नाथांच्या 'रुक्मिणी स्वयंवरा'तील अनेक प्रकारच्या व्यक्तिरेखा श्रीकृष्णाभिमुख असून त्या श्रीकृष्णाचे स्तवन करू लागतात. सर्व व्यक्तिरेखांच्या माध्यमातून पुनः पुनः श्रीकृष्णस्तुती केली आहे.

कथा अंगांना रूपके जडवीत कथानिवेदन करण्याचा नाथांचा छंद आहे. पौराणिक कथेच्या निवेदनातून

समकालीन वास्तवातील सामाजिक जीवनाच्या अनेक गोष्टींचा मागोवा घेत त्याचे रूपाकार टिपण्याचा नाथांचा छंद आहे. नाथ या रचनेतून स्वकालीन सामाजिक, धार्मिक व कौटुंबिक जीवनाचे संदर्भ आपल्या कथेमागे उभे करतात. अधूनमधून विनोदाची निर्मिती करून लोकांना जागृत करतात.

'रुक्मिणी स्वयंवर' ग्रंथात एकूण १२ अध्याय आहेत व त्यातील सार पुढीलप्रमाणे आहे.



**प्रसंग १ – भीमकाचा निर्णय**

रुक्मिणी विदर्भराजा भीमक व शुद्धमती यांची कन्या. ५ पुत्रांनंतर झालेली ही कन्या. वसुदेव व देवकी यांचा पुत्र श्रीकृष्ण याच्या रूपगुणांची कीर्ती सर्वत्र पसरली होती. रुक्मिणीने ही कीर्ती ऐकली होती. त्यामुळे तिने मनानेच श्रीकृष्णाला वरले होते.

**प्रसंग २ – रुक्मीचा स्वयंवरास विरोध**

भीमकाचा ज्येष्ठ पुत्र रुक्मी हा श्रीकृष्णाचा द्वेष करीत असे. त्याने शिशुपाल यास रुक्मिणी देण्याचे ठरविले. शिशुपाल सुद्धा श्रीकृष्णाचा द्वेष करीत असे. हा बंधूचा बेत पाहून रुक्मिणी घाबरली आणि तिने सात श्लोकांचे पत्र सुदेव ब्राह्मणाकडून श्रीकृष्णास पाठविले.

**प्रसंग ३ – सुदेव श्रीकृष्णाकडे आले.**

सुदेव ताबडतोब श्रीकृष्णाकडे आले. त्यांनी श्रीकृष्णास पत्र दिले. भीमकाची व शुद्धमतीची इच्छा प्रगट केली. रुक्मीचा विरोध सांगितला. शिशुपालबरोबर रुक्मिणीचा विवाह होत असल्याचे सांगितले.

**प्रसंग ४ – रुक्मिणीचे पत्र**

श्रीकृष्णाने ते पत्र सुदेवासच वाचावयास सांगितले. त्यात लिहिले होते, आपले रूपगुण हे अलौकिक



आहेत. त्याच्या श्रवणाने त्रिविध ताप नाहीसे होतात. तुमच्या ठायी माझे चित्त जडले आहे. मी अंबा पूजा दर्शनासाठी जाईन. तेथून आपण मला घेऊन जावे.



**प्रसंग ५ – श्रीकृष्ण रथ घेऊन निघाला.**

श्रीकृष्ण शस्त्रसंभार घेऊन रथातून निघाले. पाठोपाठ बलरामही सैन्य घेऊन निघाला. इकडे रुक्मिणीचा हळदी समारंभ चालला होता. रुक्मिणी सुदेवाची वाट पहात होती. येवढ्यात तिला सुदेव आलेला दिसला.

**प्रसंग ६/७ – श्रीकृष्णाचे आगमन**

भीमकाने श्रीकृष्ण, बलरामाचे स्वागत केले. ते पाहून रुक्मी, जरासंध व शिशुपाल हे घाबरले.

शुद्धमतीने श्री अंबादर्शनाची आठवण केली पण रुक्मीने जाण्यास मनाई केली. परंतु रुक्मिणी नटून थटून देवदर्शनास निघाली. संरक्षणासाठी रुक्मीने काही सैन्य पाठविले. रुक्मिणी मंदिरात आली. अंबेची यथासांग पूजा झाली. देवीने गळ्यातील माळ तिच्या हाती टाकून उजवी दिली. ही माळ कृष्णास घालूया असे रुक्मिणीने मनात योजिले.

रुक्मिणी मंदिराच्या बाहेर आली. श्रीकृष्ण बाहेर उभा होता. त्याने सर्व सैन्याला जखडून ठेवले आणि रुक्मिणीला रथात घेऊन तो यादवांत आला. रुक्मिणीने श्रीकृष्णाच्या गळ्यात माळ घातली आणि स्वयंवर संपन्न झाले.

**प्रसंग ८ – दोन्हीकडील सैन्य लढू लागले.**

सैन्य शुद्धीवर आले. रुक्मी, जरासंध आले. त्यांनी श्रीकृष्णाला लढाईसाठी हाक मारली. यादवांचे सैन्यही युद्धास तयार झाले. बलराम युद्ध करण्यास आला.

### प्रसंग ९ – रणसंग्राम सुरू झाला.

बलराम सैन्याला मारू लागला. त्या वेळी जरासंध धावून आला. कृतवर्मा व पौंड-काचे युद्ध सुरू झाले. अनेक रथ मोडले गेले. अनेक हत्ती मारले गेले. नंतर केशिक, गवेषण व बलराम युद्ध सुरू झाले.

### प्रसंग १० – गवेषणाचा पराजय.

गवेषणाने अनेकांचा पराभव करण्यास सुरवात केली. गवेषणाने सारणास मूर्च्छित केले. इकडे बलराम व केशिक लढत होते. केशिकचा पराभव करून बलराम गवेषणाबरोबर लढू लागला. बलरामाने त्याचे सैन्य मारले. गवेषण पळून जाऊ लागला.

### प्रसंग ११ – यादवांचा विजय झाला.

सात्विकाने वक्रदंताचा पराजय केला, त्याला पळवून लावले. गद व जरासंधाचे युद्ध सुरू झाले. तो गदाकडे पाठ करून पळू लागला. त्यामुळे त्याचे सर्व सैन्यही पळू लागले. त्यामुळे यादव विजयी झाले.

### प्रसंग १२ – शिशुपाल व रुक्मीची दैन्य अवस्था

श्रीकृष्ण रुक्मिणीला घेऊन गेला. शिशुपालची दैन्य अवस्था झाली. त्याची आई श्रुतश्रवा रडू लागली. तो लढाईसाठी सैन्य घेऊन निघाला. वाटेमध्येच जखमी जरासंध भेटला. त्याने शिशुपालला सारी हकिगत सांगून परत फिरविले.

रुक्मी अतिशय संतापलेला होता. तो सैन्य घेऊन युद्धास निघाला. त्याने श्रीकृष्णावर अनेक प्रकारची अस्त्रे टाकली, परंतु श्रीकृष्णाने ती तोडून टाकली. अनेक मोठमोठ्या योद्ध्यांचा श्रीकृष्णाने पराभव केला.





### प्रसंग १३ – बलरामाचा रुक्मिणीस उपदेश

युद्धातून रुक्मीचे अनेक सैन्य पळून गेले. यादवांना विजय प्राप्त झाला. रुक्मीची अवस्था पाहून बलरामने त्याला सोडून दिले. रुक्मिणीस बलरामाने उपदेश केला. तुझ्या भावाची अवस्था श्रीकृष्णाने जी केली, ती योग्यच आहे. श्रीकृष्णचरण प्राप्त झाल्यानंतर तुझे सर्व प्रकारचे द्वैत संपले पाहिजे. आता श्रीकृष्णाशी एकरूप हो.

### प्रसंग १४ – विवाहसमारंभ

सर्व हकीगत भीमकास कळली. तो प्रभासला आला. त्याने श्रीकृष्णास नमस्कार केला व सांगितले, "कुंडिनपुरास आपण विवाह समारंभास यावे." बलरामासही बोलाविले. परंतु रुक्मिणीच्या सांगण्यावरून तेथेच विवाह संपन्न करण्याचे ठरविण्यात आले. शुद्धमतीने कुंडिनपुराहून सर्व विवाह साहित्य आणले. श्रीकृष्णाने वसुदेव, देवकी व उग्रसेन यांना बोलाविले. सर्वांनी मिळून भोजन केले.

### प्रसंग १५ – लग्नसमय

श्रीकृष्णाने मुहूर्तमणी ओविला आणि सगळे नटून-थटून वसुदेव-उग्रसेनसह वधूमंडपाकडे वाजतगाजत निघाले. रुक्मिणी नटून-थटून सज्ज झाली. श्रीकृष्ण मंडपात आला. मधुपर्कपूजन सिद्ध झाले.

### प्रसंग १६ – विवाहसंभ्रम

ब्राह्मणांनी मंत्रानी भीमकीच्या डोक्यावर अक्षता घातल्या. भीमकीला अंतरबाह्य सर्वत्र श्रीकृष्ण दिसू लागला. श्रीकृष्ण-रुक्मिणीचा विवाह संपन्न झाला. विवाह होम, पाणिग्रहण झाले. रुक्मिणी श्रीकृष्णाचे

चरणास वंदन करू लागली परंतु तिला पायच कोठे दिसेनात. नंतर श्रीकृष्णाचे चरणकमलांना वंदन केले आणि दोघे एकरूप झाले.

**प्रसंग १७ – घेंडानृत्य**

बोधाने श्रीकृष्णास व देहाभिमानाने नोवरीस खांद्यावर घेऊन नाना प्रकारचे नृत्य केले. नंतर भीमकाकडील अनेक कुलदेवतांची नृत्ये झाली.

**प्रसंग १८ – द्वारकेत गृहप्रवेश**

श्रीकृष्णास नाना वस्तू आंदण देऊन भीमक निघाले. इकडे द्वारकेस जाण्यास वरात निघाली. सर्व श्रृंगारले होते. विधीपूर्वक लक्ष्मीपूजन झाले.

संत एकनाथ महाराजांनी हे सर्व प्रसंग उत्तम तऱ्हेने रंगविले आहेत. या ग्रंथाचे अनेक कुमारिका पारायण करतात.या ग्रंथाचे पारायण केल्याने विवाह लवकर होण्यास मदत होते असा अनेक मंडळींचा अनुभव आहे.

या ग्रंथातील जीवा-शिवाचे मीलन समजून घ्यावे. अंत:करणातील सर्व प्रकारचे द्वैत नाहीसे करावे आणि सर्वांवर नि:स्वार्थ प्रेमाचा वर्षाव करून आनंदाने जीवनाची वाटचाल करावी.

अमोल प्रकाशनने हा ग्रंथ प्रसिद्ध केल्याबद्दल श्री संजय काकडे यांचे आभार.

दिनांक :

**ज्ञानेश्वर तांदळे**
२०५ नवी सदाशिव पेठ, पुणे ३०
फोन ४३३५१२०





# ❁ रुक्मिणी स्वयंवर ❁

## ॥ प्रसंग पहिला ॥

**श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ ॐ नमोजी कृष्णनाथा । गणेशसरस्वती नामें धरिता । तूंचि तूं कुळदेवता । कवणा आतां मी प्रार्थूं ॥१॥ तूंचि अखिल अवघे जन । सहज गुरु तूं जनार्दन । कृष्णकथेसी लावी मन । नित्यात्मगुण गावया ॥२॥ ऐकतां कृष्णकथाश्रवण । तेणें चित्तवृत्ति वेधली जाण । कर्माकर्मी अखंडपण । लागलें ध्यान भीमकीसी ॥३॥ शुकयोगींद्राप्रती प्रश्न करी परीक्षिति । भीमकीहरण श्रीपती । काय निमित्तीं पैं केलें ॥४॥ का करितोसी म्हणसी प्रश्न । तरी मी त्यक्तोदक जाण । वदें कथामृत श्रवण । तें जीवन मज तुझेनि ॥५॥ विशेष हें कृष्णचरित्र । तुझेनि शुद्धमुखें पवित्र । श्रवण करितां माझे श्रोत्र । अधिकाधिक भुकेले ॥६॥ इतर कथा नव्हे फुडी । नित्य नूतन इची गोडी । सेवूं जाणती आवडी । ते परात्परथडी पावले ॥७॥ देखोनि प्रश्नाचा आदर । शुक कथेसी झाला सादर । कैसा वचन बोलिला गंभीर । कृपा अपार रायाची ॥८॥ ऐक बापा परीक्षिती । तूं तंव सुखाची सुखमूर्ती । भीमकीपाणिग्रहणस्थिती । यथानिगुती सांगेन ॥९॥ अगा वसुदेवाचिये तप:प्राप्ती । श्रीकृष्ण देवकीउदरा येती । कृष्णाची जे कृष्णशक्ती । जालो उतरती भूमंडळीं ॥१०॥ कनकासवें जैसी कांती । सूर्यासवे जैसी दीप्ती । तैसी अवतरली कृष्णशक्ती । विदर्भदेशी रुक्मिणी ॥११॥ जैसा मूर्तिमंत विवेक । तैसा जाण राजा भीमक । सत्त्वाथिला**

अतिसात्त्विक । निष्कलंक शोभत ॥१२॥ श्रद्धा पत्नी शुद्धमती । झाला गर्भातें धरिती । तेथें जन्मली कृष्णशक्ती । चिच्छक्ती रुक्मिणी ॥१३॥ नवविधा तेचि नवमास । गर्भा भरले पूर्ण दिवस । साङ्ग जन्मली रूपस । नवनिधान रुक्मिणी ॥१४॥ पांचां विषयांचे शेवटीं । सुबुद्धी उपजे गोमटी । तैसी पांचांहूनि धाकुटी । जाहली गोरटी रुक्मिणी ॥१५॥ जेंहूनी जन्मली कुशीं । तैंहूनि आवडे रायासी । अमान्य करुनि पांचांसी । तेचि एकी पढियंती ॥१६॥ स्वरूपरूपें अति सुंदर । लावण्यगुणें गुणगंभीर । दिवसेंदिवस जाहली थोर । वरविचार रायासी ॥१७॥ तेथें कीर्तिनामा ब्राह्मण । रायापाशीं आला जाण । तेणें कृष्णकीर्तन । तेथें तनमन वेधलें ॥१८॥ बसली होती रायापाशी । सादर देखोनि भीमकीसी । मग वर्णिलें कृष्णरूपासीं । चित्स्वरूपेसी साकार ॥१९॥ जो निर्गुण निर्विकार । जो निष्कर्म निरुपचार । तोचि जाहला जी साकार । लीलाविग्रही श्रीकृष्ण ॥२०॥ अतिसुरंग चरणतळें । उपमें कठिण रातोत्पलें । बालसूर्याचेनि उजाळें । तैसीं कवळें टांचांचीं ॥२१॥ ध्वजवज्रांकुशरेखा । चरणींचीं सामुद्रिकें देखा । न वर्णवती सहस्रमुखा । ब्रह्मांदिकां अलक्ष्य ॥२२॥ पिळूनि इंद्रनीळकिळी । वोतली कृष्णतनु सांवळी । पाउले सुकुमार कोंवळीं । घोटीं निळीं दोहीं भागीं ॥२३॥ सुनीळ नभाचिया कळिका । तैशा आंगोळिया देखा । वरी नखें त्या चंद्ररेखा । चरण पीयूषा लुब्धल्या ॥२४॥ सांडूनि कठिणत्वाचें डिंभ । सचेतन मर्गजस्तंभ । तैसे चरण जी स्वयंभ । श्रीकृष्णशरीरीं शोभती ॥२५॥ कृष्णअंगा जडलेपणें । विजूसी पुट आलें चौगुणें । विसरली अस्तमाना जाणें । पीतांबरपणें कांसेसीं ॥२६॥ कृष्णचरणींचीं भूषणें । वांकीने वेदांसी आणिलें उणें । ते तंव





धरूनि ठेलें मौनें । कृष्णकीर्तनें हे गर्जे ॥२७॥ सोहंभावाचेनि गजरें । चरणीं गर्जती नेपुरें । मुमुक्षूचें मन निदसुरें । त्यातें चेइरें करीतसे ॥२८॥ तोडर गर्जे कवणे मानीं । जन्ममरणें हरिचरणीं । नाहीं उपासकालागोनी । संकल्प विकल्प गेलिया ॥२९॥ अनंत रूप नाकळे वेदीं । तें आकळी जेवीं सद्बुद्धी । तैशी मेखला माजामधीं । चिद्रत्नसंधी जडली असे ॥३०॥ स्वपदा पावलियापाठीं । जेवीं वृत्ति होय उफराटी । तैशा किंकिणी क्षुद्रघंटी । अधोमुख मेखलेशीं ॥३१॥ अतिशयेंसी माजू साना । होता अभिमान पंचानना । देखोनी श्रीकृष्णमध्यरचना । लाजोनि राना तो गेला ॥३२॥ पहावया कृष्णमध्यरचना ॥ चित्रींचीं लेपें जाहलीं जाणा । सांडूनि अंगींच्या अभिमाना । मेखले खेवणा स्वयें जडिले ॥३३॥ नाभीशीं नाभी नाभिता । देऊनि स्थापिला विधाता । तेथींचा तो पार पाहतां । विधाता पैं नेणेचि ॥३४॥ म्हणोनि पद्मनाभी नांवा । उदरीं त्रैलोक्याचा सांटोवा । जेवीं सागरामाजी ठेवा । तरंगांचा पैं केला ॥३५॥ सागरीं लहरीची नव्हाळी । तैसी उदरीं त्रिगुणत्रिवळी । कर्माकर्म रोमावळी । बहिर्मुखें वाढलिया ॥३६॥ नकळे हृदयींचें महिमान । उपनिषदां पडलें मौन । तेथेंही संचरले सज्जन । देहाभिमान सांडोनी ॥३७॥ शून्य सांडोनि निरवकाश । तेंचि कृष्णहृदय सावकाश । संतीं केला रहिवास । वृत्तिशून्य होऊनि ॥३८॥ तया पदीं जे सुलीन । तेचि जडित पदक जाण । मुक्त मोतिलग संपूर्ण । गुणेंविण लेइलासे ॥३९॥ ज्ञानवैराग्य शुक्तिसंपुटीं । निपजलीं मुक्त मोतियें गोमटी । तेचि एकावळी कंठीं । श्रीकृष्णाचे शोभत ॥४०॥ जनविजन समान कळा ॥ तेचि आपाद वनमाळा । शांति निजशांति निर्मळा । रुळे गळां वैजयंती ॥४१॥ ओंकार मातृकांसकट ।

ताच जाणावा कंबुकंठ। तोचि वेदांचे मूळपीठ। तेथूनि प्रगटे त्रिकांडी ॥४२॥ खणोनि उपनिषदांची खाणी। अर्थ काढिला शोधूनि। तोचि कंठीं कौस्तुभमणी। निजकिरणीं झळकत ॥४३॥ गगनगजाचे शुंडादंड। तैसे सरळ बाहुदंड। पराक्रमें अतिप्रचंड। अभयदानीं उदित ॥४४॥ पंचभूतें भिन्नभिन्न। तैसा आंगोळिया जाण। तळहात तो अधिष्ठान। पांचही मिळती एकमुष्टी ॥४५॥ चहूं खाणीं क्रियाशक्ती। त्या चारी भुजा शोभती। आयुधें वसविली हातीं। कवणे स्थिती पाहा पां ॥४६॥ अत्यंत तेजें तेजाकार। द्वैतदलनीं सतेज धार। तेंचि धगधगती चक्र। अरिमर्दनीं उद्भट ॥४७॥ घायें अभिमान करी चेंदा। तेंचि झळकत पैं गदा। निःशब्दीं उठवी शब्दा। वेदानुवाद पांचजन्य ॥४८॥ अभेदभक्त मज भेटती। तेव्हां सुमनें कैंची मिळती। त्यांचिये पूजेलागी हातीं। हृदयकमळ वाहतसे ॥४९॥ बाहुवटे कीर्तिमुखें। चारीं वेद जाहले सुखें। करीं कंकणें जडित माणकें। वार्तिकांत वेदांत ॥५०॥ यंत्रउभवणी उपासकां। त्याचि आंगोळीयां मुद्रिका। त्रिकोण षट्कोण कर्णिका। जडित माणिका आगमोक्त ॥५१॥ पूर्वोत्तरमीमांसा दोनी। कुंडलें जाहलीं कृष्णकर्णी। तीं उपनिषदर्थकिरणीं। झळकताती सतेज ॥५२॥ एक म्हणती साकार। एक म्हणती निराकार। परी साकार ना निराकार। श्रवणें विकार मावळती ॥५३॥ गाळोनियां मोक्षसुख। तेथींचा मुसावोनि हरिख। तेंचि कृष्णाचें श्रीमुख। नित्य निर्दोष मिरवत ॥५४॥ उपमे चंद्रकळा गहन। तो तंव कृष्णपक्षीं क्षीण। उदय अस्ताविण संपूर्ण। वदनेंदु कृष्णाचा ॥५५॥ उपमेरहित हनुवटी। पाहतां प्रेम दुणावे पोटीं। त्रैलोक्यसौंदर्य एकवटी। दाविताहे दृष्टी निमासुरा ॥५६॥ जीवशिव एकाकार। तैसे मीनले





दोन्ही अधर। माजी दंतपंक्ती तेजाकार। चिदानंदें झळकती ॥५७॥ नास्तिका देऊनि नास्तिक। उंचावलें तें नासिक। पवन हिंडता पावला दुःख। कृष्णश्वासें सुखी जाला ॥५८॥ विशाळ डोळे चैतन्यपणें। तेथें विसावों आले पाहते पाहणें। आपआपणिया देखणें। सबाह्याभ्यंतर समदृष्टी ॥५९॥ ज्ञानअज्ञानांचीं पातीं। मिथ्यापणें लवत होती। तेहीं सारूनि मागुती। सहजस्थिती पहातसे ॥६०॥ अधिष्ठान विशाळभाळीं। तैसी शोभा कपाळीं। सच्चिदानंद एकमेळीं। तोच त्रिवळीं ललाटीं ॥६१॥ उगाळूनि अहंपण। सोहं काढिलें शुद्धचंदन। तेंही केलें कृष्णार्पण। निजभाळीं मळवट ॥६२॥ सपूर गगनांकुर सरळ। तैसीं मस्तकीं केश कुरळ। कृष्णमुखेंसी विन्मुख सबळ। अधोगती धांविन्नलें ॥६३॥ म्हणोनि ऐक्याचिये मुष्टी। आणुति बांधिलें वीरगुंठीं। सहज भावाचिये मुगुटी। मग दाटलें सुबुद्ध ॥६४॥ तया मुगुटा-तळवटीं। मुक्तमयूरपिच्छा वेंटी। कैसी शोभताहे गोमटी। दृश्यदृष्टीं अतीत ॥६५॥ सलोक सरूप समीपता। तें तंव सांडी पिसें सर्वथा। देखणेंपणेंविण डोळसता। तेचि माथां स्तबक ॥६६॥ अलंकारामाजी आवडी। तेथें कृष्णासी अधिक गोडी। तेंचि सांगू विसरली फुडी। चुकी गाढी पडियेली ॥६७॥ सकळ भूषणांमाजी भूषण। ब्राह्मणाचा दक्षिण चरण। हृदयीं वाहे नारायण। श्रीवत्सलांच्छन गोविंद ॥६८॥ श्रीकृष्णाची कृष्णमूर्ती। लावण्य आलें त्रिजगतीं। बरविया बरवा श्रीपती। वाचा किती अनुवादों ॥६९॥ जें जें अत्यंत सुंदर दिसे। तें ते कृष्णाचेनि लेशें। डोळियां तेणें लाविलें पिसें। जालीं मोरपिसें हरिअंगीं ॥७०॥ सौंदर्याचा अभिमान। मदनाआंगी संपूर्ण। तेणें देखोनिया श्रीकृष्ण। स्वदेहासी विटला ॥७१॥ मदनें कृष्ण देखिला साङ्ग। अंग

जाळूनी जाला अनंग। पोटी येऊनियां चांग। उत्तमांग पावला ॥७२॥ बरवेपणें मीच मोठी। हें होतें लक्ष्मीचे पोटीं। कृष्ण देखोनियां दृष्टी। तेही उफराटी जाहली ॥७३॥ रूपा भाळोनिया कैसी। रमा झाली परम पिसी। लक्ष्मी नावडे देवासी। जाली दासी पायांची ॥७४॥ कृष्ण देखिला जिये दृष्टी। ते परतोनि मागुती नुठी। अधिकाधिक घाली मिठी। होय तल्लीन हरिरूपीं ॥७५॥ कृष्ण पहावयाच्या लोभा। नयनीं नयनासी निघती जिभा। श्रवणी श्रवणासी वल्लभा। अभिनव शोभा कृष्णाची ॥७६॥ कृष्णरस जे सेवित। तयांसी फिकें होय अमृत। अमर अमृतातें सेवित। तेही चरफडित। हरिरसा ॥७७॥ श्रिया वाखाणितां अमरेंद्र। कृष्ण इंद्राचाही इंद्र। क्षय पावती इंद्र चंद्र। कृष्ण नरेंद्र अक्षयी ॥७८॥ असुर सुरां उत्थापिती। ते गाऱ्हाणें हरीसीं देती। इंद्र चंद्र प्रजापती। तेही चरफडती हरिपदा ॥७९॥ ते वेळीं कृष्णनाथ। कंस केशिया करी घात। देवा निजपदीं स्थापित। अमरनाथ श्रीकृष्ण ॥८०॥ कृष्णऐसा त्रिशुद्धी। उदार न देखों स्वात्मबुद्धी। सेवकां बैसवी निजपदीं। अक्षय सिद्ध देऊनियां ॥८१॥ जे नेदी देवकीयशोदेसी। ते गति दिधली पूतनेसी। समान येणें अरिमित्रांसी। उदारतेसी काय वानूं ॥८२॥ निजपदातें श्रीकृष्णनाथ। सद्भक्तांसी आपण देत। आपण होय भक्तांकित। राहे तिष्ठत तयांपासी ॥८३॥ भक्तआज्ञा मानी मोठी। सिंह सूकर होय जगजेठी। प्रकटला कोरडिये काष्ठीं। वचनासाठीं भक्ताच्या ॥८४॥ ऐसा धीरवीर उदार। गुणागुणी गुणगंभीर। पृथ्वीवरी यदुवीर। दुजा नाहीं सर्वथा ॥८५॥ कृष्णचरणींचा आराम। पाहातां विसरें क्रियाकर्म। समाधी तेथे विश्राम। मनोरम हरिपदीं ॥८६॥ कृष्णरूपाची प्राप्ती। भीमकी सादर श्रवणार्थी। हृदयीं आविर्भवली





मूर्ती। बाह्यस्फूर्ति मावळली ॥८७॥ आंग जाहलें रोमांचित। कंठी बाष्पें पैं दाटत। शरीर चळचळां कांपत। पडे मूर्च्छित धरणीये ॥८८॥ एक म्हणती धरा धरा॥ एक पल्लवें घालिती वारा। एक म्हणती हे सुंदरा। कृष्णकीर्तनें झडपलीं ॥८९॥ भक्तीपाशीं भावना जाये। तैसी धांविन्नली धाये। झणी दृष्टी लागेल माये। म्हणोनि कडिये घेतली ॥९०॥ रायासी कळलें चिन्ह। ईस जाहले कृष्णश्रवण। तेथेंचि वेधलें असे मन। कृष्णार्पण हे करावी ॥९१॥ मनीं धरोनि हाचि भाव। अंत:पुरा आला रावो। रुक्मिणीसी कृष्णनाहो। राणिये रावो पुसतसे ॥९२॥ मग बोलली शुद्धमती। हेंचि होतें माझिये चित्तीं। कन्या अर्पावी श्रीपती। पुण्य त्रिजगतीं न समाये ॥९३॥ वर मानला आम्हांसी। कन्यादान श्रीकृष्णासी। तरीच सार्थकता जन्मासी। दोहीं पक्षांसी उद्धार ॥९४॥ विकल्परुक्मिया कृष्णद्वेषी। वचन न मानेचि त्यासी। काय म्हणावे वडिलांसी। गोवळीयासीं सोयरीक ॥९५॥ कृष्ण अगुणांचा अरूप। कन्या सगुण अतिस्वरूप। दोहींशीं घटिताचा विकल्प। शून्य संकल्प सोयरिकें ॥९६॥ रुक्मिया कृष्णनिंदा करित। वाग्देवता स्तुति वदत। निंदेसी वागेश्वरी भीत। पाप अद्भुत निंदेचे ॥९७॥ एका जनार्दनीं विनवित। निंदेमाजी स्तुति होत। श्रोतीं तेथें ठेवुनि चित्त। कथा निश्चित परिसावी ॥९८॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे प्रथमः प्रसंगः ॥१॥

॥श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु॥

## ॥ प्रसंग दुसरा ॥

श्रीगणेशाय नमः। कृष्णासी शरीरसंबंध। हा तंव बोलचि अबद्ध। वडीलपणें घेतला छंद। बुद्धिमंद म्हातारा ॥१॥ कृष्णासी सोयरिक न ये कामा। हें काय कळलें नाहीं तुम्हां। सखा मारिला अहंमामा। तो काय आम्हां धड होईल ॥२॥ एक म्हणती नंदाचा। एक म्हणती वसुदेवाचा। ठाव नाहीं बापाचा। अकुळीं साचा श्रीकृष्ण ॥३॥ मुळींचा नाहीं जन्मपत्र॥ कवण जाणे कुळ गोत्र। कृष्ण नव्हे जी स्वतंत्र। भक्तपरतंत्र सदाचा ॥४॥ कर्म पहातां परद्वारीं। गोरसाची करी चोरी। धरितां न धरावें निर्धारीं। चोरटा हरी चित्ताचा ॥५॥ गाईपाठीं धांवतां। पळूं शिकला तो तत्त्वतां। काळयवनापुढें पळतां। झाला रक्षिता मुचुकुंद ॥६॥ कृष्ण वीर नव्हे गाढा। पळाला जरासंधापुढां। भेणें समुद्राचिया आगडा-माजी दुर्ग बसविले ॥७॥ केशिया मारिला तटू। बैल मारिला अरिष्टू। इतकियासाठीं वीर बाटू। केवीं सुभटू म्हणावा ॥८॥ मारिले वत्सासुर वासरूं। बकासुर तें पांखरूं। किरडूं मारिलें अघासुरू। इतुकेनि वीर केंविं होय ॥९॥ कृष्णासी उघड नाहीं वर्तणें। सदा संसारीं लपणें। त्याचीं मी जाणें विंदाणें। लपतीं स्थानें तीं ऐका ॥१०॥ चढे वैकुंठींचे पाहाडीं। क्षीरसागरीं देतसे बुडी। शेषाचिये फणें दडी। मिषें निद्रेचेनि राहे ॥११॥ विघ्न देखोनिया थोर॥ होय मत्स्य कीं सूकर। नातरी पाठी करोनि निबर। रूप धरी कमठाचें ॥१२॥ दैत्य देखोनिया भारी। खांबामाजी गुरगुरी। बळें काढिलिया बाहेरी। नरसिंह होऊनि ठेला ॥१३॥ दैत्य देखोनिया सबळ। जाहला भिकारी





केवळ। बळीनें केला द्वारपाल। गळां बांधोनि द्वारासी ॥१४॥ सवेचि खुजटपण सांडिले। रूप अणिकचि मांडिलें। दैत्यफळकट काढिले। मजुर जाहले मायेचे ॥१५॥ राखितां इंद्राची गाय। दैत्यें मारिली माय। रडे ये माय माय। सांगूं काय तयाचें ॥१६॥ थोर मांडिले सांकडें॥ तैसें मेळविली माकडें। आतांचि पाहा रोकडें। गोवळियांपुढें नाचतसे ॥१७॥ कृष्णाची आणिक काहाणी। तो स्त्री जाहला मोहिनी। सुरां-असुरां ठकवूनी। महादेव मोहिला ॥१८॥ शेखीं जाहला म्हाळसा। वास केला त्या निवासा। त्याचेनि धर्मे राहूं कैसा। रविचंद्रासी लागला ॥१९॥ कृष्णांसीं नाहीं रूप गुण। न देखों एकदेशी स्थान। तयासी कैंचें सिंहासन। वृत्तिशून्य वर्ततसे ॥२०॥ कृष्णासी नाही देहाभिमान। कदा नेणे मानापमान। तयाचे गांठी कैंचे धन। भाजीचे पान खातसे ॥२१॥ कृष्णाचा भाव एक। नव्हे स्त्री पुरुष ना नपुंसक। पाहतां निश्चयो एक। नव्हे निष्टंक निर्धारें ॥२२॥ जयासी माया दोन पाहीं। दोघीं वर्तती दोन ठायी। एक देही एक विदेही। देवकीही यशोदा ॥२३॥ एकीं स्वबोध उपजविती। दुजी वाढवी विषयप्रीती। दोघी सांडुनि तळमळती। धर्माप्रती धांविन्नला ॥२४॥ उच्छिष्ट काढी धर्माघरी। ब्राह्मणाची भीड थोरी। लाथ हाणीतली उरावरी। तें पद मिरवी निलाजरा ॥२५॥ तया कृष्णासीं सोयरीक करणें। तेंचि आम्हां विटंबवाणे। सदा संसारी लपणें। लाजिरवाणे लोकांत ॥२६॥ तयासी द्यावें जी भावंड। तैं आमुचें काळें तोंड। या बोलासी म्हणाल पाखंड। तरी ज्ञातें उदंड तुम्हांपाशी ॥२७॥ कृष्ण अतीत चहूं वाचा। तेथें वाग्निश्चयो घडे कैंचा। शब्दनिश्चयो नव्हे साचा। सत्य वाचा हे माझी ॥२८॥ बोला भाके जो सांपडे। तयासी वाग्निश्चयो

घडे। हे तंव अवघेचि कुडें। जाणता वेड कां होतां ॥२९॥ कुळकर्माचा अंतू। आपणांसकट सकळांचा घातू। करणें असेल जीवा अंतू। तरी कृष्णनाथू वरावा ॥३०॥ जैसे निजतत्त्व निर्मळ। तैसा राया राहें निश्चळ। कुळाभिमानी सबळ। देहसंबंध मी जाणे ॥३१॥ जन्म कर्म कुळ गोत्र। उंच नीच वर्ण विचित्र। कर्माचें जें कर्मतंत्र। जाणता स्वतंत्र मी एकूं ॥३२॥ शरीरसंबंधाचें कारण। घटित आहे मजआधीन। प्रकृतिपुरुषां पाणिग्रहण। माझेनि जाण होतसे ॥३३॥ वचन ऐका प्रबळ। चैद्यदेशीं भूपाळ। महा अभिमानी शिशुपाळ। सोयरा केवळ तो आम्हां ॥३४॥ शरीरसंबंधाचे घटित। तयाशींचे आहे निश्चित। तुम्ही बैसलेति पंडित। उचितानुचित विचारा ॥३५॥ कर्मकांडीचे वेदपाठक। बोलावूनि ज्योतिषी गणक। वाग्निश्चयाचे वाग्जाळिक। शास्त्रें शाब्दिक सोडिलीं ॥३६॥ मेळा पांचां पंचकांचा। शब्दनिश्चयो तेणें साचा। साभिमान गर्जे वाचा। सोयरा आमुचा शिशुपाळ ॥३७॥ रुक्मिणी काया मनें वाचा। निश्चय केला श्रीकृष्णाचा। बाहेर वाग्निश्चय शब्दाचा। शिशुपाळासी रुक्मिया ॥३८॥ लग्नपत्रिका पाहतां डोळां। एक नाडी जी शिशुपाळा। कृष्ण नेईल भीमकबाळा। यासी अवकळा वरील ॥३९॥ वर शिशुपाळा ऐकतां। दचकली ते राजदुहिता। जैसा सिद्धासी सिद्धिलाभ होता। उठे अवचिता अंतराय ॥४०॥ कवण उपासूं गे देवता। कवणकवणा जावें तीर्था। कवण नवस नवसूं आतां। कृष्णनाथप्राप्तीसी ॥४१॥ जैसा सद्बुद्धीआड कामक्रोधू। कां विवेकाआड गर्वमदू। स्वधर्माआड आळससिंधू। तैसा बंधु रुक्मिया ॥४२॥ जैसा सविवेक वैरागी। विघ्ने जिणोनि जाय वेगीं। तैसा प्रयत्न कृष्णालागीं। करीन स्वांगीं मी देखा ॥४३॥ कृष्णप्राप्तीचा





विचारू। तेथे करूं नये दुजियाचा संचारू। वृत्ति करावी तदाकारू। धैर्यबळें आपुलेनी ॥४४॥ गुज सांगूं मायेपाशीं। परी साध्य नव्हे तियेसी। रडूं निघेल मोहेंसीं। मिठी लोभेंसीं घालूनी ॥४५॥ माझिया आशेचिया साजणी। दीन तृष्णेच्या ब्राह्मणी। मिळतील सद्वासना सुवासिनी। मज वेढूनि घेतील ॥४६॥ तेणें होईल थोर शब्दू। ऐकेल अभिमानिया बंधू। कृष्णप्राप्तीसी अवरोधू। सबळ क्रोधू उपजेल ॥४७॥ ऐसें विचारूनि जाण। निजभावाचा ब्राह्मण। आप्त पाचारिला सज्ञान। अतिगहन विवेकी ॥४८॥ कृष्णप्राप्तीचा सद्भावो। यालागीं तो सुदेवो। कृष्ण प्राप्तीसी धाडिला पहा हो। निजपत्रिका देवोनी ॥४९॥ सातां श्लोकांची व्युत्पत्ती। उपाव भाव आर्तकीर्ती। विवेक निश्चयो निजभक्ती। कृष्णासी विनंती पाठविली ॥५०॥ एका जनार्दनीं मन। श्रोतीं व्हावें सावधान। प्रेमपत्रिकेचें लेखन। अनुसंधान भीमकीचें ॥५१॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे द्वितीय: प्रसंग: ॥२॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥

## ॥ प्रसंग तिसरा ॥

श्रीवासुदेवाय नमः ॥ आपुले आर्तीचे अंजन । शुद्धसत्वाचे पत्र जाण । बुद्धिबोधे लेखन । वर्णाक्षरीं अक्षर ॥१॥ मनोवेगाचा पैं वारु । त्यावरी बैसविला द्विजवरू । कृष्णापासी सत्वरू । समूळ मूळ पाठविला ॥२॥ माझे पूर्णपुण्यें तूं द्विजवरु । कृष्णप्राप्तीसी मज तूं गुरु । म्हणवोनि केला नमस्कारू । वेगी यदुवीरू आणावया ॥३॥ स्वामिचरणीं ठेविला माथा । द्वारकेसी जावें जी तत्त्वतां । प्राण वांचवा हो आतां । वेगीं कृष्णनाथा आणावें ॥४॥ द्विज पावला द्वारका । वैकुंठ कैलासांहूनि अधिका । जेथें निवास जगन्नायका । विश्वव्यापका श्रीकृष्णा ॥५॥ द्वारकाबाह्यप्रदेशीं । आराम रमवी जीवशिवांसी । वसंत विनवी सदा सुमनेंसी । संताप कोणासी असेना ॥६॥ प्रेमें विकासलीं कमळें शुद्ध । रुंजी करिता कृष्ण षट्पद । ऐकोनि गंधर्व जाहले स्तब्ध । सामवेद मौनावले ॥७॥ प्रबोध पारवे घुमघुमती । तेणे वागेश्वरी चमके चित्ती । विस्मित जाहला बृहस्पती । आश्चर्य मानिती सुरवर ॥८॥ डोलती पैं द्राक्षांचे घड । मुक्त परिपाके अतिगोड । सकळ कामाचे पुरे कोड । गोडाही गोड ते गोडी ॥९॥ कोकिळा कृष्णवर्ण कूजती । शब्द निःशब्द मधुर वृत्ती । तेणें सनकादिक सुख पावती । प्रजापती तटस्थ ॥१०॥ मयूर आनंदे नाचत । अप्सरानृत्य तेणें तटस्थ । तांडव विसरले उमाकांत । अतिअद्भुत हरिलीला ॥११॥ शुद्ध हंस द्वारकावासी । मुक्तमोतियें चारा त्यांसी । तें देखोनियां परमहंसी । निजमानसी लाळ घोटी ॥१२॥ शुक पिंगळे अनुवादत । तेणें वेदान्त दचकत ।





अतिगुह्याचे गुह्यार्थ । पक्षी बोलत द्वारकेचे ॥१३॥ इतर नगरांची उभवणी । तिखणावरी पांचखणी । त्यांहीमाजी अतिदुखणी । द्वारकापट्टणीं तें नाहीं ॥१४॥ द्वारका पाहतां वाडेकोडें । विजू पिळुनि घातले सडे । मुक्त पताका चहूंकडे । मशक त्यांपुढे सत्यलोक ॥१५॥ द्वारकेची नवलपरी । चिंतामणीची चिंता हरी । कल्पतरूची कल्पना वारी । परियेसाची निवारी । जडत्व काळिमा ॥१६॥ दशेचें दैन्य निवडी । अमृताची साल काढी । स्वानंदाची उभवी गुढी । नांदे उघडी द्वारका ॥१७॥ द्वारकेमाजी शुद्ध केणें ॥ दों अक्षरांचें खरें नाणें । जैसें घेणें तैसें देणें । कोणासी उणें असेना ॥१८॥ वैकुंठीचिया वैभवासी । कृष्णें आणिलें द्वारकेसी । देखतां ठक पडलें द्विजासी । ते द्वारका कैसी वर्णावी ॥१९॥ द्विजासी सत्वरता मोठी । नगर न पाहावेचि दृष्टीं । भीतरी पातला उठाउठी । जेथें जगजेठी श्रीकृष्ण ॥२०॥ म्हणवुनी द्वारकावर्णन । रहावयाचें हेंचि कारण । द्विजासी देखिला श्रीकृष्ण । विस्मित मन तयांचें ॥२१॥ हेमसिंहासनीं आदिमूर्ती । बैसला असे सहजस्थिती । द्विजासी देखोनि श्रीपती । भाव चित्तीं जाणिला ॥२२॥ याचिया आगमनविधी । थोर होईल कार्यसिद्धी । फावली एकांतांची संधी । होय सद्बुद्धि ब्राह्मण ॥२३॥ सिंहासनाखालती उडी । घालूनि दोन्हीं कर जोडी । नमन साष्टांगपरवडी । पूजी आवडी द्विजातें ॥२४॥ अमर करिती कृष्णपूजा । तैशियापरी पूजी द्विजा । ब्राह्मणदेव कृष्णराजा । ब्राह्मणपूजा तो जाणे ॥२५॥ ब्राह्मणासी मंगलस्नान । देऊनि पीतांबर सुमन चंदन । सन्निध बैसोनि आपण । दिधलें भोजन यथारुचि ॥२६॥ शय्या घालुनि एकांती । अरळ सुमनांची निगुती । विडिया देऊनि श्रीपती । शयन करविती द्विजातें ॥२७॥ कृष्ण

बैसोनियां शेजारी। ब्राह्मणाचे चरण चुरी। येरू म्हणे गा श्रीहरी। करीं धरी कृष्णातें ॥२८॥ ऐकें स्वामी देवाधिदेवा। आम्हीं करावी तुझी सेवा। तूं पूजितोंसी भूदेवा। ब्राह्मण देव म्हणवूनिया ॥२९॥ निजात्मभावें उचितें। हृदयीं साहिले लाथेतें। तें हित नव्हेचि आमुतें। विपरीतार्थ फळला असे ॥३०॥ तुझिया पूजा पूज्य जाहलों। तेणें गर्वासी चढिन्नलों। कृष्णसेवेसी नाडलों। थोर वाढलों अभिमानें ॥३१॥ तूं यज्ञपुरुष नारायण। तुज याज्ञिक नेदिती अन्न। वृक्षा गेलें त्यांचें हवन। कर्मठपण कर्माचें ॥३२॥ सर्वांभूती भगवद्भावो। नपुजे तंव न भेटे देवो। तैसा मी ब्राह्मण नोहें पाहा हो। जाणसी भावो हृदयींचा ॥३३॥ कृष्णें पुशिलें स्वागत। वृत्ति आहे की निश्चित। चित्तीं चिंता ज्या वर्तत। ते दुश्चित सर्वदा ॥३४॥ जयाची चिंता निवर्तली। तयाची वृत्ति सुचित जाहली। त्यासीच स्वकर्मे फळलीं। निजात्मफळाचेनि फळें ॥३५॥ असोनि इंद्राची संपत्ती। तृप्ती नाहीं जयाचे चित्तीं। ते अतिशय दुःखी होती। विटंबिजेती संसारीं ॥३६॥ असोनिया अकिंचन। जयाची वृत्ति समाधान। तेणें अजिता मातें जिंकिले जाण। बंदीजन मी तयाचा ॥३७॥ सर्वांभूती भगद्भावो। त्यावरी स्वधर्मनिष्ठ भूदेवो। त्याचिया पाऊलापाऊलीं पाहा वो। सर्वांग वोडवीं ॥३८॥ ऐसिये निष्ठेचे जे ब्राह्मण। ते मज सदा पूज्य जाण। त्यांचे नमस्कारीं मी चरण। वारंवार मस्तकीं ॥३९॥ कृष्णदर्शनें समाधान। ब्राह्मणासी पडिलें मौन। विसरला कार्याची आठवण। जाणोनि प्रश्न हरि करी ॥४०॥ कोठोनि येणें झालें स्वामी। कवण ग्राम कवण भूमी। तुमचे देशींचा देशस्वामी। प्रजा स्वधर्मी पाळी कीं ॥४१॥ दुर्गम मार्ग अति संकटीं। क्रमूनि आलेति आमुचे भेटीं। कवण इच्छा आहे पोटीं।



ते गुह्य गोष्टी सांगावी ॥४२॥ आम्ही केवळ ब्राह्मणभक्त। आज्ञा करणें हें उचित। काय अपेक्षित तुमचें चित्त। तें निश्चित मी करीन ॥४३॥ कवण कार्याचिये विधी। तुम्ही आलेति कृपानिधी। ते झाली कार्यसिद्धी। जाणा त्रिशुद्धी सर्वथा ॥४४॥ ऐकोनि कृष्णमुखींची गोष्टी। द्विजें बांधिली शकुनगाठी। हर्ष वोसंडला पोटीं। आनंद सृष्टी न समाये ॥४५॥ म्हणे वैदर्भदेशींचा राजा भीमक। जैसा वैराग्यामाजी विवेक। भागवतधर्मी अतिधार्मिक। शुद्ध सात्त्विक सत्त्वाचा ॥४६॥ त्याची कन्या चिद्रत्न। लावण्य गुणें गुणनिधान। सकळ भूषणांचे भूषण। तें मंडन तिन्हीं लोकीं ॥४७॥ उदार धीर गुणगंभीर। सज्ञान ज्ञानें अतिचतुर। तुझ्या ठायीं अतितत्पर। कलत्रभावें विनटली ॥४८॥ पित्यानें तुम्हांसी दिधली वधू। ऐकुनि हासिन्नला गोविंदू। हरिखें न सांभाळे स्वानंदू। द्विजासी क्षेम दीधले ॥४९॥ जें होतें कृष्णाचे पोटीं। तेंचि द्विजें सांगितली गोष्टी। जीवीं जीवा पडली मिठी। पाठी थापटी द्विजाची ॥५०॥ आणिक एक संवादू। तिचा ज्येष्ठ बंधू विरोधू। तेणें शिशुपाळा दिधला शब्दू। लग्न परवा धरिलेंसे ॥५१॥ येचिविषयीं यदुनायका। आहे भीमकीची पत्रिका। ते वाचूनियां सविवेका। कार्यसिद्धी करावी ॥५२॥ मग काढिली पत्रिका। कुममंडित सुरेखा। धीर न धरवेचि हरिखा। आवडी देखा चुंबिली ॥५३॥ पत्रिका देखोनि कृष्णनाथ। श्रवणार्थी आर्तभूत। एका जनार्दनी विनवीत। पत्रिकार्थ परिसावा ॥५४॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे पत्रिकावलोकनं नाम तृतीयः प्रसंगः ॥३॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥

## ॥ प्रसंग चौथा ॥

श्रीयशोदातनयाय नमः ॥ ॐ नमो जी यदुवीरा। तूं निर्विकार नोवरा। मज न्यावे निजमंदिरा। क्रोधादिक असुरां दमूनी ॥१॥ मज वडील माझा बंधू। जेणें तुजशीं विन्मुख बोधू। ज्याचेनि नीचांशीं संबंधू। निवारूनि वधू त्यां करावी ॥२॥ ऐका भीमकीची वित्पत्ती। पत्रिका लिहिली चवथे भक्ती। वाचितांचि भक्तपती। सहजस्थिती धांविन्नला ॥३॥ श्लोकः ॥ रुक्मिण्युवाच ॥ श्रुत्वा गुणान् भवनसुंदर शृण्वतां ते निर्विश्य कर्णविवरैर्हरतोऽङ्गतापम्। रूपे दृशां दृशिमतामखिलार्थलाभं त्वथ्यच्युतायिशति चितमपत्रपं मे ॥१॥ टीका ॥ ऐके त्रैलोक्यसुंदरा। सकळसौंदर्यवरागरा। तुझेनि सौंदर्ये सुरनरां। सुंदरत्व वर्णिजे ॥४॥ तुझी सुधाकर कीर्ती। श्रवणश्रवणा प्रकाशिती। त्रिविध ताप अस्त पावती। जेवीं गभस्ती खद्योत ॥५॥ ऐशियाची स्वरूपप्राप्ती। चारी मुक्ती दासी होती। सकळ स्वार्थ पायां लागती। ज्या देखती त्या निजलाभ ॥६॥ क्षय नाहीं गा निश्चित। यालागीं नामें तूं अच्युत। तुझिया ठायीं निर्लज्ज चित्त। अतिसुरत कृष्णसुखा ॥७॥ ॥श्लोकः ॥ का त्वा मुकुंद महती कुशलशील रूपविद्यावयोद्रविणधामभिरात्मतुल्यम्।धीरा पतिं कुलवती व वृणीत कन्या काले नृसिंह नरलोकमनोऽभिरामम् ॥१॥ टीका ॥ मन-विश्रांतीचा निजबोधू। म्हणवूनि नांवें तूं मुकुंदू। सकळ सुखाचा आनंदकंदू। तुज कोण वधू वरीना ॥८॥ कुळ शीळ धन रूप। विद्या वयसा अतिस्वरूप। शांति कांति तेज अमूप। करिती तप तुजलगीं ॥९॥ ऐशी लावण्यगुणसंपत्ती। धीरवती





आणि सती। त्याही तुजसमान वरा न पावती। तेथें मी किती वराक ॥१०॥ ऐकें नरवीरपंचानना। प्राप्तकाळीं पाणिग्रहणा। तुज कोण वरीना अंगना। मनमोहना श्रीकृष्णा ॥११॥ म्हणसी मी सोयरा अति काळा। बोलावितेसी विवाह- मेळा। तरी पाणिग्रहण जी शिशुपाळा। तो काळांतकाळ मजलागी ॥१२॥ ते काळीं त्वां नुपेक्षावें। हेंचि मागें जिवेंभावें। मज दीनातें उद्धरावें। धांवें पावें लग्नासी ॥१३॥ श्लोंकः ॥ तन्मे भवान् खलु वृतः परिरंग जायामात्मर्पितश्च भवतोऽत्र विभो विधेहि। मा वीरभागमभिमर्शतु चैद्य आराद्गोमायुवन्मृगपतेर्बलिमंबुजाक्ष ॥३॥ टीका ॥ माने वाचा आणि काया। निर्धारेंशीं तुझी जाया। मी झाल्यें असें यदुराया। विवाह त्वां कीजे ॥१४॥ तूं तंव पर गा प्रकृती। तुज नावडे स्त्रियांची संगती। उपेक्षिसी माझी विनंती। थोर अपकीर्ती तुज तेव्हां ॥१५॥ मी तंव तुझेंचि अर्धांग। केवीं शिशुपाळ शिवे माझें आंग। तूं शिरावरी असतां श्रीरंग। मी वीरविभाग यदुवीर ॥१६॥ कृष्णकेसरीची संपत्ती। चैद्यजंबुक जैं गा नेती। कमळनयना कमळापती। थोर अपकीर्ती होईल ॥१७॥ श्लोकः ॥ पूर्तेष्टदत्तनियमव्रतदेवविप्रगुर्वर्चनादिभिरलं भगवान् परेशः ॥ आराधितो यदि गदाग्रज एत्य पाणिं गृह्यातु मे न दमघोषसुतादयोऽन्ये ॥४॥ टीका ॥ तरीच साधेल हें लग्न। जरी म्यां केलें असेल भगवद्भजन। ब्रह्मभावें ब्राह्मणपूजन। देवतार्चन हरीचें ॥१८॥ इष्ट जे कां यागादिक। वापी कूप आराम देख। गोभूरत्नदानादिक। त्याहून अधिक अन्नदान ॥१९॥ व्रत जें कां एकादशी। पूजाविधि जागरणेंशीं। ब्राह्मणभोजन द्वादशीसी। भगवंताशीं वल्लभ ॥२०॥ सकळ धर्मांचा पैं धर्म। गुरु तोचि परब्रह्म। ऐसा केला असेल नेम। तरी पुरुषोत्तम मज पावे ॥२१॥

व्रत तप यज्ञ दान। त्याहून अधिक हरींचे ध्यान। निमिषामाजी समाधान। अमन मन होऊनि ठोक।।२२।। ऐसोनि साधनें साधिला बोधू। तरी गदू याचा धाकुटा बंधु। वेगीं येऊनि गोविंदू। पाणिग्रहण मज करावें।।२३।। परादि वाचा नाहीं सौरस। यालागीं नांवें तूं परेश। भीमकीलिखितें हृषीकेश। तटस्थ होऊनि पैं ठेला।।२४।। मज कृष्णें नेलियापाठीं। मागें शिशुपाळाचिया पाठीं। बैसेल अवकळा गोमटी। दोघां गांठीं एकचि।।२५।। श्लोक:।। श्वोभाविनी त्वमजितोद्वहने विदर्भान् गुप्त: समेत्य पृतनापतिभि: परीत:। निर्मथ्य चैद्यमगधेंद्रबलं प्रसह्य मां राक्षसेन विधिनोद्वह वीर्यशुल्काम्।।५।। ठीका।। पत्रिका पहावी सावधान। विलंब न करावा व्यवधान। प्रात:काळीं आहे लग्न। ऐसिया समयीं पावावें।।२६।। देखोनि लिखिताची तातडी। एकला येऊनि घालिशी उडी। तेव्हां मज म्हणशील कुडी। बुद्धि धडफुडी ऐकावी।।२७।। तुझिया निजबोधाची सेना। प्रत्यावृत्ति पाहोनि नयना। स्वानुभवाचेनि भारें जाणा। सावध होऊनि त्वां यावें।।२८।। स्वरूप तेचिया मदगजा। गुढार घालावें जी वोजा। प्राणपान जिणती पैजा। तैसे वारू पालाणीं।।२९।। जिणोनि जाती मनोरथ। तैसे संजोगावे रथ। चक्रवाटातळीं पर्वत। पीठ होते कर्माचे।।३०।। तुझिया निजबोधाचे गाढे। द्वैतदलनीं जे निजगाढे। तेचि यादव करूनि पुढें। सबळबळेंशीं त्वां यावें।।३१।। बाह्य सृष्टी जरी तूं येशीं। तरी तर्क पडेल लोकांसी। कळों नेदितां दुजियासी। गुप्तरूपेंसीं प्रगटावें।।३२।। कृष्णासी शिकविते बुद्धी। म्हणाल चतुर तुम्ही अनादी। हृदयशून्य कृष्ण त्रिशुद्धी। वर्तणें बुद्धी माझेनि।।३३।। प्रबळ बळेंशीं सबळ। म्हणाल कां बोलाविते बरळ। तरी माया माहेरी



प्रबळ। स्थूळास्थूळ अरिवर्ग।।३४।। सखा जिवलग बंधु सबळ। मागध अष्टधा प्रबळ। मंथोनि चैद्यादि खळ। गज केवळ पर्णावें।।३५।। म्हणशी ढालाची तूं मोठी। गोड बोलाची प्रकृती खोटी। येवढी कां सोसूं आटाटी। म्हणोनि गोष्टी नुपेक्षावी।।३६।। तूं तवं अजिंक्य गा धडफुडा। तुझेनि नांवें वाटीव भेडा। मज पर्णावया आळस दवडा। होई गाढा वीरवृत्ती।।३७।। म्हणशी युद्ध मांडेल कडाडी। मी उठेन काढाकाढी। नाहीं लौकिक परवडी। कैची घडी घडवटे।।३८।। कैचा अंत्रपाट जाण। कवण म्हणेल सावधान। मीतूंपणा नाहीं व्यवधान। म्हणशी लग्न कैसेनी।।३९।। ऐसेनि लग्न लागलिया पुढां। रणी नाचेल रणधेंडा। वोवाळणी बाण प्रचंडा। परस्परें पडतील।।४०।। म्हणशी निधीनें नव्हेल लग्न। अविधीनें करी पाणिग्रहण। येविषयींचे विधान। सावधान परिसावें।।४१।। विवाह तरी बहुतांपरी। पिशाच गांधर्व आसुरी। राजे वरिताती स्वयंवरी। पण महाशूरीं भेदूनि।।४२।। पाणिग्रहण ब्राह्मणांसी। खड्गलग्न क्षत्रियांसी। रणीं जिंकोनि महाशूरांसी। राक्षसविधी मज पर्णी।।४३।। जागृती स्वप्नीं सुषप्तिकाळा। तुजवांचोनि न देखें डोळा। ग्लानि लिहिता वेळावेळां। उबग गोपाळा न मनावा।।४४।। आतां ऐकें एक बोल। तुझें वीर्य माझें मोल। अल्प वेंचोनि एक वेळ। दासी केवळ मज करीं।।४५।। श्लोक:।। अंतपुरांतरचरीमनिहत्य बंधूंस्त्वामुद्वहे कथमिति प्रवदाम्युपायम्। पूर्वेद्युरस्ति महती कुलदेवियात्रा यस्यां बहिर्नववधूर्गिरिजामुपेयात्।।६।। टीका।। म्हणती अंत:पुरामाजील तूं वधू। काढितां आडवे येतील तुझे बंधू। त्यांचा मजकरितां वधू। दु:खसंबंधू होईल।।४६।। येचिविषयीं जी उपाया। सांगेन ऐकें यादवराया। वेगी यावें अंबालया।

यात्रासमया ठाकूनी ॥४७॥ कुळींचा कुलधर्म भीमकराया। नगराबाहेर अंबालया। नववधू न्यावी पूजावया। जगदंबेसी कुळधर्म ॥४८॥ तेचि संधी जी कारण। परस्परें हेचि खूण। तेथें राहूनि सावधान। ओंपुण्या करावें ॥४९॥ श्लोकः ॥ यस्यांघ्रिपंकजरजःस्नपनं महांतो वांछंत्युमापतिरिवात्मतमोपहत्यै। यर्ह्यंबुजाक्ष न लभेय भवत्प्रसादं जह्यामसून्व्रतकृशान् शतजन्मभिः स्यात् ॥७॥ टीका ॥ म्हणसी ऐश्वर्यें थोर इंद्र। रूपें मदन कां चंद्र। हे सांडूनि आग्रह थोर। माझाचि कां करितेसी ॥५०॥ ऐसें न म्हणावें सर्वेश्वरा। कवण जाणे या विचारा। केवळ नव्हेसी तूं नोवरा। जन्मोद्धारा मजलागीं ॥५१॥ तुझिया चरणींची माती। ब्रह्मादिदेवां नव्हे प्राप्ती। आंगें येऊनि उमापती। स्नान वांछिती पदरजीं ॥५२॥ महादेवा तमोगुण। त्या तमासी उपशमन। तुझिये चरणींचे रज जाण। लागलें ध्यान शिवासी ॥५३॥ चरणरजालागीं केवळ। ब्रह्मा जाहला पोटींचे बाळ। तोही न पवे चरणकमळ। नाभिकमळीं स्थापिला ॥५४॥ त्याचि लाजा जी गोपाळा। चरणरजा आला गोकुळा। तुवा ठकविला त्याही वेळा। वत्सें गोवळा जाहलासी ॥५५॥ हें जाणोनि सदाशिवें। ध्यान मांडिलें जीवेंभावें। ऐशियाची प्राप्ती मी पावें। तै थोर दैवे दैवाचा ॥५६॥ योग याग तपें तपती। तरी नव्हे तुझी प्राप्ती। मी तंव धीट मोठी चित्तीं। आहें वांछिती अर्धांग ॥५७॥ पत्रिका वाचितांचि देख। तुवां यावें आवश्यक। मज पर्णून नेदिशी सुख। तरी परमदुःख होईल ॥५८॥ तुझी कृपा नव्हतां फुडी। कवण जिणियाची आवडी। देहदंडाची हे बेडी। कोण कोरडी वोढील ॥५९॥ कृपा न करवेल येथें। तरी मारूनि जा आपुले हातें। मग परलोकीं तरी तूतें। सावकाश




भोगीन ॥६०॥ ऐसें घडवितां जरी न घडे। तरी देह करीन मी कोरडें। व्रतें तपें अवघडें। तुज उद्देशें करीन ॥६१॥ प्राण सांडीन सर्वथा। म्हणसी काय येईल हाता। तरी एका दों पांचां सातां। जन्मशतां वरीन ॥६२॥पत्रिका वाचितांचि जाण। जाणवेल शहाणपण। म्यां तंव वाहिलीसे आण। तुजवीण अन्य वरीं ना ॥६३॥ श्लोकः ॥ ब्राह्मण उवाच ॥। इत्येते गुह्यसंदेश यदुदेव मयाऽऽहृताः। विमृश्य कर्तुं यच्चात्र क्रियतां तदनंतरम् ॥८॥ टीका ॥ द्विज म्हणे यदुनायका। सेवेशी निवेदिली पत्रिका। ते वाचूनि सविवेका। कार्यसिद्धि करावी ॥६४॥ पत्रिका वाचितांचि गोपाळा। पुढें भीमकी देखे डोळां। बाहू पसरूनि उतावेळा। उठे वहिला आलिंगना ॥६५॥ भीमकी भावार्थाची कैसी। चटपट लागली देवासी। निद्रा न लगेचि सेजेसी। उठीबैसी करीतसे ॥६६॥ नवल वैदर्भीचा भावो। रात्रीं वोसणावे देवो। भीमकी सांडूं नको देहो। आलों पाहा बे पर्णावया ॥६७॥ जया हृदयीं जैसा भावो। तयासी तैसा भेटे देवो। भीमकी कृष्णमय पाहाहो। कृष्णदेवो तन्मय ॥६८॥ हृदयीं नाहीं सत्य भावो। तंव कैसिनी पावे देवो। भीमकी भाग्याची पहा हो। उठिला देवों सत्वर ॥६९॥ कृष्ण सांगे द्विजाजवळी। रात्रीची अवस्था सकळी। मग हांसोनियां वनमाळी। टाळिया टाळी पिटिली ॥७०॥ एका विनवी जनार्दना। कृष्ण चालिला पाणिग्रहणा। भक्तवचनासी अवगणना। देव सर्वथा न करीचि ॥७१॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे चतुर्थः प्रसंगः ४॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

## ।। प्रसंग पाचवा ।।



श्रीगणेशाय नमः ।। सन्नद्ध करितां दळभार। येथें लागेल उशीर। मी एकला एकांगवीर। भीमकी घेऊनि येईन ।।१।। जो दुजियाची वास पाहे। त्यांचे कार्य कंहींच नोहे। यश कैसेनि तो लाहे। साह्य पाहे सांगातीं ।।२।। विकल्परुक्मिया मज द्वेषी। तेणें निवारिलें विवाहासी। विटंबूनि त्याचिया मुखासी ।। रुक्मिणीसी आणीन ।।३।। चैद्यादिक पक्षपाती। त्यांसीं रणीं लावीन ख्याती। मी तंव कोपलिया श्रीपती। त्रिजगतीं कोण राहे ।।४।। जैशा दो काष्ठांच्या भरणी। मथूनि काढिजे जेवीं अग्नी। तेवीं अरिवीरांतें त्रिभांडोनी। पवित्र रुक्मिणी आणीन ।।५।। माझिया कोपाची भृकुटी। रणा आणीन सकळ सृष्टी। त्यामज युद्धाची आटाटी। लग्नासाठीं केवढी ।।६।। रुक्मिणीचिया लग्नासी। कवण दिवस कवणें मासीं। कवण नक्षत्र तें द्विजासी। मधुसूदनें पूसिलें ।।७।। सारथी बोलावूनि दारुकासि। वेगीं संयोजीं रथासी। जाणें असे कौंडिण्यपुरासी। दुजियासी कळों नेदीं ।।८।। जैसे चारी पुरुषार्थ। तैसिया वारुवीं जुंपिला रथ। ऐका नांवें सुनिश्चित। जेथे श्रीकृष्णनाथ आरूढे ।।९।। शैब्य सुग्रीव बलाहक। चौथा मेघपुष्प देख। चारी वारू अति नेटक। सारथी दारुक धुरेसी ।।१०।। अनर्घ्यरत्नीं रत्नखचित। गरुडध्वज लखलखित। लोल पताका डोलत। रथ शोभत अतिशोभा ।।११।। शस्त्रास्त्रांचे संभार। रथीं घालूनि अपार। दारुकें केला नमस्कार। जोडोनि कर राहिला ।।१२।। रथीं चढला नारायण। तुरुंगी बैसविला ब्राह्मण। एक दिवसें जनार्दन। कौंडिण्यपुरा





पातला ।।१३।। नगर देखिलें श्रीपतीं। जैसी मुमूक्षूची संपत्ती। तेथें राजा कौंडिण्यपती। विधानस्थिती करीतसें ।।१४।। भीमक वश्य जाहला पुत्रासी। जैसा विवेक महामोहासी। कन्या नेमिली शिशुपाळासी। जीवीं कृष्णासी हे द्यावी ।।१५।। जरी असेल आमुचे भाग्य। भीमकी भाग्याची सभाग्य। भावें पावेल श्रीरंग। येणें उल्हास करीतसे ।।१६।। नगर श्रृंगारिलें वाडेंकोडें। घातले कुंकुमाचे सडे। तोरणें पताका चहूंकडे। महोत्साहो मांडिला ।।१७।। गंधाक्षता कुसुममाळा। नगरनारीलोकां सकळा। वस्त्रें भूषणें पाहतां डोळां। जनलीला शोभतसे ।।१८।। घाव घातला निशाणीं। मंगळतुरें वेदध्वनी। हळदी लाविली रुक्मिणी। मंगळस्नान करविलें ।।१९।। पीतांबर परिधान। लेइली अलंकार भूषण। नोवरीचे दुश्चित मन। कृष्णआगमन पाहतसे ।।२०।। नांदीश्राद्ध देवकविधान। केलें ब्राह्मणांचें पूजन। यथाविधी ब्राह्मणसंतर्पण। स्वस्तिवाचन विधीचें ।।२१।। चहूं वेदींचे ब्राह्मण। येऊनि पुरोहित आपण। अथर्वणवेदें केलें हवन। ग्रहशांति दान यथोचित ।।२२।। सोनें रुपें नानावस्त्रें। घृतेंसहित तिळपात्रें। गोभूदानें विचित्रें। द्विजां नृपवरें दीधलीं ।।२३।। दमघोष याचिपरी। महोत्सावो आपुले नगरीं। पुत्रविवाहाचा करी। द्विजवरी यथोचित ।।२४।। वऱ्हाड निघालें बाहेरी। मदगज परिवारिले भारी। सुवर्णरथांचिया हारी। वीर अश्वांवरी आरूढले ।।२५।। चालती पायांचे मोगर। पातलें कौंडिण्यपुर नगर। आणीक वऱ्हाडी महावीर। चैद्यभार तेही आले ।।२६।। रुक्मिणी कृष्णासीं होती दीधली। ते शिशुपाळा देऊं केली। ते संधी पाहिजे साधिली। म्हणोनि आले पक्षपाती ।।२७।। वऱ्हाडी शाल्व आणि जरासंध। वक्रदंत विदूरथ। पौंड-क वीर अद्भुत। सैन्यभारेंशीं पातले ।।२८।।

कोणी विकल्प धरील चित्तीं। संबंध याहीं अर्थाअर्थी। वांटा केला अतिनिगुती। वीरवृत्तीं नांदावें ।।७४।। दायाद एकादे आपुले। रणीं देखाल खंगले भंगले। त्यांसी पाहिजे सांभाळिले। धन जोडिलें त्या नांव ।।७५।। हांसें आलें बळिभद्रासी। टाळी पिटिली टाळीसी। रणचतुर तूं योद्धा होसी। म्हणोनि पोटासी धरियेला ।।७६।। एका जनार्दनीं सन्नद्ध। मीनले गद हलायुध। कोपें खवळला जरासंध। दारुण युद्ध मांडिलें ।।७७।। इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे युद्धप्रारंभो नाम अष्टमः प्रसंगः ।।८।।

।।श्रीकृष्णार्पणमस्तु ।।



## ।। प्रसंग नववा ।।



श्रीगणेशाय: नम: ।। येऊनि जरासंधाप्रती। वीर प्रतिज्ञा बोलती। धनुष्यें वाइली हातीं। रणीं ख्याती लावुनी ।।१।। आमुच्या बाणांची प्रौढी। केवीं साहतील बापुडीं। नेणती युद्धाची परवडी। रणनिरवडी माराची ।।२।। यादवांचे बळ तें किती। आम्हां सन्मुख केवीं राहाती। नोवरी सांडूनियां पळती। महारथी लोटले ।।३।। आचांगळी अधिक शब्द। ऐकून उठिला वीर गद। कोपें खवळला हलायुध। रणमद चालिला ।।४।। रागें पेटला प्रबळ। घेतलें नांगर मुसळ। नेत्रींहूनी निघती ज्वाळ। परदळ खळबळलें ।।५।। सैन्य आटीत हलायुध। देखोनि चालिला जरासंध। त्यावरी उठावला वीर गद। द्वंद्वयुद्ध मांडिलें ।।६।। महावीर बळिभद्र। म्हणोनि चालिला दंतवक्र। त्यावरी उठावला सात्त्विक वीर। येर येरां पडखळले ।।७।। दोघां झाली दृष्टादृष्टी। घडघडिल्या चक्रवाटी। वोढल्या धनुष्यांच्या मुष्टी। दोघे हठी महावीर ।।८।। रागें पौंड-कें चालिला। त्यावरी कृतवर्मा लोटला। रथ रथेंसीं झगटला। गुण सुटला धनुष्याचा ।।९।। बाण ओढूनिया ओढी। कृतवर्मा सवेग सोडी। पौंड-काचा ध्वज तोडी। पताका पाडी महीतळीं ।।१०।। ध्वज तोडिला देखोनी। वेगें विंधिला सहा बाणीं। हातींचें धनुष्य तोडूनी। पाडिला धरणी कृतवर्मा ।।११।। कृतवर्मा वीर अंगें। रथावरी चढला वेगें। धनुष्य बाहूनियां रागें। बाण अनेगें वर्षला ।।१२।। पौंड-क बाणांतें तोडित। बाणामागें बाण सोडित। अलक्ष लक्षूनि भेदित। वीर विख्यात कृतवर्मा ।।१३।। हातीं घेऊन तीन बाण। धगधगित अतिदारुण। पौंड-का

मीनले ते कैसे। महामोहाचे मेहुडे जैसे। खद्योतसमुदाय निशी वसे। वीर तैसे वाटीव ॥२९॥ कृष्णतरणीचिया किरणीं। मावळती रणांगणीं। भीमकी उल्हासे कमळिणी। कृष्णदिनमणी देखलिया ॥३०॥ जैसे गंधर्वनगरींचे हुडे। तैसे शिशुपाळाचे वीर गाढे। वऱ्हाड आलें वाडेंकोडें। भीमकापुढें सागितलें ॥३१॥ राव सामोरा गेला त्यासी। केलें सीमांतपूजनासी। सन्मानूनी समस्तांसी। जानवशासी आणिलें ॥३२॥ रुक्मिणीहरणासी उद्यत। एकला गेला कृष्णनाथ। यादवसभेसी आली मात। जाहला विस्मित बळिभद्र ॥३३॥ काल आला होता ब्राह्मण। भीमकीचें पत्र घेऊन। प्रगट न करीच कृष्ण। निवारूं कोण म्हणवूनी ॥३४॥ यालागीं गुप्त केली मात। एकला गेला कृष्णनाथ। अतुर्बळी हा अनंत। नाहीं भीत कळीकाळा ॥३५॥ तो ब्राह्मण नव्हेचि निश्चित। मूर्तिमंत भीमकीचा भावार्थ। भावें नेला कृष्णनाथ। एकाएकीं एकला ॥३६॥ वक्रदंत जरासंध। शाल्व पौंड-क उन्नद्ध। चैद्य मीनले सन्नद्ध। होईल युद्ध दारुण ॥३७॥ कृष्ण करील कार्यसिद्धी। हें तंव न चुके त्रिशुद्धी। टाकूनि जावें युद्धसंधी। हेचि बुद्धी सर्वथा ॥३८॥ रथ कुंज पालाणा। सन्नद्ध करा चतुरंगसेना। घाव घातला निशाणा। केली गर्जना बळिभद्रें ॥३९॥ सेनापती तो सात्त्विक। भारी बळराम नेटक। यादववीरांसी हरिख। अतिसुटंक दरभाळ ॥४०॥ सुख, संतोष आणि स्वानंद। कैवल्यापाशीं निजबोध। तैसा पावला हलायुध। यादववीरीं हरिपाशीं ॥४१॥ नातरी शमदमादि संपत्ती। बोधावेगळी नव्हे निश्चिती। तैसे कौंडिण्यपुरा येती। जेथे श्रीपती उभा असे ॥४२॥ येरीकडे राजकुमरी। अवस्था लागलीसे भारी। कां पां न येचि श्रीहरी। विचार करी लिखिताचा ॥४३॥





कृष्णासी नाहीं विषयगोडी। म्या पत्रिका लिहिली कुडी। जे भार्या होईन आवडी। जाहली अनावडी तेणें कृष्णा ॥४४॥ आढाल ढालाची पै थोर। अभाव भावें अतिसुंदर। दाटोनि रिघों पाहे घर। वशीकरण मज करील ॥४५॥ मग मी होईन तिजआधीन। जिवें जिता करील दीन। अमना आणूनियां मन। नाचवील निजछंदें ॥४६॥ कार्याकारण समस्त। तेचि करील निश्चित। सुचित्त आणि दुश्चित्त। आंदण्या दासी आणील ॥४७॥ तिचा विकल्पिया बंधु। आंदणा येईल कामक्रोधु। तिचा बोळवा गर्वमदु। घरभेदू दाटेल ॥४८॥ माझेनि आंगें थोरावेल। मज ते नांवरूप करील। विषयगोडी वाढवील। मुद्दल वेंचील निजज्ञान ॥४९॥ होईल निर्लज्जा निःशंक। मज देखों न शकती लोक। ऐसें जाणोनि निष्टंक। न योचि देख श्रीकृष्ण ॥५०॥ लिखितीं चुकी पडली मोठी। पावेन शतजन्मांपाठीं। हें देखोनि जगजेठी। उठाउठी न पवेची ॥५१॥ मज नाहीं वैराग्य कडाडी। भेटी न मागेचि रोकडी। माझिया मुखरसाची गोडी। प्रतिबंधक मज झाली ॥५२॥ शिवादि चरणरज वांछित। त्या मज पाठविल लिखित। आंगे उडी न घालीच येथ। आळसयुक्त भीमकी ॥५३॥ लिखितासाठीं जरी मी सांपडे। तरी कां साधक शिणती गाढे। भीमकीं आहे केवळ वेडें। येणें न घडे मज तेथें ॥५४॥ कृष्ण न यावया एक भावो। द्विजें देखिला देवाधिदेवो। विस्मय दाटला पाहाहो। कार्य आठवो विसरला ॥५५॥ कृष्ण देखतां त्रिशुद्धी। ब्राह्मणासी लागली समाधी। हरपली मनोबुद्धी। लग्नशुद्धी कोण सांगे ॥५६॥ जे कृष्णासी मीनले। ते परतोनि नाहीं आले। मज आहे वेड लागलें। वाट पाहें द्विजाची ॥५७॥ मायबापांसी नेणतां। वधूनें पाठविलें लिखिता। हेंचि जाणोनि निंदिता। येता

येतां परतला ॥५८॥ लग्नाआड येक राती। कां पां न येची श्रीपती। परात्पर उपरिये वरती। वाट पाहात उभी असे ॥५९॥ डोळा नलगेचि शेजेशी। निद्रेमाजी देखे कृष्णासी। तेणे स्वप्न-सुषुप्तीसी। जागृतीसी नाठवे ॥६०॥ अन्न न खाय तत्त्वतां। जीविता देखे कृष्णनाथा। गोडी लागली अनंता। न लगे आतां धड गोड ॥६१॥ करूं जातां उदकपान ॥ घोटासवें आठवे कृष्ण। विसरली भूक तहान। लागलें ध्यान हरीचें ॥६२॥ तोंडी घालितां फोडी। घेऊं विसरली ते विडी। कृष्णी लागलीसे गोडी। अनावडी विषयांची ॥६३॥ आळविल्या कानीं नायके। थापटिलीया न चक्के। देह व्यापिले यदुनायकें। शरीरसुखे विसरली ॥६४॥ पाय ठेवितां धरणीं। कृष्णा आठवी रुक्मिणी। सर्वांगी थरथरोनी। रोमांचित होऊनि ठाके ॥६५॥ लीला कमल घेतां हातीं। कृष्णचरण आठवतीं। नयनीं अश्रु लोटती। कृष्णप्राप्तीलागीं पिशी ॥६६॥ गोंविदें हरिलें मानस। जाहली विषयभोगीं उदास। पाहे द्वारकेची वास। मनीं आस कृष्णाचीं ॥६७॥ कां पां न येचि गोविंद। तरी माझेंचि भाग्य मंद। नाहीं पूर्वपुण्य शुद्ध। म्हणउनि खेद करीतसे ॥६८॥ मग म्हणे गा कटकटा। किती करूं गे आहाकटा। मरमर विधातया दुष्टा। काय अदृष्टा लिहिलें असे ॥६९॥ आजिचेनि हें कपाळ। कृष्णप्राप्तीविण निष्फळ। म्हणूनियां भीमकबाळ। उकसाबुकसीं स्फुंदत ॥७०॥ मज नलगे विंजणवारा। तेणें अधिक होतसे उबारा। प्राण रिघो पाहे पुरा। शार्ङ्गधरावांचोनि ॥७१॥ आंगी न लावा गे चंदन। तेणें अधिकचि होय दीपन। माझे निघों पाहती प्राण। कृष्णचरण न देखतां ॥७२॥ साह्य नव्हेचि गे अंबा। विन्मुख जाहली जगदंबा। आतां कायसी लग्नशोभा। प्राण उभा सांडीन ॥७३॥ शिवा भवानी रुद्राणी। कां




पां न पवतीच कोणा। कां विसरली कुळस्वामिणी। चक्रपाणी न पवेचि ॥७४॥ नेत्रीं अश्रूंचिया धारा। दु:खें कांपतसे थरथरां। धरितां न धरवेचि धीरा। विकळ सुंदरा जातसे ॥७५॥ तंव लविन्नला डाबा डोळा। बाहू स्फुरती वेळोवेळां। हीं तंव चिन्हे गे गोपाळा। प्राप्तिकर पैं होती ॥७६॥ कृष्णें सांगितलें द्विजासी। वेगीं जावें भीमकीपासी। थोर चिंता होतसे तिसी। उद्वेगेसीं अपार ॥७७॥ तिसी द्यावें आश्वासन। उदईक आहे तुझे लग्न। तुवां असावें समाधान। पाणिग्रहण मी करीन ॥७८॥ आठां भावांची परवडी। उभवूनि स्वानंदाची गुढी। द्विज धांविन्नला लवडसवडी। घालती उडी त्वरित ॥७९॥ भीमकी करीत असतां चिंता। द्विज देखिला अवचितां। हरिखें वोसंडली चित्ता। प्रसन्नता देखोनि ॥८०॥ पहिला ब्राह्मण अतिदीन ॥ याचें पालटलेंसे चिन्ह। दिसत आहे प्रसन्नवदन। घेऊनि कृष्ण पै आला ॥८१॥ कृष्णदर्शनाची प्राप्ती। द्विज पालटला देहस्थिती। आनंदमय जाहली वृत्ती। लिखितासाठीं द्विजाची ॥८२॥ जीवप्रयाणाची सुमुहूर्तता। भक्तिनवरत्नांचें तारूं बुडतां। धैर्याचा स्तंभ पडतां। जाहला रक्षिता सुदेवो ॥८३॥ मरतया अमृतपान। किंवा अवर्षणीं वर्षे घन ॥ दुष्काळलिया जेवीं मिष्टान्न। तेवीं आगमन द्विजाचें ॥८४॥ मोहअंधारीं मणी पडला। तों युक्तीच्या हातीं चांचपडिला। न सांपडतां दीप लाविला। कृष्णागमनसुखाचा ॥८५॥ यापरी आला तो ब्राह्मण। कृष्णागमन भीमकीप्राण। घेऊनि आला जी संपूर्ण। जीवदानी सुदेवो ॥८६॥ ब्राह्मण म्हणे ना मीं आतां। घेऊनि आलों वो अनंता। देखिला गरुडध्वज झळकता। आनंद चित्ता न समाये ॥८७॥ आंगींची उतटली कांचोळी। मुद्रिका दाटली आंगोळी। सर्वांगे हरिखली वेल्हाळी। जीवें वोंवाळी

द्विजातें ॥८८॥ याचिया उपकारा उत्तीर्णता। पाहतां ने देखों सर्वथा। जेणें आणिले श्रीकृष्णनाथा। त्यासी म्यां आतां काय द्यावें ॥८९॥ यालागीं हो सद्गुरूसी। उत्तीर्णता नाहीं शिष्यांसी। कवण द्यावें पदार्थासी। हें वेदांसी न बोलवे ॥९०॥ चिंतामणी दे चिंतिल्या अर्था। कल्पतरू तो कल्पिलें देता। सद्गुरु दे निर्विकल्पता। त्यासी उत्तीर्णता कैसेनि ॥९१॥ जो चुकवी जन्ममरण। त्यासी नव्हेचि उत्तीर्ण। कोटिजन्मांचे जन्ममरण। चुकविलें येणे गुरुनाथें ॥९२॥ देहें उतराई होऊं गुरुसी। तंव नश्वरता या देहासी। नश्वरें अनश्वरासी। उत्तीर्णता कैसी घडे ॥९३॥ जीवें व्हावे उतराई। तंव तो समूळ मिथ्या पाहीं। जीवासी जीवपण नाहीं। होईल काई उतराई ॥९४॥ गुरूसी उतराई होतां। न देखों कवणिया पदार्था। यालागीं चरणीं ठेविला माथा। मौनेंकरूनि रुक्मिणी ॥९५॥ मनीं देखोनि साचार भावो। अति संतोषला सुदेवो। तुझेनि धर्मे आम्हां पाहा हो। कृष्णप्राप्ती साचार ॥९६॥ श्रीकृष्ण आला परिसोन। भीमकी पावली समाधान। उल्हासयुक्त जाहलें मन। हर्षे त्रिभुवन कोंदले ॥९७॥ करितां अंबिकापूजन। कृष्ण करील भीमकीहरण। एका विनवी जनार्दन। श्रोतीं ध्यान मज द्यावें ॥९८॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणी-स्वयंवरे पंचम: प्रसंग: ॥५॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥



## ॥ प्रसंग सहावा ॥



श्रीगणेशाय नम:। भीमकीचा विवाहसंभ्रम। पाहों आले कृष्ण राम। हें परिसोनि भीमकोत्तम। दर्शना सकाम ऊठिला ॥१॥ भेरी निशाण मृदंग। नाना वाजंत्रे अनेग। पूजासामुग्री घेऊनि साङ्ग। समारंभेसीं पैं आला ॥२॥ कृष्ण देखोंनि सावधान। केलें साष्टांग नमन। कृष्णें दिधलें आलिंगन। विस्मित मन रायाचें ॥३॥ मूळेंवीण तूं आलासी। परमसुख हें आम्हांसी। शब्देंवीण सोयरा होसी। तूं जाणसी ब्रह्मसूत्र ॥४॥ वर वरिष्ठ कृष्णदेवो। मनी धरूनि हाचि भावो। मधुपर्कविधी पाहा हो। पूजाविधान करीतसे ॥५॥ नानापरीची उपायनें। वस्त्रें अलंकार भूषणें। अंगिकारिलीं श्रीकृष्णें। जीवींची खूण जाणोनी ॥६॥ बळिभद्रादि प्रमुख। जे आले यादवादिक। त्यांची पूजा केली देख। यथोचित विधानें ॥७॥ राव म्हणे श्रीहरी। आतां चलावें नगरांतरीं। समारंभेसीं सहपरिवारीं। चलावें झडकरी कृपाळुवा ॥८॥ जानवसा नगराआंत। देतां बोलिला कृष्णनाथ। विरोध आम्हां मागधांत। निकट वास करूं नये ॥९॥ जवळी राहतां बोलाबोली। शोभनामाजी वाढेल कळी। निकरा जाईल रांडोळी। आम्हां आणि रुक्मिया ॥१०॥ यासाठीं पाउलें दोन दूरी। राहूं नगराबाहेरी। ठाव द्यावा अंबिकापुरीं। ऐसें श्रीहरी बोलिला ॥११। तंव राव हांसिन्नला मनीं। होय बुद्धिमंत शार्ङ्गपाणी। ठाव दिधला अंबिकाभुवनीं। घाव निशाणीं घातला ॥१२॥ राजा म्हणे चक्रपाणी। मार्ग आहे नगरामधूनी। कृष्णदर्शना उदित राणी। यालागोनि बुद्धि केली ॥१३॥ जाणोनियां तो भावो। रथीं

चढला श्रीकृष्णदेवो। आपणाजवळी बैसविला रावो। थोर उत्साहो मांडिला ॥१४॥ लागली वाद्यांची घाई। चवरें ढळती दोहीं बाहीं। बंदीजन गर्जती पाहीं। कृष्णकीर्तीही कीर्तनें ॥१५॥ छेदावया हृदयबंध। साधकांमाजी रिघे बोध। तैसा प्रवेशला गोविंद। नगरामाजी निजबळें ॥१६॥ नगरा आला श्रीकृष्ण। नगरनागरिक जन। उतावेळ कृष्णदर्शन। करावया धांविन्नले ॥१७॥ कृष्ण पाहावया नरनारी। मंडपघसणी होतसे भारी। एक चढले माडिया गोपुरीं। पाहावया श्रीहरी स्वानंदें ॥१८॥ कृष्णमुखकमळ सुंदर। जननयन तेचि भ्रमर। तेथेंचि गुंतले साचार। कृष्णआमोदरसभावें ॥१९॥ नयनद्वारें प्राशन। करूनि हृदयीं आणिती कृष्ण। सबाह्य पाहाती समान। समदृष्टी कृष्णातें ॥२०॥ ऐसा देखोनि श्रीपती। कृष्णमय जाहली वृत्ती। लवों विसरलीं नेत्रपातीं। कृष्णमूर्ती पाहातां ॥२१॥ घेऊनि निजबोधाची वेताटी। विवेक दृश्याची मांदी लोटी। तैसा सात्त्विक जगजेठी। जनां सकळिकां वारिता ॥२२॥ मागें परमात्मा कृष्णवीर। करूनि निजबोधाचा भार। चालतसे स्थिरस्थिर। आत्मस्थितीच्या पाउलीं ॥२३॥ बोलती नरनारी सकळा। काल मिरविले गे शिशुपाळा। ने देखो नोवरेपणाची कळा। नाहीं जिव्हाळा लग्नाचा ॥२४॥ कृष्णा नोवरा भीमकीलागीं। भीमकी होय कृष्णाजोगी। सृष्टी शोभत इंहीच दोघी। तिसरें जगीं न देखों ॥२५॥ आमुचें जन्मोजन्मींचें सुकृत। शुद्ध पुण्य जें शोभिवंत। तेणें तरी कृष्णनाथ। भीमकीकांत हो लग्नीं ॥२६॥ ऐसे आशीर्वाद देती। कृष्णरूपीं वेधल्या वृत्ती। प्रत्यावृत्ती हरि पाहती। नाहीं उपरती जनासी ॥२७॥ कृष्णों केला मेळिकार। भीमकें केला आदर थोर। सकळ सैन्य पाहणेर। यथोचित यादवांतें ॥२८॥ भीमकें देखिलें कृष्णासी।



दृष्टी जडली त्या रूपांसी। साखरेवरूनी नुठे माशी। तेवी रायासी जाहलें ॥२९॥ भीमकें पूजिले कृष्णासी। विकल्प वाटेल चैद्यासी। यालागीं सकळिकां रायांसी। पूजा विधीसीं मांडिली ॥३०॥ यथा कुल तथा शील। जैसे वीर्य तैसे बळ। तदनुसार राजे सकळ। भीमकें केवळ पूजिलें ॥३१॥ कृष्ण आणि हलायुध। आले ऐकोनि चैद्य मागध। दचकोनि म्हणती विरोध। थोर आम्हां मांडले ॥३२॥ कृष्ण आला महाबळी। ऐकोनि चिंतेची काजळी। वाढिन्नली हृदयकमळीं। तोडें काळीं तेणे झालीं ॥३३॥ मागध परस्परें आपणांत। कुजबुज करूं लागले बहुत। एकमेकांते खुणवित। समस्त त्यात मीनले ॥३४॥ भीमकें पूजिलें कृष्णासी। केला मधुपर्क विधानेंसी। तोही मीनला आहे त्यांसी। आहाच आम्हांसीं सोयरीक ॥३५॥ लग्न लागलियापाठीं। कायसी यादवांची गोष्टी। कार्य करूं दाटोदाटी। आम्ही जगजेठी असतां ॥३६॥ रुक्मिया आहे आम्हांकडे। भीमके सात्त्विक तें बापुडे। म्हातारपणीं जाहलें वेडें। त्यांचे त्यापुढें काय चाले ॥३७॥ वेगीं विस्तारा पां फळ। सन्नद्ध जाले वीर सकळ। तूर्ये लागली प्रबळ। घावो निशाणी घातला ॥३८॥ शुद्धमती म्हणे रायासी। तुम्ही विसरलेति कुळधर्मासी। कन्या न्यावी अंबिकेसी। गौरीहरासी पूजावया ॥३९॥ तंव रायाचा ज्येष्ठ कुमर। ऐकोनि कोपा चढिन्नला थोर। मिथ्या बायकांचा विचार। केंवि साचार मानितां ॥४०॥ श्लोकः ॥ आत्मबुद्धिर्हितार्थाय गुरुबुद्धिर्विशेषतः। परबुद्धिर्विनाशाय स्त्रीबुद्धिः प्रलयावहा ॥१॥ टीका ॥ आपुली बुद्धी ते हितासी। गुरुबुद्धि त्याहून विशेषी। परबुद्धि विनाशाशी। मूळ प्रळयासी स्त्रीबुद्धि ॥४१॥ अंबालयीं यादव वीर। उतरले असती अकर्माकार। हिरोनी नेतील

सुंदर। लाज थोर होईल ॥४२॥ ऐसें बोले रुक्मिया वीर। करूं नये आणीक विचार। कार्या साधावें सत्वर। मग हो कां भलतेंचि ॥४३॥ राजा म्हणे कट-कटा। व्यर्थ आलासी माझिया पोटा। नव्हेसी वीरवृत्तिलाठा। अतिकरंटा नपुंसक ॥४॥ अजि कळली तुझी बुद्धी। वाटीव नुसधी हांडिया-सांधी। हागीर भ्याड तूं त्रिशुद्धी। गाढा बुद्धि नव्हेसी ॥४५॥ वर्मी खोंचला रुक्मिया। कन्या नेईन अंबालया। ख्याती लावीन यादवां तयां। मज कोपलिया कोण साहे ॥४६॥ ऐसें होतें माझे पोटीं। लग्न लागलियांपाठीं। दोघें वधूवरें गोमटी। न्यावीं भेटी जगदंबे ॥४७॥ ऐसा नव्हेचि कुळधर्म। लग्नापूर्वील हा नेम। सिद्धी पाववीन सुगम। पराक्रम पाहें माझा ॥४८॥ ऐसें सांगोनि रायासी। वेगीं आला चैद्यांपासीं। गुज सांगतसे तयांसी। विघ्न लग्नाली वोढवलें ॥४९॥ कृष्णाकडे आमुचा पिता। जीवेंभावें तिकडेच माता। कार्याकारण प्रपंचता। मिथ्या दाविती आम्हांकडे ॥५०॥ ऐका आमुच्या कुळधर्मासी। नोवरी न्यावी अंबिकेसीं। सन्नद्ध होऊन दळभारेंसी। आलें तुम्हांसी पाहिजे ॥५१॥ येरीकडे चौथे बंधु। घेऊनि निघाले जी वधु। करूनि दळभारु सन्नद्ध। महावीर उदित ॥५२॥ मी तरी परवडी आढावाची। शस्त्रें उघडीं हातीं त्यांचीं। मागें परवडी धनुर्धरांची। शितें धनुष्यासी वाइलीं ॥५३॥ तयामागें वीर घोडीं। रथ जोडियले जोडी। वर बैसले परवडीं। शस्त्रें उघडीं झळकती ॥५४॥ तयांमागें कुंजरथाट। गळां सांखळिया एकवट। खिळिले चालती गजघंट। दुर्ग अचाट सैन्याचे ॥५५॥ भक्तजनाचिया काजा ॥ जेवीं करिती आवरणपूजा। तेवी सैन्य रचिलें वोजा। कृष्णभाजा भीमकिया ॥५६॥ नातरी उपासनायंत्र ॥ तैसें दिसे सैन्यसूत्र ॥ भीमकी मध्यपीठ पवित्र।



कृष्णक्षेत्र निजबीज ॥५७॥ जेवीं साधनचतुष्टयसंपत्ती। परमात्मयासन्मुख करिती वृत्ती। तैसे चौघे बंधू घेऊनि येती। कृष्णासन्मुख भीमकी ॥५८॥ नातरी जैसे चारी वेद। उपनिपदें करिती बोध। वृत्ति स्वयें देखे निजपद। तैसे बंधू भीमकीसी ॥५९॥ नातरी चारी पुरुषार्थ जैसे। भक्तापाशीं येती आपैसे। चारी बंधू जाण तैसे। भीमकीसरिसे चालती ॥६०॥ वैराग्य विवेकाचेनि बळी। तैसा रुक्मरथ रक्ममाळी। मागें पुढें जी सांभाळी। परिके जवळी येऊं नेदी ॥६१॥ स्वानंद आणि अनुभवू। जीवाहून आवडती बहू। तैसे रुक्मकेली रुक्मबाहू। दोघे भाऊ दोहीं भागी ॥६२॥ ऐसे भीमकीच्या चहूं भागीं। चौघे बंधू रंगले रंगीं। भीमकीसवें चालती वेगीं। धन्य जगीं रुक्मिणी ॥६३॥ वडील बंधु चौघांहूनी ॥ जो अतिगर्वित अभिमानी। तो सांडिलासे त्यजूनी। साधुजनीं जेवि निंदा ॥६४॥ कृष्णद्वेषिया तो खरा। मिळणी मीनला असुरां। म्हणूनि त्यजिला परबाहिरा। नव्हे सोयिरा निजाचा ॥६५॥ भोग त्यजूनि वैरागी ॥ योगसाधना निघे योगी। तैसी माया माहेर सांडूनि वेगीं। चरणचाली निघाली ॥६६॥ लोकप्रतिष्ठा महंती। बैसावें अश्वगजरथीं। जेणें होय कृष्णप्राप्ती ॥ भीमकी गती ते जाणे ॥६७॥ पारिखा पाईं कृष्ण ठाके। हें बोलणें समूळ लटिकें। ऐसें जाणोनि निष्टंकें। चरणीं चामके वैदर्भी ॥६८॥ कृष्णचरणीं जडलें मन ॥ यालागीं वाचें पडलें मौन। दृढ लागलें अनुसंधान। सहजस्थिति चालली ॥६९॥ आत्मसाक्षात्कारवृत्ती। अनिवार अहिंसादिक येती। तेवीं भीमकीसवें समस्ती। सखिया धांवती स्वानंद ॥७०॥ जे कां निरपेक्ष मानसीं। सिद्धी तिष्ठती सेवेसी। तैसा सखिया भीमकीपाशीं। उपचारेंसी चालती ॥७१॥ वडिलांमाजी वडीलपणीं।

निजशांतीची स्वामिणी । वागवीतसे रुक्मिणी । अग्रगणी सकळिकां ॥७२॥ बोधपुत्राच्या जननी । ब्रह्मवेत्त्यांच्या ब्राह्मणी । अकामकामाचिया कामिनी ॥ सवें सुवासिनी चालती ॥७३॥ जैसा अनुहताचा गजर ॥ तैसीं तुरें वाजती अपार । नादें कोंदले अंबर । शब्दाकार नभ झालें ॥७४॥ पहिले उठिले घंटानाद । मागें किंकिणींचे शब्द । मधुर शंखांचे अनुवाद । वीणावेणू रुणझुणती ॥७५॥ नादें उठिल्या झल्लरी । मृदंगध्वनी त्यामाझारीं । निशाणीं दुमदुमिल्या भेरी । नादाभीतरी मन निवे ॥७६॥ कृष्णकीर्तीचिया कीर्तनीं । चौघीजणी गाती गाणीं । त्यापुढें नाचणी नाचती । चारी मुक्ती उदास ॥७७॥ कृष्ण वर्णावया श्रेष्ठ । चौघे गर्जताती भाट । अठरा मागध अतिउद्भट । वंशावळी वर्णिती ॥७८॥ कळा वाढविती शब्द । साहीजणांशी विवाद । युक्तिप्रयुक्तीचे बोध । नाना छंद शब्दांचे ॥७९॥ पातली अंबिकेचें रंगण । केलें करचरणक्षालन । रुक्मिणीचें सावध मन । शुद्धाचमन तिनें केलें ॥८०॥ श्रद्धापूजेचे संभार । शुद्ध सुमनांचे पैं हार । चिद्रत्नांचे अलंकार । विरजांबर पूजेसी ॥८१॥ देवालया आली हरिखें । अंबा पाहतां कृष्णाचि देखे । येणें रूपें यदुनायकें । पाणिग्रहण करावे ॥८२॥ सावध होऊनि पाहे चित्ता । म्हणे हे आमुची कुळदेवता । आपुल्या रूपें दावी अनंता । होईल भर्ता निश्चित ॥८३॥ हरिखें वोसंडली पोटीं । मग बांधिली शकुनगांठी । अतिउल्हासें गोरटी । पूजा विधीसीं मांडिली ॥८४॥ षोडशोपचारीं पूजा । करिती जाहली भीमकात्मजा । विधी सांगती द्विजभाजा । गरुडध्वजप्राप्तीसी ॥८५॥ वस्त्रें अलंकार भूषणें । नाना उपचार बलिदानें । दीपावली नीरांजने । सावधानें अर्पिलीं ॥८६॥ कृष्ण धरूनियां मानसीं । भीमकी पुजी द्विजपत्न्यांसी । जें जें




बोलिलें विधीसी । तें तें त्यांसी दीधलें ॥८७॥ निंबें नारिंगें नारिकेळें । अपूप लाडू अमृतफळें । इक्षुदंड आंबे केळें । सुवासिनींसी दीधलीं ॥८८॥ मुक्ताफळेंसीं आभरणें । सौभाग्यद्रव्यें कंठाभरणें । हळदी जिरें लवण धणे । दिधलीं वाणें नारींसी ॥८९॥ होती नीलोत्पलांची माळा । ते घातली जगदंबेच्या गळां । वर देईं वो घनसांवळां । उचितकळां आजिच्या ॥९०॥ म्हणोनि विसर्जिलें मौन । करूं आदरिलें स्तवन । मनामागें ठेवोनि मन । सावधान स्तवनासी ॥९१॥ जयजय वो अव्यक्तव्यक्ती । जयजय वा अमूर्तमूर्ती । जयजय वो विश्वस्फूर्ती । चिच्छक्ती चिन्मात्रे ॥९२॥ जयजय वो जगदंबे । जयजय वो आरंभस्तंभे । जयजय वो सौभाग्यशोभे । स्वयंस्वयंभे कुमारी ॥९३॥ जयजय वो अनादि । नाकळसी तूं मनोबुद्धी । देवोदेवी इंही शब्दीं । तूं त्रिशुद्धी नांदसी ॥९४॥ शिवा तुझेनि शिवपण । जीवा तुझेनि जीवपण । देवा तुझेनि देवपण । निजकारण तूं माये ॥९५॥ तुझेनि शब्दांदिका शोभा । तुझेनि नभत्व आले नभा । तूंचि मूळ प्रारंभा । विश्वकदंबा जीवन तूं ॥९६॥ तुझी उघडलिया दृष्टी । नांदों लागे सकळ सृष्टी । तुवां उपेक्षिलियापाठीं । देवांही नुठी देवपण ॥९७॥ ॐ पुण्याहं सुमुहूर्तीं । लग्न लावणें तुझे हातीं । मज नोवरा श्रीपती । समूळ कर्ती तूं माये ॥९८॥ ऐसा स्तुतिवाद करितां । कंठींची माळ आली हाता । येचि माळें श्रीकृष्णनाथा । वरीन आतां निर्धारें ॥९९॥ महाप्रसाद सर्वथा । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । आशीर्वाद देती समस्ता । पतिव्रता द्विजपत्न्या ॥१००॥ येणें उल्हासें सुंदरा । वरूं निघे श्रीकृष्णवरा । स्वानुभवाचा सेवक खरा । त्यातें करी धरूनी ॥१०१॥ भीमकीसौंदर्य अमूप । जिचेनि जगा नांव रूप । तिचे लावण्याचे दीप । मुख्य स्वरूप केवीं वर्णूं ॥१०२॥ जियेतें

स्रजूं न शके चतुरानन। कृष्णप्रभावें स्वरूप पूर्ण। तिचिया स्वरूपाचें वर्णन। एका जनार्दन वर्णीतसे ॥१०३॥ इति श्रीमद्भागवते महापुराणें दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे अंबिकापूजनं नाम षष्ठ: प्रसंग: ॥६॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥





## ॥ प्रसंग सातवा ॥

श्रीरुक्मिणीकांताय नम: ॥ श्रीकृष्णभक्तीलागीं देखा। नवविधा भक्तीसी आवांका। तैशा नवरत्नमुद्रिका। भीमककन्यका लेइलीसे ॥१॥ सकळ सौंदर्याची खाणी। बरवेपण तिजपासूनी। स्वरूपरूपाची जननी। वीरीं रुक्मिणी देखिली ॥२॥ सुरवरपन्नगांच्या ठायीं। हिंडतां सौंदर्या विश्रांति नाहीं। म्हणवुनी धांविन्नलें लवलाहीं। भीमकीदेहीं विश्रांति ॥३॥ भीमकीकृष्णां आलिंगन। तेणें सौंदर्या समाधान। तिहीं लोकींचें बरवेपण। भीमकीपाशीं धांविन्नलें ॥४॥ ऐकोनि जिचिया सौंदर्यासी। वेध लागला श्रीकृष्णासी। ती भीमकी वर्णावी कैसी। सीमा रूपासी न करवे ॥५॥ नाहीं स्रष्ट्यानें स्रजिली। कृष्णप्रभावें रूपा आली। बरवेपण सीग चढली। साकारली सौंदर्यें ॥६॥ गगन शून्यत्वा उबगले। कृष्णभेटीसी उदित जाहलें। भीमकीमस्तकासी आलें। निरालंबें शोभत ॥७॥ मस्तकींचे नील कुंतल। तेंचि नभ अतिनीळ। तळीं मुखचंद्र निर्मळ। भीमकीमुखीं उगवला ॥८॥ चंद्र क्षीण कृष्णपक्षीं। म्हणे हा पूर्वील माझा बंधु कीं। म्हणूनि कळवळली भीमकी। तो निजमुखीं धरियेला ॥९॥ भीमकीमुखीं निष्कळंक। क्षयातीत पूर्ण शशांक। कृष्णप्राप्तीसी मयंक। भीमकीमुखी उगवला ॥१०॥ चंद्र पूर्ण पौर्णिमा एकीं। येरवीं क्षयवृद्धी त्या ये लोकीं। तो सदा भीमकीमुखीं। निजात्मसुखीं परिपूर्ण ॥११॥ चंद्रमंडळा मागेंपुढें। जैसे तारागणांचे वेढे। तैशीं मोतिलग तानवडें। दोहींकडे तळपती ॥१२॥ श्रीकृष्णवेधे वेधली खरी। म्हणवुनी विसरली ते भोंवरी। भोंवरिया

कृष्णमायेचा करी। ये अवसरीं ते नाहीं ॥१३॥ भोंवरी नसतां पक्षपाती। पंखे दोहींकडे झळकती। भोंवरियाभागीं मिरवती। भेटी होईल निजकर्णी ॥१४॥ भीमकी थोर कपाळाची। कृष्णदैवें ते दैवाची। निढळीं प्रभा श्यामतेची। तोचि कस्तूरीमळवट ॥१५॥ चंद्रबिंबीं श्यामरेखा। तैसा भाळीं मळवटु देखा। भोंवया रेखिल्या कृष्णरेखा। अतिसुरेखा व्यंकटा ॥१६॥ कृष्ण पाहावया जगजेठी। भोंवई सांडिली व्यंकटी। कृष्णीं मीनलिया दिठी। सहज गांठी सुटेल ॥१७॥ श्रीकृष्णरंगें सुरंग। अहेवपण तेणें अमंग। तेचि कुंकुम पैं चांग। मुखचंद्रीं चंद्रमा ॥१८॥ नभीं इंद्रधनुष्यरेखा। तैसा भांगीं शेंदूर देखा। भुलवावया यदुनायका। मोहिनीमुखा पूजियेलें ॥१९॥ ना ते सरस्वती बोधीं। आली कृष्णभेटीलागीं। जीव शिव हांसळिया दोहीं भागीं। मुक्तलगीं तटस्थ ॥२०॥ जैसीं नक्षत्रें नभमंडळीं। तैसी मुक्तमोतियांची जाळी। लेइलीसे भीमकबाळी। तेणें वेल्हाळी शोभत ॥२१॥ त्याहीवरी भक्तिफरा। झळकत नवरत्नांचा खरा। खुणावीतसे सुरनरां। भजा यदुवीरा निजभावें ॥२२॥ दृश्य देखतां शिणले नयन। धणीचें घ्यावया कृष्णदर्शन। एकत्र होऊनि देखणेपण। भीमकीलोचना पैं आले ॥२३॥ पहावया घनसांवळा। कृष्णश्यामता आली बुबुळां। आसावली दोन्ही डोळां। सबाह्य देखणें समदृष्टी ॥२४॥ कृष्ण देखावया निधान। नयनीं सूदलें अंजन। सोगयाचें झळंबपण। कटाक्षबाणपिसारे ॥२५॥ भीमकीकटाक्षाच्या धायीं। मदन पाडिला ठायींच्या ठायीं। सुरनरांचा पाड कायी। निधडा पाहीं श्रीकृष्ण ॥२६॥ मुखा मुख शोभनिक। श्लेष्मागमनें शिणलें नाक। तें भीमकीमुखा येऊनि देख। नाका बीक पैं चढले ॥२७॥ कृष्णसुवास आवडी। तेणें नाकासी





लागली गोडी। दोन्ही नाकपुडियांबुडीं। दिधली बुडी वसंतें ॥२८॥ अधर दोन्ही जालें सधर। बिंबफळें रंगाकार। ते तंव परिपाके नश्वर। हे अनश्वर हरिरंगें ॥२९॥ भीमकी अधरामृतगोडी। श्रीकृष्णाचि जाणे फुडी। एकाएकीं घालूनि उडी। नेईल रोकडी प्रत्यक्ष ॥३०॥ मुखामाजी दंतपंक्ती। जैशा ॐकारामाजी श्रुती। चौकींचे चारी झळकती। सोऽहं स्थिती सोलिंव ॥३१॥ अधरातळीं हनुवटी। गोरेपणें दिसे गोमटी। येथेंही श्यामप्रभा उठी। कृष्णवर्ण गोंदिलें ॥३२॥ वनिताअधरीं सुवर्णफांसा। पडोन मुक्त आलें नासा। भेटावया कृष्णपरेशा। उपाव कैसा देखिला ॥३३॥ भीमकीनाकींचें सुपाणी। सहज देखेल शारंगपाणी। अधोमुख अधिष्ठानी। बोळकंबत हरिलागीं ॥३४॥ हळदी मीनली हेमकळा। तेणें उटिलें मुखकळा। तेज झळके गंडस्थळा। सूर्यकळा लाजल्या ॥३५॥ भीमकीमुख-कमळ सुंदर। कृष्णनयन तेचि भ्रमर। आमोद भावाचें शेजार। निजमंदिर हरीचें ॥३६॥ कृष्णमयी अहेवतंतु। कंठीं धरिला न तुटतु। दिसों नेदी लोकांतु। केला एकांतु निजकंठीं ॥३७॥ फिटला चिंतेचा दचकू। म्हणोनि न घाली चितांकू। कृष्णपदींचा पदांकू। तेंचि पदकू हृदयींचें ॥३८॥ पृथ्वी नवखंडें खंडिली। जडजाड्यत्वा उबगली। भीमकीचे अंगीं रिघाली। सुनीळ घाली कांचोळी ॥३९॥ पावावया कृष्णदेवो। सांडिला सवतीमत्सरभावो। आलिंगावया कृष्णरावो। धरा पाहाहो धांविन्नली ॥४०॥ एके अंगी भिन्नपणीं॥ जीव शिव वाढिन्नले दोनी। तेणें जाली व्यंजनस्तनी। कुचकामिनी कुचभारें ॥४१॥ विद्या अविद्या पाखें दोनी। आच्छादिले दोही स्तनीं। दाटले त्रिगुणांचे कसणीं। कृष्णावांचोनि कोण सोडी ॥४२॥ भीमकीकृष्णालिंगन। तेणें जीवशिवा

समाधान। यालागीं दोनी उचलले जाण। कृष्णस्पर्शन वांछिती ॥४३॥ मुक्त नांव मुक्तफळा। नेणती मुक्तीचा जिव्हाळा। म्हणोन पडली भीमकीगळां। भेटी गोपाळा माळ जाली ॥४४॥ पूर्वी क्षीरसिंधुची बाळा। नेसली क्षीरोदक पाटोळा। ना तो पाहावया घनसांवळा। कांसे लागला क्षीराब्धी ॥४५॥ माझी कन्या हे गोरटी। झणीं कोणाची लागेल दृष्टी। म्हणोनि घातलीसे कंठीं। रत्नमाला क्षीराब्धी ॥४६॥ प्रकृतिपुरुषां पडली मिठी। तैसें बिरडें कांचोळिये दाटी। कृष्ण सोडील जगजेठी। आया बायां न सुटेचि ॥४७॥ शमदमांची सुभटें। हस्तकडगे बहुवटें। करीं कंकणें उद्भटें। कृष्णनिष्ठे रुणझुणती ॥४८॥ क्षणक्षणां दिशा उजळे। तैसीं शोभती दशांगुळें। दशावतारांचिये लीळें। जडित कीळें मुद्रिका ॥४९॥ पाहातां तळहाताच्या रंगा। उणें आणिलें संध्यारागा। करी चरणसेवा श्रीरंगा। तळवा तळहातीं सदा ॥५०॥ आटूनिया हेमकळा। आटणी आटिल्या बारा सोळा। वोतीव केली कटिमेखळा। मध्यें घननीळा जडियेलें ॥५१॥ दोहींकडे मुक्तलग। तेणें शोभत मध्यभाग। भीमकी भाग्याची सभाग्य। तेणें श्रीरंग वेधिला ॥५२॥ चरणीं गर्जती नू पुरें। वांकी आंदुवाचेनि गजरें। झालें कामासी चेइरें। धनुष्य पुरें वाइलें ॥५३॥ कृष्ण धरूनिया चित्तीं। भीमकी चालतसे हंसगती। चैद्य मागध पाहाती। मदनें ख्याती थोर केली ॥५४॥ माझी अभिलाषिती जननी। म्हणोनि विंधिले कामें बाणीं। वीर पडिले धरणीं। कामबाणीं मूर्च्छित ॥५५॥ कामें हरितल्या दृष्टी। धनुष्यें गळालीं पैं मुष्टी। भीमकी राखावी गोरटी। हेंही पोटीं विसरले ॥५६॥ रथींचे उलंडले थोरथोर। अश्वांहूनि पडले वीर। गजींचे कलथले महाशूर। रिते कुंजर गळदंडीं ॥५७॥ भीमकी पाहातसे सभोंवतें। तंव





वीर भेदिले मन्मथें। कृष्ण त्रिशुद्धी नाहीं येथें। जेणें कामातें जिंकिलें ॥५८॥ रमारमणीं एकांतीं। मीनल्या काम नुपजे चित्तीं। यालागीं नामें तो श्रीपती। भाव निश्चिती भीमकीचा ॥५९॥ कामबाणीं नव्हे च्युत। यालागीं नावें तो अच्युत। भोग भोगूनि भोगातीत। कृष्णनाथ निर्धारें ॥६०॥ कृष्ण पहावया लोभें उठी। आडवे केश सलोभदृष्टी। धरूनि ऐक्याचिये मुष्टी। सुमनें वीरगुंठी बांधिली ॥६१॥ कृष्ण पाहावया भाव एक। तो तंव अर्काचाही आदिअर्क। नयनीं नयना प्रकाशक। यदुनायक केवीं दिसे ॥६२॥ निजभावें पाहे गोरटी। तंव घनश्याम पाहे दृष्टीं। लाज वृत्ति झाली उफराटी। तंव जगजेठी पावला ॥६३॥ उपरमोनि पाहे सुंदरी। तंव अंगीं आदळला श्रीहरी। प्रेमें सप्रेम घाबरी। करीं धरी निजमाळा ॥६४॥ वीरांच्या अभिमाना जाला अस्त। माध्यान्हीं आला गभस्त। मुहूर्तीं मुहूर्त अभिजित। समयो वर्तत लग्नाचा ॥६५॥ काळ सावधान म्हणत। सूर्य लग्नघटिका पाहात। वियोग अंत:पट सोडीत। भावार्थ म्हणत ॐ पुण्या ॥६६॥ भीमकी पाहे कृष्णवदन। नयनीं गुंतले नयन। दोहींचा एक जाला प्राण। पाणिग्रहण जीवशिवां ॥६७॥ ऐसिया भावाचेनि निवाडें। माळा घाली वाडेंकोडें। वीर मूर्च्छा व्यापिले गाढे। आडवा पुढें कोणी न ये ॥६८॥ यापरी शारंगपाणी। रथीं वाहोनि रुक्मिणी। निघता झाला तत्क्षणीं। प्रगट कोणी न देखो ॥६९॥ एकाएकीं वनमाळी। रथीं वाहोनि भीमकबाळी। आला यादवांजवळी। पिटिली टाळी सकळिकीं ॥७०॥ त्राहाटिल्या निशाणभेरी। गगन गर्जे मंगळतुरीं। देव पुष्पें वर्षती अंबरीं। जयजयकारीं प्रवर्तले ॥७१॥ यादव गर्जती महावीर। सिंहनाद करिती थोर। भीमकी आनंदें निर्भर।

वरिला वर श्रीकृष्ण ॥७२॥ हरिखें नाचत नारद। आतां होईल द्वंद्वयुद्ध। यादव आणि मागध। झोटधरणीं भिडतील ॥७३॥ रथ लोटतील रथांवरी। कुंजर आदळतील कुंजरीं। असिवार असिवारांवरी। महावीरीं महावीर ॥७४॥ शस्त्रें सुटतील गाढीं। वीर भिडतील कडोविकडी। डोळेभरी पाहीन गोडी। शेंडी तडतडी नारदाची ॥७५॥ थोर हरिखें पिटिली टाळी। साल्या मेहुण्यां होईल कळी। कृष्ण करील रांडोळी। तेही नवाळी देखेन ॥७६॥ एका जनार्दन म्हणे। रुक्मिणीहरण केलें कृष्णें। वीर खवळतील धांवणें। युद्ध सत्राणें होईल ॥७७॥ रसाळ कथा आहे पुढां। रणीं नाचेल रणधेंडा। वोवाळणी बाणप्रचंडा। परस्परें पडतील ॥७८॥ ऐका युद्धाची कुसरी। युद्ध मांडेल कवणेपरी। क्रोधें झुजतां झुजारीं। मुक्ती चारी कामाच्या ॥७९॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे भीमकीहरणं नाम सप्तमः प्रसंगः ॥७॥

॥ श्रीगोपालकृष्णार्मणमस्तु ॥





## ॥ प्रसंग आठवा ॥

श्रीकृष्णाय नमः ॥ रिघोनि जंबुकांमाझारीं। आपुला भाग ने केसरी। तैसी वेढिली महावीरीं। नेली नोवरी श्रीकृष्णें ॥१॥ सांगातिणी जिवेंभावें। जडल्या होत्या भीमकीसवें। त्या त्यजूनि कृष्णदेवें। नेली निजभावें भीमकी ॥२॥ आंदण्या अविद्येच्या दासी। मोहममतेच्या सखियांसी। सांडूनि नेलें भीमकीसी। उकसाबुकसीं स्फुंदती त्या ॥३॥ सुडावीत नेली वधू। लाजिन्नला अभिमानिया बंधू। अपूर्णकामें उपजे क्रोधू। तैसा मागधू धांविन्नला ॥४॥ कोणीं नेलें गे नोवरीसी। येरी म्हणती लाज नाहीं तुम्हांसी। राखों आलेति भीमकीसी। शेखीं आम्हांसी पूसतां ॥५॥ जळो तुमचें दादुलेपण। नपुंसकाहूनि हीन। वृथा गेली आंगवण। काय वदन दावितां ॥६॥ ॥श्लोकः॥ स्यंदने गरुडकेतुमंडिते कुंडिनेशतनयाधिरोपिता। केनचिन्नवतमालकांतिवच्छ्यामलेन पुरुषेण नीयते ॥१॥ टीका ॥ गरुडध्वज झळके ज्यासी। तोडर गर्जे चरणांसी। विजू खिळिली मेखळेली। तैसा कांसेसी पीतांबर ॥७॥ टिळक रेखिला पिवळा। मुकुट कुंडलें वनमाळा। डोळस सुंदर सांवळा॥ भीमकबाळा तेणें नेली ॥८॥ मागध म्हणे गेली वाटीव। धैर्य गांभीर्य वैभव। यश कीर्तीची राणीव। नेली सर्व यादवीं ॥९॥ धिग्धिग् ज्यालेपण जीवाचें। आतां येथोनि परतणें कैंचें। गोवळीं यश नेलें आमुचें। म्हणोनि कवचें बांधिलीं ॥१०॥ पाठाची हिरोन नेली भाज। याहून थोर कवण लाज। करणें निर्वाणींचें झुंज। म्हणोनि पैज घेतली ॥११॥ वीर वळंवले अश्वांवरी। नाचती तिहीं पायांवरी। 'होहो' 'मामा'

'जीजी' कारी। यावा स्वारीं दाविला ॥१२॥ पुढें पायांचें मोगर। आढाउ चालती गंभीर। सेले साबळे कोतेकर। धनुर्धर पायांचे ॥१३॥ रथ जोडिले एकवट। वरी चढले वीर उद्भट। घडघडले चक्रवाट। रजें अंबुट कोंदलें ॥१४॥ घोडिया बाणली मोहाळी। कंगण टोप रागावळी। पांखरा झळकती तेजाळी। आरसे तळीं लाविले ॥१५॥ दोंही बाहीं कुंजरथाट। गदगलित गजघट। दांतीं लोहबंध तिखट। वीर सुभट वळंघले ॥१६॥ एक चढले उंटांवरी। एक चढले अश्वांवरी। एक चढले खेचरीं। वीर भारी गर्जती ॥१७॥ शस्त्रें झळकताती कैसीं। प्रळयकाळींची बिजू जैसी। मेघ गर्जती आकाशीं। तैसा गजांसी गडगर्ज ॥१८॥ आम्ही प्रचंड धनुर्वाडे। रणकर्कश रणगाढे। नोवरी घेऊन आम्हांपुढें। कोणीकडे पळतील ॥१९॥ निशाण त्राहाटिल्या भेरी। खाखाइल्या रणमोहरी। सिंहनाद केला वीरीं। उपराउपरी धांविन्नले ॥२०॥ शस्त्रास्त्रीं सन्नद्ध सबळ। मीनले महावीर सकळ। धांविन्नले उतावेळ। यादवदळ ठाकले ॥२१॥ अवघे मिळोनि दिधली हांक। कृष्णा दाखवीं पां मुख। 'भीमकी पावली' हें सुख। झणीं देख मानिसी ॥२२॥ सांडीं सांडी भीमकीचा संग। अबद्ध बांधिजसी निलाग। आला कोपिष्टांचा लाग। पडेल पांग दुजयाचा ॥२३॥ एकला एकट होतासी। तैं तूं कोणा नाटोपसी। स्त्रीलोभें अडकलासी। सांपडलासी वैरियां ॥२४॥ तूं हृदयशून्य अविवेकी। दुजियातें न मानिसी शेखीं। तुज मीनले जे विवेकी। ते त्वां वृत्तिशून्य पैं केलें ॥२५॥ अविचारितां एकाएकीं। चोरली परात्पर भीमकी। ते तंव न जिरे इहलोकीं। वीरीं कार्मुकें वाहिलीं ॥२६॥ अविद्या चोरिली चंद्रावळी। विद्या पेंधी ते गोवळी। तैसी नेऊं पाहसी भीमकबाळी। असरीं फळी मांडिली ॥२७॥ न





करितां रे उवेढा। केवीं जाऊं पाहसी पुढां। पळों नको परत भेडा। होई गाढा वीरवृत्ती ॥२८॥ गौगोरस मंथन करितां। चोरिसी सारांश नवनीता। तैसीच नेऊं पाहसी राजदुहिता। बहुतां झुंजतां तें न ये ॥२९॥ यापरी तूं गोवळा जाण। आतां करीं शहाणपण। भीमकी सांडून वांचवीं प्राण। जीवदान तुज दिधलें ॥३०॥ जैसे अहंकाराचे दुर्ग। तैसें आलें चातुरंग। भीतरीं वीर अनेग। कामक्रोधादि खवळले ॥३१॥ महामोहांचे मेहुडे। तैसें सैन्य आलें पुढें। कृष्णबोधाचे निजगडे। यादव गाढे परतले ॥३२॥ भीमकीऐशी नेणों किती। कृष्णें वरिल्या अनंत शक्ती। तुम्हां मशकांचा पाड किती। वेगीं दळपती परतला ॥३३॥ पळतां जन्म गेलें तुमचें। बोल बोलतां नाकें उंचें। आतांचि जाणवेल साचें। बहु बोलाचें फळ काय ॥३४॥ सत्रा वेळ पळालेती। निर्लज्ज मागुती आलेती। रणीं तुम्हां लावीन ख्याती। धनुष्यें हातीं वाइलीं ॥३५॥ दोहीं सैन्यां झाली भेटी। वोढिल्या धनुष्यांच्या मुष्टी। होत बाणांची पैं वृष्टी। कूर्मपृष्ठी कांपतसे ॥३६॥ तडक फुटलें एकसरें। भिंडिमाळांचे पागोरे। वीर गर्जती हुकारें। रणतुरे लागलीं ॥३७॥ पायींचे लोटले पायांवरी। असिवार असिवारांवरी। वीर पडखळले वीरीं। परस्परें हाणिती ॥३८॥ गज आदळले गजांसी। महावंत महावंतांसी। शस्त्रें वोडविती शस्त्रांसी। घायीं घायांसी निवारण ॥३९॥ वोडणें आदळती वोडणा। बाण सुटती सणसणा। खड्गे वाजती खणाखणा। काळकंदना मांडली ॥४०॥ धीर वीर राहे साहे। मागें न ठेविती पाये। माथां वाजती धाये। रुधिर वाहे भडभडा ॥४१॥ शस्त्रें सुटती हातींचीं। कटारा काढिती माजीचीं। उदरें फोडिती गाजांचीं। वीर पायांचे चवताळती ॥४२॥ वोडण उचलोनियां ठायीं।

वारु तोडिले पायीं । वीर पाडोनियां भुई । आढाऊ पायीं भीडती ॥४३॥ भातडीचे सरले शर । धनुष्यदंडे महावीर । झोडून पाडिती अपार । घोरांदर मांडिलें ॥४४॥ लाथा हाणोनियां गजांतें । झोंटी धरोनि महावंतातें । तळीं आणोनियां त्यांतें । घायीं आंतें काढिती ॥४५॥ घायें पाडिती गजांतें । उपडोनि घेती गजदंतातें । धांवोनि हाणिती रथांतें । एकेचि घाते शतचूर्ण ॥४६॥ घायीं मातले महावीर । वोढिती अंत्रमाळांचे भार । तरी धांवती समोर । थोर थोर पाडिती ॥४७॥ कृष्णबळें यादव गाढे । रणीं लोटलिया पुढें । देखोनि मागध धनुर्वाडे । कोपें वेगाढे उठावले ॥४८॥ हांक दिधली महावीरीं । बाण सुटले एकसरीं । यादवसैन्याचा महागिरी । शरधारीं झांकोळला ॥४९॥ आमच्या बाणांचें लाघव । आजि फावले यादव । धांवा पावा चला सर्व । आले गौरव आम्हांसी ॥५०॥ देखोनि वैरियांचा वरवळा । कांपिन्नली भीमकबाळा । नाश होईल दोंही कुळां । बोल कपाळा लागेल ॥५१॥ दीर भावे पडतील रणीं । सासुरां होईल टेहणी । कैंची आणिली हे वैरिणी । धड कोणी न बोलती ॥५२॥ सखे बंधू पडतील रणीं । दु:खें फुटेल जननी । माहेर तुटेल येथुनी । मुख कैसेनी दाखवावें ॥५३॥ कृष्ण पावलिया पुढें । कैसें मांडलें सांकडें । कठिण वोढवलें दोहींकडे । कपाळ कुडें माझेंचि ॥५४॥ थोर वोडवलें दुस्तर । तुटलें सासुरें माहेर । कृष्णावेगळा न दिसे थार । पाहिलें वक्र हरीचें ॥५५॥ देखोनि हासिन्नला वनमाळी । भिऊं नको वो वेल्हाळी । यादव उठावले महाबळी । रणकंदळी करितील ॥५६॥ तुझे दीरभावे रणीं । शत्रु भेदितील बाणीं । धडमुंडांकित धरणी । अर्धक्षणीं करितील ॥५७॥ यादवदळीं थोर थोर । परतले जी महावीर । परिसा नांवें सादर । सविस्तर






सांगेन ॥५८॥ वीरां मुख्य हलायुध । अक्रूर कृतवर्मा आणि गद । सारण सात्त्विक सन्नद्ध । चक्रदेव महावीर ॥५९॥ सात्यकि अतिदांत श्वफल्क । महाबाहू वीर कंक । इतुके मुख्य करूनि देख । वीर अनेक यदुभारीं ॥६०॥ हरिवंशीं यादववीर । सांगितले जी अपार । तितुका न धरवे विस्तार । कथा अपार वाढेल ॥६१॥ दोन्ही पंचक आणि एक । इतुके येथें वीरनायक । येरयेरांसी साह्य देख । मुख्य चालक बळिभद्र ॥६२॥ अवघियां श्रीकृष्णाचें बळ । कृष्णबळें अतिप्रबळ । यादव उठावले सकळ । सन्नद्ध दळ करूनियां ॥६३॥ परदळीं अतिदारुण । वीर आले कोण कोण । ज्यांची गाढी आंगवण । ते राजे जाण सांगिजेती ॥६४॥ जरेंपासून जन्मला मोहो । तैसा जरासंध पहाहो । वेगें उठावला महाबाहो । सैन्यसमुदावो लोटला ॥६५॥ जरासंधासवें प्रबळ । राजे चालिले सबळ । कोण कोण आले भूपाळ । नांवें सकळ परियेसा ॥६६॥ शाल्व पौंड-क विदूरथ । बळें प्रबळ वक्रदंत । या वीरांचा अद्भुत् । वेग न धरत पातले ॥६७॥ गवेषण अंग वंग । केशिक कारूष कलिंग । हेही राजे जी अनेग । बळें चांग उठावले ॥६८॥ सकळां मुख्य जरासंध । सबळ बळेंसीं मागध । अवघे जाले सन्नद्ध । दारुण युद्ध मांडिलें ॥६९॥ चढिला बळिभद्रासी रणमद । देखोनि बोलिला वीर गद । वीर्य शौर्य अतिविनोद । गोत्रसंबंध युद्धाचा ॥७०॥ दैवें जोडिलें युद्धसंपत्तीसी । एकलाचि तूं नेऊं पाहासी । स्वार्थी ऐसा कैसा होसी । वांटा आम्हांसी पाहिजे ॥७१॥ वीरविभाग तव प्रसिद्धू । माझा वांटा जरासंधू । सात्त्विक आमुचा धाकुटा बंधू । वक्रदंत त्यासी दीधला ॥७२॥ पौंड-क दिधला कृतवर्म्यासी । विदूरथ दिधला अक्रूरासी । येर अवघे दिधले तुम्हांसी । गोत्रजांसी समजावे ॥७३॥

वाटवणी। विनोद मेहुणीं मांडिला ॥४८॥ अर्धखांड अर्धमिशी। पांच पाट काढिले शिसीं। विरूप केलें रुक्मियासी। गळा रथेंसीं बांधिला ॥४९॥ रुक्मिणीसी म्हणे श्रीकृष्ण। पाहें बंधूचें वदन। वेगें करीं लिंबलोण। सकळ जन हांसती ॥१५०॥ रुक्मियाचें विरूपकरण। यापरी करी श्रीकृष्ण। बळिराम येऊनि आपण। बंधमोचन करील त्यासी ॥५१॥ परिहारमिषें प्रबोध। भीमकीसी करील हलायुध। एका जनार्दनीं विनोद। परमानंद प्रगटेल ॥१५२॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे रुक्मिपराभवो नाम द्वादश: प्रसंग: ॥१२॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥





## ॥ प्रसंग तेरावा ॥

श्रीगणेशाय नम: ॥ येरीकडे दळभार। देखोनि चालिले यादववीर। लोटले येरयेरांसमोर। घायें निष्ठुर हाणिती ॥१॥ दक्षिणराजे निजभारीं। युद्ध पाहती राहोनि दूरी। रुक्मिया क्षीण केला हरी। कृष्णावरी उठावले ॥२॥ उरलें रुक्मियाचें दळ। यादवीं त्रासिले प्रबळ। वर्षोनियां बाणजाळ। वीर सकळ भेदिले ॥३॥ यादवांच्या तिखट बाणीं। निधडे वीर पडिले रणीं। धडमुंडांकित धरणी। अर्धाक्षणीं तिहीं केली ॥४॥ कृष्णें रुक्मिया बांधिला। उरलिया सैन्या पळ सुटला। जयो यादवांसी आला। मग परतला बळिभद्र ॥५॥ सरोवरामाजी कमळीं। गज करी रवंदळी। तैशी मर्दूनी शत्रुफळीं। कृष्णाजवळी तो आला ॥६॥ रुक्मियाचें विरूपकरण। देखता झाला संकर्षण। कृपा द्रवलें अंत:करण। दीन वदन देखोनी। सोडोनियां गळबंधन। कृष्णासी म्हणे हे बुद्धि कोण। सोयरियांसी विरूपकरण। तें निंद्य जाण आम्हांसी ॥८॥ शरीरसंबंधासी विरूपबाधू। हा तंव वधाहूनि अधिक वधू। तुवां थोर केला अपराधू। सुहृदसंबंधू लाजविला ॥९॥ याचा वध तूं करितासी। तरी हा पावता निजसुखासी। मान देऊनि सोडितासी। सोयरिकेसी श्लाघ्यता ॥१०॥ क्षत्रिय सांपडे रणसांकडीं। त्यासी द्यावीं लेणीं लुगडीं। युद्धीं खांडमिशी बोडी। हे अपरवडी त्वां केली ॥११॥ सर्वेचि म्हणे रुक्मिणीसी। दोष न ठेवावा आम्हासी। जो कर्में करी जैसीं। फळें तैसी तो भोगी ॥१२॥ कृष्ण निजतत्त्व तत्त्वतां। कर्में करूनि अकर्ता। बंधुवैरुप्याचा दाता। नव्हे सर्वथा श्रीकृष्ण ॥१३॥

तुझा घेईन प्राण । वेगीं विंदान पाहें माझें ॥१४॥ पौंड-क निवारण करी । परी ते अनिवार भारी । एक सारथियात मारी । दोन उरीं आदळले ॥१५॥ बाण भेदिले सपिच्छेंसीं । पौंड-क पाडिला धरणीसी । मूर्च्छना दाटली त्या कैसी । देहभावासी विसरला ॥१६॥ पौंड-क पडिला मूर्च्छित । तंव धांविन्नला विदूरथ । त्यातें अक्रूर त्वरित । पाचारीत रणभूमी ॥१७॥ अक्रूर वीर अति गाढा । रथ आडवा रथापुढां । घालोनि उठिला वेगाढा । बळें मेढा वोढिला ॥१८॥ तुझें नांव तंव अक्रूर । दारुण योद्धा नव्हेसी क्रूर । तुज कोण गणील वीर । रणीं धीर न धरवे ॥१९॥ जयासी नाहीं वीरवृत्ती । तयासी अक्रूर गा म्हणती । तुजसी युद्ध तें किती । बाण शितीं लाविला ॥२०॥ तुझिये हृदयींची क्रूरता । समूळ बाणीं मी छेदिता । पाहें माझी अक्रूरता । मदगर्विता झाडीन ॥२१॥ सुटले दोघांचेही बाण । अति झणत्कारें वाजती गुण । बाणीं गगन झालें पूर्ण । सूर्यकिरण झांकुळले ॥२२॥ मेघामाजी विजु तळपती । तैशा भाली झळकताती । बाण बाणां आदळती । तिडक्या उठती अंतराळीं ॥२३॥ षड्विकार साही बाण । अक्रूरावरी घाली दारुण । येरीं निर्विकार लक्ष साधून । बाणीं बाण निवारिले ॥२४॥ तिखट उर्मीचिया भाली । सवेंचि विदूरथ घाली । घायें करीन अबोध भुली । गर्जून बोलीं विंधित ॥२५॥ काढिला निजबोधकुऱ्हाडा । गुणी लावूनि लोटिला पुढां । भालीसहित तोडिला मेढा । गाढा धनुर्वाडा अक्रूर ॥२६॥ घेऊनि क्रोधाचा भाला । रथावरून तो उडाला । निश्चळ निजशांतीं विंधिला । भाला तोडिला माझारीं ॥२७॥ गुप्त होती वासनासुरी । हाणो धांविन्नला उरावरी । स्वानुभवाची भाली खरी । धीरें निर्धारी विंधिली ॥२८॥ भाळीं आदळली सत्राणें । विदूरथ झणाणिला तेणें । सुरी उडविली





कोणे मानें । गेली गगना दिसेना ॥२९॥ बाण अव्यय काढिला । गुणीं अवगुणाचें जोडिला । अक्रूरें कानाडीं ओढिला । उडविला ही विदूरथ ॥३०॥ बाप अक्रूर वीरराणा । कोणे नेटे सोडिले बाणा । रथासहित उडविला गगना । रणप्रदक्षिणा करविली ॥३१॥ बाण भेदिला जिव्हारीं । विदूरथ पडिला धरणीवरी । डोळां लागली अर्धचंद्री । जेवीं खेचरी योगिया ॥३२॥ श्वफल्क सात्यक चक्रदेव । कंकसारणादि यादव । यांवरी उठावले राजे सर्व । अंगवंगादि कलिंग ॥३३॥ बाण सणासणां सूटती । खड्गे खणखणा वाजती । रथ रथांसी आदळती । वीर गर्जत सिंहनादें ॥३४॥ रणीं उठिला लोहधुळोरा । तेणें चालों न शके वारा । रणमद चढलासे वीरां । येर येरां हांकिती ॥३५॥ बाण बाणांसी आदळती । घायीं तिडकिया उठती । तेणें पिसारे पेट घेती । बाण जळती अंतराळीं ॥३६॥ कारूषें घेऊनि बाण नव । वेगीं विंधिला चक्रदेव । बाणासरसी घेऊनि धांव । रथावरूनि आसुडिला ॥३७॥ चक्रदेवें लवडसवडी । कारूषावरी घातली उडी । येरू सांपडला रथाबुडीं । बुद्धि गाढी तेणें केली ॥३८॥ अंग चुकवूनि वेगेंसीं । चक्रदेव धरिला केशीं । थडक हाणोन उराशीं । कारूषासीं पाडिले ॥३९॥ गजारूढ पैं विख्यात । अंगरायें पेलिला हस्त । चक्रदेवाचा मोडिला रथ । वीरां खस्त करीतसे ॥४०॥ अंग योद्धा महाबळी । रथ रगडी गजातळीं । यादवसेना मंडळी । रणरांगोळी करूं आला ॥४१॥ यादवामाजी कंक बळी । रागें करीत उठिला होळी । अंगासी हाणोनि कपाळीं । गजासहित मारिला ॥४२॥ कलिंगसैन्यावरी देख । रागें उठिला सात्यक । वीर मारिले अनेक । रणीं सैनिक पाडिले ॥४३॥ कोप आला कलिंगासी । सात्यकी विंधिला बाणें विसीं । एकचि बाणें

तोडूनि त्यांसी। कलिंगासी पाचारिलें ॥४४॥ गुणीं लावूनि कुऱ्हाडा। मुकुट पाडूनि तोडिला मेढा। धनुष्य घेऊनि उठिला वेगाढा। कलिंग गाढा कोपला ॥४५॥ रथ विंधिला मकरतोंडीं। सवेंचि दोन्ही चाकें फोडी। पाडली सात्यकीची मुरकुंडी। बाणीं वितंडीं विंधिला ॥४६॥ सात्यकी वीर जगजेठी। पडत पडतां सवेंचि उठी। गदा घेऊनियां मुष्टी। कलिंग दृष्टी सूदला ॥४७॥ सव्य अपसव्य घोवंडी गदा। न धरत पातला तो योद्धा। कलिंगें तोडिली ते गदा। सात्यकी क्रोधा चढिन्नला ॥४८॥ घेऊनि रथाचा पैं आंख। वेगें धांविन्नला सन्मुख। कोपें होणों आला सात्यक। येरें मस्तक चुकविला ॥४९॥ रथाखाली घातली उडी। आंग चुकविलें रथाबुडीं। कलिंगाचा रथ मोडी। चारी घोडीं मारिलीं ॥५०॥ वंगराजा रणप्रवीण। कोपें चालिला घेऊनि बाण। त्यावरी उठावला सारण। युद्ध दारुण तेथे जालें ॥५१॥ भोंवता बाणांचा वळसा। सैन्य पाडिलें धारसा। बाण भेदिले सपिच्छा। वंग त्रासा पावला ॥५२॥ सारणें थोर केला मारु। सारथीं जाणि मारिले वारु। बाणीं भेदिले रहंवरु। आणि दळभारू झोडिला ॥५३॥ विरथ केला वंगराजा। सवेंचि चढे पट्टगजा। धनुष्य वाहोनियां वोजा। बाण पैंजा घेतले ॥५४॥ शर सोडिले सारणावरी। सारण बाणांतें निवारी। गजें रथ केला चुरी। दांत उरीं लाविले ॥५५॥ रथाखालीं घातली उडी। गज धरिला शुंडादंडीं। सारण सोंडतें मुरडी। गजाबुडीं रिघाला ॥५६॥ गज मारावया एकसरें। सारण गजातळीं फिरे। वंग वर्षताहे शस्त्रें। सारणा बाहेर निघों नेदी ॥५७॥ सारण कोंडिला महावीर। यादवदळीं हाहाकार। ऐकोनि पावला बळिभद्र। वृक्ष थोर उपडिला ॥५८॥ राहें साहें म्हणे वंगातें। तेणें विंधिला बाणें शतें। मुसळ घेऊनि डावे हातें। त्या





बाणांतें निवारिलें ॥५९॥ दक्षिणहातीं होता वृक्ष। एकेचि घायें कपाळमोक्ष। गज निमाला निःशेष। अधोमुख पडियेला ॥६०॥ आडवा धांविन्नला केशिक। राजा उठावला मुख्य। झाला बळिभद्र। सन्मुख। दोघे देख खवळले ॥६१॥ केशिकावरी हलायुध। मारा पेटला सुबुद्ध। येरीकडे राजे सन्नद्ध। यादवांवरी उठावले ॥६२॥ केशिक राजा अतुर्बळी। राम मारील निजहळीं। गवेषण राजा रणकल्लोळीं। घेईल समफळी यादवांसी ॥६३॥ तेव्हां राम माजवील रणनदी। तेथें चहूं पुरुषार्था मोक्षसिद्धी। कृष्णदृष्टीचिया प्रबोधीं। सायुज्यपदीं निजयोद्धे ॥६४॥ श्रीकृष्णाचिया दृष्टीपुढें। रणा येतां सायुज्या चढे। निधडिया वीरां भाग्य चोखडें। सायुज्य रोकडें साधिती ॥६५॥ तेथें द्वंदयुद्ध अतितुंबळ। रणीं माजेल रणकल्लोळ। एका जनार्दनीं रसाळ। कथा कलिमलनाशिनी ॥६६॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे। दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे नवमः प्रसंग ॥९॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥

## ॥ प्रसंग दहावा ॥

श्रीगणेशाय नमः ॥ राय चालिले मुगुटांचे ॥ थोर बळ गवेषणाचें । सैन्य पातलें मागधाचें । युद्ध त्याचें दारुण ॥१॥ वेगीं धनुष्या वाहिला गुण । शितीं लावूनियां बाण । शस्त्रें झळकती दारुण । रणकंदन करूं आले ॥२॥ राजे चालिले प्रबळ । यादव उठावले सकळ । दुमदुमलीं दोन्ही दळे । एकमेळें मिसळले ॥३॥ गगन कोंदलें तिही बाणीं । तळीं खिळिली धरणी । मागें पाय न ठेविती कोणी । वीर रणीं खवळले ॥४॥ वीर वीरातें हाणित ॥ लोहधुळोरा उसळत । वारिया वाट न चले तेथ । वीर अद्‌भुत मातले ॥५॥ शस्त्रेंसहित तोडिती कर । मुगुटेंसहित पाडिती शिर । गजांसहित मारिती वीर । सपिच्छ शर भेदिले ॥६॥ चरण तोडिले गजांचे । राजे पाडिले ब्रीदांचे । खुर छेदिले अश्वांचे । आंख रथांचे भेदिले ॥७॥ राजे विनटले अनेक । यांवरी उठावला श्वफल्क । बाणीं त्रासूनिया देख । एकें एक खिळियेले ॥८॥ वीर भिडिन्नले पडिपाडें । यादवांचें बळ गाढें । गवेषण चालिला पुढें । गुणीं कुऱ्हाडे लाविले ॥९॥ श्वफल्क विंधिला पांच बाणी । रथ छेदूनि पाडिला धरणीं । कंक सात्यकी हे दोन्ही । विसां बाणीं विंधिलें ॥१०॥ बाण अनिवार निर्व्यंग । भेदिलें वीरांचे अष्टांग । गवेषण योद्धा चांग । न करी पांग दुजयाचा ॥११॥ चक्रदेव चालिला रागें । एकें बाणें विंधिला वेगें । रथासहित घातला मागें । रणभूमि सांडविली ॥१२॥ देखोनि चालिला अतिदंत । कोपें खवळला अद्‌भुत । दहा वीस पांच सात । बाण शत वरुषला ॥१३॥ बाणीं निवारिले बाण । हांसिन्नला गवेषण । येरु कोपला दारुण । आठ बाण सोडिले ॥१४॥ दारुण बाण आले आठ । अनिवार अति उद्भट । रथसारथी केला पीठ । शिरींचा मुगुट पाडिला ॥१५॥ एक खडतरला बाण । गगना गेला गवेषण । क्रमूनियां ग्रहगण । ध्रुवमंडळ उडविला ॥१६॥ घायासरसी आली भवंडी । पडत पडत आवरली मुरकुंडी । रणांगणीं घातली उडी । मूर्च्छा गाढी सांवरिली ॥१७॥ गवेषण आणिके रथा । चढोनि पातला अवचिता । पाचारूनि अतिदंता । होय विंधिता सा बाणीं ॥१८॥ बाण सुटले कडाडी । पडली डोळियां झांपडी । काढों विसरला वोढी । थोर हडबडी अतिदंता ॥१९॥ दोन भेदले भुजांवरी । एक उरीं एक शिरीं । दोनी रुतले दोहीं करीं । धरणीवरी पाडिला ॥२०॥ घायें लोळविला महाबळीं । अधोमुख महीतळीं । झोटीं सुटली मोकळीं ॥ भाते तळीं रिचवले ॥२१॥ हांक देऊनि गवेषण । रणांगणीं उभा आपण । त्यावरी चालिला सारण । बाण दारुण घेउनी ॥२२॥ बाण विंधित चपल । धनुष्य तोडिलें तत्काळ । दुजें धनुष्य घे भूपाळ । तेंही सबळ तोडिलें ॥२३॥ तिजे धनुष्य वाइला गुण । तेंही तोडिलें विंधोनी बाण । जें जें धनुष्य घे गवेषण । तें तें सारण तोडित ॥२४॥ सारणें थोर केली ख्याती । धनुष्य घेऊं नेदी हातीं । देखोन कोपला भूपती । मेढा निगुती वाइला ॥२५॥ सारणें विंधिला सारथी । ध्वजस्तंभ पाडिला क्षितीं । येरें विंधिला बाणें सातीं । दोहीं हातीं खोचला ॥२६॥ सारण विकळ पाडिला रथीं । वीर मूर्च्छित पाडिले क्षितीं । गवेषणे लाविली

ख्याती। भद्रजाती खवळला ॥२७॥ मग मिसळला जळभारीं। करीत असे महामारी। वीर खिळिले जिव्हारीं। शरधारीं वर्षत ॥२८॥ येरीकडे केशिक वीर। वर्षत बाणांचा महापूर। बाणीं त्रासिला बळिभद्र। दळभार वेढिला ॥२९॥ खड्ग तोमर गदा परिघ। वीर हाणिताती सैघ। राम साधक अति सांग। घाय आंगा लागों नेदी ॥३०॥ हल भवंडी चहूंकडे। वीर पाडिले दडदडां। नांगरें केला जी उवेढा। केशिक गाढा हांकिला ॥३१॥ बाणीं विंधिला प्रबळें। तिखट सोडी शरजाळें। बाण तोडोनियां हळें। निजबळें लोटला ॥३२॥ नांगर उचलूनिया निवाडें। नेहटून पाय ठेविला पुढें। घायीं चूर केली हाडें। अशुद्ध उडे आकाशीं ॥३३॥ सैन्यावरी लोटला देख। ठायीं पाडिले सेनानायक। धरितां न धरवेचि तबक। वीर अनेक मारिले ॥३४॥ रथ भूमीसी आफळीं। गज शुंडादंडी पिळीं। शिरें खेळती चेंडूफळी। रणखंदोळीं मांडिली ॥३५॥ धाक घेतला झुंजारीं। केशिकसैन्य पळे दूरी। बळिभद्र पेटला महामारी। युद्ध वीरीं सांडिलें ॥३६॥ जरासंध देखिला दूरी। राम चढे रथावरी। रथ पेलिला झडकरी। उपराउपरी मारिला ॥३७॥ वेगीं धनुष्या चढविला गुण। रामें काढिला निर्वाणबाण। गदें घातली आपुली आण। रणविंदाण पाहें माझें ॥३८॥ धीर धरीं अर्ध घडी। पाहे युद्धाची निरवडी। जरासंधा बाणीं फोडी। गर्वझाडी करीन ॥३९॥ गदू निजगडा महावीर। योद्धा रणरंगचतुर। बळिभद्रासी केला स्थिर। रहंवर धांवविला ॥४०॥ येरीकडे यादवभारा। गवेषण पेटला महामारा। बाणीं खिळिले महावीरां।



मुख्य धुरा खोंचल्या ॥४१॥ विकळ देखोनि दळभार। मागधवीरीं केला मार। आट भविन्नला थोर। हाहाकार ऊठिला ॥४२॥ निजसैन्यासी महामार। दुरोनि देखे बळिभद्र। कोपें खवळला दुर्धर। रहंवर पेलिला ॥४३॥ परसैन्य देखोनि दृष्टीं। वेगें चालिला जगजेठी। धडधडिल्या चक्रवाटी। उठाउठीं पातला ॥४४॥ देखोनि शत्रूचा खटाटोप। बळिभद्रासी न धरवे कोप। बाहुस्फुरणें आला कंप। वेगें साटोप ऊठिला ॥४५॥ रथाखालीं घातली उडी। शेष दडपला फडेबुडीं। वराहाची दाढ तडतडी। कूर्में गाढी पाठि केली ॥४६॥ वीर खिळूनियां बाणीं। गवेषण गर्जे रणीं। आला बळिभद्र धांवोनी। निर्वाणबाणीं विंधिला ॥४७॥ बाण विंधिला सबळ। येरें परजिलें मुसळ। साधक बळिभद्र प्रबळ। बाणजाळ तोडिलें ॥४८॥ नांगर उचलूनियां बळें। न धरत पातला तये वेळे। रथ सांडिला तत्काळें। वेगें पळे गवेषण ॥४९॥ सर्वेचि परतावया पाहत ॥ पायीं घातला नांगरदांत। गवेषण पडिला तेथ। भूमी दांत आदळले ॥५०॥ लाजा उठिला त्वरित। तंव बळिभद्रें दिधली लाथ। येरु अशुद्धातें वमित। पडिला मूर्च्छित अचेतन ॥५१॥ सांडूनियां धनुष्यबाण ॥ सैनिक धांविन्नला आपण। रथीं घालोनियां गवेषण। घेऊनि प्राण पळाला ॥५२॥ देखोनि बळिभद्राचें बळ। राजे चालिले प्रबल। पुढें करूनियां गजदळ। एक वेळ लोटले ॥५३॥ आलें देखोनि परदळ। करीत हरुपाचा गोंधळ। झेलित नांगर मुसळ। वेगें सबळ उठिला ॥५४॥ गज हाणीत मुसळें। विदारीत कुंभस्थळें। घायीं

किळकिळती एक वेळे। गजकलेवरें पाडिलीं ॥५५॥ नांगर घालूनि रथावरी। शतसहस्रां चूर करी। पळत गज पायीं धरी। तेणें किरकिरी करिताती ॥५६॥ चपळ चौताळती घोडीं। नांगर घालोनि त्यांतें वोढी। घायें मुसळाचेनि पाडी। वीरझोडी मांडिली ॥५७॥ वीर वरुषताती शस्त्रास्त्रां। जैसा मेरूसी पर्जन्यधारा। रणीं चालतां बळिभद्रा। वीर थरथरां कांपती ॥५८॥ पायींचे रगडिले पायीं। कारुप राजा पाडिला ठायीं। रथ रथ मोडिला पाहीं। सन्मुख घायीं कोण राहे ॥५९॥ पृथ्वी तेचि उखळ जाण। नांगरें वीर घाली वैरण। मुसळघायें करा चूर्ण। रणकंदन मांडिलें ॥६०॥ सात्त्विका दंतवक्रा युद्ध। गदें गोंविला जरासंध। मोकळा पडला हलायुध। वऱ्हाडी सुबुद्ध कांडिले ॥६१॥ वीरीं घेतला रणकावो। देखोनि धांविन्नला शाल्वो। मिळोनि वीराचा समुदावो। महाबाही पडखळिला ॥६२॥ धांवतां देखोनि शाल्व वीर। आडवा आला अक्रूर। राहें साहें म्हणें स्थिर। धरीं धीर संग्रामीं ॥६३॥ तंव बळिभद्र पावला रागें। अक्रूरातें म्हणे उगे। मज पाचारितां अंगें। तूं कां वेगें आलासी ॥६४॥ रणीं झुंजार विकळ जाय। तरी दुजयानें व्हावें साह्य। शाल्व बापुडें तें काय। कौतुक पाहें पैं माझें ॥६५॥ मग चालिला शाल्वावरी। बळिभद्र वेढिला वीरीं। बहुत उठिले महामारी। शरधारीं वर्षती ॥६६॥ बाप बळिराम जगजेठी। नांगरें बाण तरी पिटी। अंग लागों नेदी चिरटी। शाल्व दृष्टी सूदला ॥६७॥ बाणीं विंधिला अमित। राम बाणांतें न गणित। वेगें उसळला अद्भुत। आला न धरत आंगेंसीं ॥६८॥ रथ धरिला मकरतोंडीं। शाल्वें वेगीं




घातली उडी। सांपडला तो रथाबुडीं। वोढाकाढीं निष्टला ॥६९॥ रथ आपटिला भूमंडळीं। वीर सांपडले तयातळीं। घायें केली रांगोळी। निधा पाताळीं ऊठिला ॥७०॥ ते वेळीं शाल्वें चुकविलें आंग। घायासरिसा उडाला सवेग। मागुता आवेश धरुनियां चांग। रणीं अव्यंग उभा असे ॥७१॥ शाल्व घेऊनियां गदा। हृदयीं हाणतां हलायुधा। गगना उसळला तो योद्धा। धावो नुसधा तळीं गेला ॥७२॥ शाल्व रथीं जंव चढे। तंव मुसळ वोपिलें रोकडें। करीत अशुद्धाचे सडे। मूर्च्छित पडे अवनीये ॥७३॥ मग मिसळला मागधांत। घायें शतसहस्र मारीत। अशुद्ध भडभडां वाहात। नांगरें अंत पुरविला ॥७४॥ बळिभद्रे केली महामारी। वीर झोडिले नांगरीं। तेथें वीर वीरांतें परस्परीं। ऐशियापरी वोलती ॥७५॥ हातीयेरां दुकाळ पडला। मग यासी नांगर सांपडला॥ सैन्य नांगरावया आला। वीरकाशिया काढित ॥७६॥ नांगर घालूनियां बुडीं। थोर उपडिलिया पेडी। रथगजकाटिया मोडी। पालव्या तोडी वीरांच्या ॥७७॥ अतिरथी जे उद्भट। समूळ फोडियेले खुंट। बळिभद्र हा कुणबट। केली चोखट रणभूमि ॥७८॥ महावीरां घालितां घावो। अशुद्धें डवरिला बलदेवो। तेणें शोभत महाबाहो। रणभैरवो डुल्लत ॥७९॥ रणमदें जाला मस्त। नांगर घेउनि नाचत। वीर देखोनि धांवत। पुरला अंत सैन्याचा ॥८०॥ घायें मारीत महावीर। भडभडां वाहे रुधिर। लोटला अशुद्धाचा पूर। नदी दुस्तर उलथली ॥८१॥ नदी वाहतां दुथडी। झाल्या प्रेतांच्या दरडी। वोडणें कमठें पुष्टी गाढी। गज करवडी महाग्राह ॥८२॥ बाबरझोटिया केशजाळ। तेचि

नदीमाजी शेवाळ। मगर सुसरी महाविशाळ। शिरें विक्राळ वीरांचीं ॥८३॥ बाण तरती सपिच्छेंसी। तेचि मस्त्य रणनदीसी। धनुष्यें वाहती शितेंसीं। वक्रगतीसीं तेचि सर्प ॥८४॥ पडिले गजांचे अलंकार। घंटा घागरिया नूपुर। तेचि नदीमाजी दर्दुर। लहान थोर किरकिरती ॥८५॥ रथ ध्वजेंसीं वाहात ॥ तेंचि तारूं शिडेंसहित। वीरां मोक्ष भरिलें भरित। तारू तेथ श्रीकृष्ण ॥८६॥ एकेचि घायें शिर पडे। स्वर्गपर्यंत तें उडे। स्वर्गभोग त्या नावडे। कृष्णाकडे तें परतलें ॥८७॥ कृष्णदृष्टी देहत्याग। तुच्छ करूनि सांडिती स्वर्ग। जिंतिला जन्ममरणाचा पांग। सुख अव्यंग पावले ॥८८॥ घायें उडालें शिरकमळ। टाकूनि गेलें ध्रुवमंडळ। पदनमनेंचि अढळ। उतावेळ परतलें ।८९॥ देह अर्पितां श्रीकृष्णासी ॥ चारी मुक्ती होतीं दासी ॥ म्हणोनि आलें कृष्णचरणासी। निजसुखासी पावलें ॥९०॥ घायीं उडालें शिर एक। टाकून गेलें सत्यलोक। ब्रह्मसदन नावडे देख। कृष्णासन्मुख परतलें ॥९१॥ देखोनि कृष्णाचें श्रीमुख। धिक्कारिला सत्यलोक। ब्रह्मसदन वांच्छिती मूर्ख। परमसुख हरिचरणीं ॥९२॥ घायासरिसें शिर उडे। वैकुंठपर्यंत तें चढे। एकदेशी गति नावडे। हरीकडे मुरडलें ॥९३॥ सांडूनियां कृष्णनाथा। आम्ही नेघों सलोकता। हरिचरणीं ठेविला माथा। नेघो सर्वथा वैकुंठ ॥९४॥ शिर उडालें अंतराळीं। अहंकारमुगुट पडला तळीं। शिर न उतरेचि भूतळीं। हरीजवळी पावलें ॥९५॥ जेथें अभिमान तुटला। तेथेंचि त्यास हरि भेटला। युद्धमिसें लाभ झाला। वीरां फावला निजमोक्ष ॥९६॥ अत्यंत प्रळयींचा चिदघन। वर्षताहे





संकर्षण। वीरांचा अभिमान मर्दून। लिंगदेह छेदिला ॥९७॥ अधिकारियां मोक्षभावो। द्यावयालागीं कृष्णदेवो। मिष भीमकीचा विवाहो। रणनिर्वाहो मोक्षाचा ॥९८॥ निधड्या वीरां जाली मुक्ती। देह लोभियां कवण गती। रण सांडोनियां जे पळती। ते विन्मुख होती कृष्णासी ॥९९॥ अश्व गज जे रणा आले। तेही श्रीकृष्णें उद्धरिले। युद्ध सांडून जे पळाले। ते पावले अवगती ॥१००॥ यापरी तो बळिभद्र। कृपेनें कोपला दुर्धर। ब्रह्मसायुज्येंकरून मार। वीरें वीर आटिलें ॥१०१॥ एका जनार्दनी कौतुक। कथारहस्य सुखदायक। पुढील कथा अलोकिक। समाधिसुख संग्रामीं ॥१०२॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे चैद्यमागधपराजयो नाम दशमः प्रसंगः ॥१०॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥

## ।। प्रसंग अकरावा ।।

श्रीगणेशाय नमः । येरीकडे वक्रदंत । सात्त्विकांतें पाचारित । कोपें खवळला अद्‌भुत । टाकोनि बोलत येरयेरां ।।१।। केवळ सात्त्विक तूं पैं गा । तापसियांमाजी होसी दाटुगा । न साहवे युद्धवेगा । पळोनि मागां जासील ।।२।। सात्त्विकांसी युद्ध घडे । हें तंव बोलणेंचि कुडे । केवळ सात्त्विक बापुडें । युद्धापुढें केविं राहे ।।३।। अरे मी सात्त्विक न भेटतां । वक्रदंताची श्लाघ्यता । तुझी तोडीन रे वक्रता । सात्त्विकता पाहें माझी ।।४।। सात्त्विका शरण न रिघतां साचें । तोंवरी तुम्हां सत्त्व कैंचे । लेइलेति अभिमानाचीं कवचें । लक्ष्य साचें भेदीन ।।५।। लागतां सात्त्विकाचा घावो । परतोनि जावया नाहीं ठावो । आली वाट भुलवीन पाहा वो । महाबाहो खवळला ।।६।। घायेंवीण घेईन प्राण । तुझी माया करील रुदन । तिचें देखो न शकसी वदन । देहबंधन छेदीन ।।७।। वक्रदंत कोपला गाढा । वाइला रजतमाचा मेढा । ममताभालीं जी दडदडा । कोपें वेगाढा विंधित ।।८।। बाप सात्त्विक निजगडा । बोधकवचें जाला गाढा । निजबळें चालिला पुढां । भाली तडतडां तोडित ।।९।। लक्ष्य आतुल्या परवडी । गुणधनुष्याचें शीत तोडी । खुंटला विषमबाणाची वोढी । धनुष्य लडलडी नुसधेंचि ।।१०।। धनुष्य तुटलियापाठीं । कामकोतेसीं सवेग उठी । सत्त्वें सात्त्विक जगजेठी । लक्ष्य दृष्टी साधिलें ।।११।। काढिला कामांतक बाण । धगधगित अति दारुण । कामकोतें केले चूर्ण । बळ संपूर्ण सात्त्विकाचें ।।१२।। घेऊनि क्रोधाचा परिघ । अविचारीत टाकिला अव्यंग । शांतिबाणें विंधिला चांग । घायें परिघ उडविला ।।१३।। घेऊनि लोभाची पैं गदा । भुलवूनि करिता हृदयभेदा । वैराग्यबाणें विंधिला सांधा । तोडोनि गदा सांडिली ।।१४।। गदा तुटलियावरी । मोहवोडण आदळे उरीं । गुप्तशस्त्र घेऊनि करीं । हृदयावरी हाणों आला ।।१५।। दृढ सात्त्विक- अनुसंधान । विवेकतेजें तिखट बाण । विंधोनि उडविलें वोडण । वक्रदंत मागें सारिला ।।१६।। घेऊनि वासनेचे वज्र । वेगें धाविन्नला थोर । भेदावया जिव्हार । साहंकार चालिला ।।१७।। सात्त्विकें थोर धरिला धीर । अत्यंत तेजें तिखट वीर । विंधोनि वज्र केलें चूर । घायें अंबर गर्जिन्नले ।।१८।। वज्र छेदिलें वीरनायकें । वक्रदंत चालिला रोखें । चहूं मुक्तीचीं वाघनखें । हृदयीं तिखें हाणों आला ।।१९।। सात्त्विक उठावला आंगें । शस्त्रसंधान सांडिलें वेगें । लाता हाणोनि घातला मागे । मोडिली रागें वाघनखें ।।२०।। मग सात्त्विकें दिधली हांक । वक्रदंतें घेतला धाक । देहलोभाभेणें देख । अधोमुख पळाला ।।२१।। पळतां भुलला तो वाट । पडिला अभिमानाचा मुगुट । सात्त्विक झुंजार चोखट । पळत्यापाठीं न लागेचि ।।२२।। जरासंध आणि गद । दोघां चढला रणमद । क्रोधें झाले अति सक्रोध । वीर उन्नद्ध लोटले ।।२३।। मेरु मांदार झगटले । तैसे रथीं रथ तगटले । दोघे महामारीं पेटले । विरुद्धबोलें बोलती ।।२४।। सन्मुख देखोनियां गद । हांसिडला जरासंध । मजसीं भिडो न शके गोविंद । बुद्धिमंद तूं कैंचा ।।२५।। विपायें कांहीं ऐसें घडे । जैं अंधारीं सूर्य बुडे । उंडणीं स्वयें भिंती चढे । तरी युद्ध न घडे तुज मजसीं ।।२६।। मशकाचेनि चरणप्रहारें । महामेरू उभाचि विरे । इंद्रासीं भिडिजे उंदिरें । तैं तुज

मज सामोरें संग्राम ॥२७॥ घटामाजी सिंधु सांपडे। जांभईमाजी आकाश बुडे। वागुरेमाजी वारा अडे। तैं तुज मज घडे संग्राम ॥२८॥ मुरकुट सगळा समुद्र शोखी। गज गिळिजे मुंगिया मुखीं। आकाश चडळें काढिजे टाकीं। तैं तुज मज घडे संग्राम ॥२९॥ चित्रींचा देखोनिया सर्प। गरुडाअंगीं उठे महाकंप। तैसाच तुझा हा साटोप। खटाटोप घडे युद्धीं ॥३०॥ सूर्यासीं खद्योत रणांगणीं। भिडें शके झोटधरणी। तरी तुज मजलागोनी। पडिपाड रणीं असेना ॥३१॥ नवग्रहांचें बळ घटांसी। परी न भिडवे पाषाणासीं। तेवीं तूं यादव योद्धा होसी। परी मजसीं न झुंजवे ॥३२॥ ससा चढोन सिंहाचे माथां। जरी नाचवील निजसत्ता। तरी तुज मज समता। युद्धीं सर्वथा न घडेचि ॥३३॥ वांझेचा पुत्र महारोगी। संध्याराग करूनि भुगी। कासवघृतेंसीं आरोगी। निरुजा रोगी व्हावया ॥३४॥ तैसा प्रकार आजि घडला। जे यादववीरीं दुकाळ पडला। यालागीं गद येथें धाडिला। नावाजिला पुरुषार्थी ॥३५॥ गदू नांवाचा रे शब्दीं। तुझा संग्रह कीजे वैद्यीं। पोतडीं घालोनि कांखेसांदीं। दारोदारीं हिंडविती ॥३६॥ रोगियांमाजी तूं सबळ। तुज युद्धीं कैचें बळ। धर्मवाट दिधली पळ। सांडीं सळ युद्धाचें ॥३७॥ हांसूनि बोलिला वीर गदू। तुझा जरेनें सांधिला सांधू। सांधा न वैसेचि निबंधू। फाडूनि शुद्ध करूं आलों ॥३८॥ शस्त्र घालीन मी गदू। काढीन अभिमानाचा रेंदू। तोडीन जरामरणकंदू। हृदय शुद्ध करीन ॥३९॥ ऐकोनि खवळला मागध। झाला कवचेंसीं सन्नद्ध। किती करिशी रे अनुवाद। होई सावध चावटा ॥४०॥ वोढी काढोनि सत्राणें। गद विंधिला आठ बाणें। येरू धनुर्विद्या जाणें। बाण तत्क्षणीं तोडिले ॥४१॥




गदें ओढोनियां कानाडी। धगधगित बाण सोडी। पाडिले जरासंधा झांपडी। निवारण परवडी न करवे ॥४२॥ जरेनें सांधिला जो सांधू। तो संधि पाहूनि विंधी गदू। वर्मी खोंचला जरासंधू। रणमदू उतरला ॥४३॥ बाण खोंचला अतिनिगुती। विकळ गेला दोहीं हातीं। गळोनि धनुष्य पडिलें क्षितीं। गदें ख्याती लाविली ॥४४॥ मागधासी पडिले टक। तटस्थ ठेला मुहूर्त एक। पोटीं रिघाला जी धाक। तुटलें तुक युद्धाचे ॥४५॥ जरासंध मागें पाहे। रणीं कोणी न देखे साहे। बळिभद्रें झोडिले रायें। हुबत घायें पडियेले ॥४६॥ मुळींच झाला अपशकुन। पडिले हातीचे धनुष्यबाण। सिद्धी नपवे आंगवण। रणांगण सांडिलें ॥४७॥ काल साह्य श्रीकृष्णासी। यश आलें यादवासी। पाठी देऊनि गदासी। निघे वेगेंसी जरासंध ॥४८॥ जरासंध मोडल्यापाठीं। पळतां राजे देखती दृष्टी। तिंही सांडिल्या युद्धगोष्टी। उठाउठी पळाले ॥४९॥ यादवां यश आलें गाढें। पळतां न पाहती मागें पुढें। रथ गज सांडूनि घोडे। वीर वेगाढे पळाले ॥५०॥ पळतां पडताती वेंगडी। योद्धे नव्हों आम्ही वऱ्हाडी। बळिभद्रें निजपरवडी। रणलुगडीं वोपिलीं ॥५१॥ नवरीचा वडील भावो। तेणें दिधला गौरवो। पाठी तांबड्या करूनि पाहा वो। रायें रावो बोळविले ॥५२॥ निजप्राप्तीसी विन्मुख। युद्धीं जाले पराङ्मुख। राजे नरवीर अनेक। पळतां दुःख पावले ॥५३॥ अत्यंत प्रळय करितां देख। संकर्षणें दिधली हांक। पोटीं घेऊनियां धाक। एकेएक पळाले ॥५४॥ देहलोभियें बापुडीं। पायीं ममतेची वेंगडी। विस्मरणाची खरस तोंडी। जरें मुरकुंडी घालिती ॥५५॥ सांडिली पुरुषार्थलुगडीं। केवळ नागवीं उघडीं। विन्मुख पडती

उबडी। मेलीं मढी होउनी ठेली ॥५६॥ चहू पुरषार्थी नव्हे वाट। केवळ नरस्तुतीचे भाट। करिती युक्तीची वटवट। भिकें पोट भरूं आले ॥५७॥ एकें लटिकेंचि करूनि खत। धरणें करूं ऐसें बोलत। आम्हांसी विन्मुख जगन्नाथ। जीवघात करूं नका ॥५८॥ नवविध लुगडीं सांडुनि वेगीं। प्रपंचराख लाविती आंगीं। अलक्ष्य चुकोन झाले जोगी। भिकेलागीं हिंडावया ॥५९॥ एक मरणाचेनि धाकें। काखे लोभाचे चौंडके। प्रपंच गोंधळाचेनि हरिखे। उदो म्हणूनी नाचती ॥६०॥ एकी धाक घेतला भारी। धनलोभें कापती टिरी। अधर्मटोले वाजती शिरीं। मुखी उच्चारू नकारू ॥६१॥ कामखंडेरायापुढे। एक कुतरें झालें गाढें। कोणी आलिया दारापुढें। वसवसूनि ऊठती ॥६२॥ एक जाले जी कापडी। सलोभलोभें रंगलीं लुगडीं। धरूनि जीवित्वाची गोडी। तीर्थपरवडी सांगती ॥६३॥ पळतां न पळवे निश्चित। म्हणोनि बैसले ध्यानस्थ। पूजा लोकांची वांच्छित। भोगीं चित्त ठेवोनिया ॥६४॥ दांती तण तोडिती पाहीं। एक म्हणती आम्ही गाई। पशु जाहलों मनुष्यदेही। अभक्ष्य पाहीं भक्षिती ॥६५॥ केवळ देहलोभासाठी। मोक्षश्रियेसी पडिली तुटी। युद्धी पळालियापाठीं। आपदा मोठी वीरांसी ॥६६॥ यादववीर जगजेठी। न लागती पळतियापाठी। भेडें न पाहतीच दृष्टीं। उठाउठी पळालीं ॥६७॥ रणीं जिंकिले महाशूर। तुरें वाजती अपार। विजयी जाले यादववीर। जयजयकार प्रवर्तला ॥६८॥ वीर सांगती युद्धगोष्टी। सोडिल्या कवचांच्या गांठी। उल्हास भीमकीच्या पोटीं। हरिख सृष्टी न समाये ॥६९॥ आपुले न पडतीच रणीं। बंधू आले नाहींत कोणी। राजे गेले जी पळोनी। भीमकी मनीं हरिखलीं ॥७०॥ आतां कृष्णरुक्मिया सन्नद्ध। दोघां होईल द्वंद्वयुद्ध। मेहुणेपणाचा विनोद। अतिविनोद निकराचा ॥७१॥ पुढील कथा अतिगहन। रसाळ आहे अनुसंधान। एका विनवी जनार्दन। सावधान परिसावें ॥७२॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे यादवविजयो नाम एकादश: प्रसंग: ॥११॥

॥श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु॥

## ।। प्रसंग बारावा ।।

श्रीगणेशाय नमः ।। निजमंडपीं शिशुपाळ । करीत होता गदारोळ । भीमकी घेऊनि गेला गोपाळ । ऐकोन विकळ पडियेला ।।१।। पांडुरवर्ण झाले डोळे । मुखींहूनि लाळ गळे । सेवक धरिती आंगबळें । गात्रें विकळें पडियेली ।।२।। भीमकीअप्राप्तीचे बाण । हृदयीं लागले दारुण । घायेंवीण घेतला प्राण । अकालमरण वोढवलें ।।३।। वोखेटवाणें दिसे मुख । नाडी तुटल्या निःशेष । कृष्णधाकाची धुकधुक । हृदयामाजीं उरली असे ।।४।। महाशब्द मंडपद्वारीं । मिळालिया नगर-नारी । माता येऊनि रुदन करी । कपाळ करीं पिटीत ।।५।। सिद्धीं नपवेचि गे शोभन । वायां गेलें वरमायपण । अंबिका क्षोभली गे जाण । वराचे प्राण वांचोत कां ।।६।। थोर वोडवलें दुःख । न देखेंचि सुनमुख । बुडालें सोहळ्याचें सुख । हरिखीं विख कालविलें ।।७।। अगे हा रुक्मिया दुर्बुद्धी । न पाहेचि लग्नशुद्धी । मृत्युपंचकाचे संधी । लग्नसिद्धि मांडिली ।।८।। कृष्ण ज्योषिती गे निका । वश नोहे पांचां पंचकां । काळ साधिला नेटका । समयो देखा तो जाणे ।।९।। तेणेंचि साधिली गे वेळ । साधोनि नेली भीमकबाळ । आमुचें करंटें कपाळ । आतां शिशुपाळ वांचवा ।।१०।। विलाप करूनि अनेक । शिंपिलें शिशुपाळाचें मुख । वारा घालिती एक । झाला नावेक सावध ।।११।। उठूनि बैसला एकसरें । श्वास घालता पैं थोरें । दुःख हृदयींचें नावरे । नेत्रद्वारें जळ चाले ।।१२।। शिशुपाळा आलें रुदन । न धरत चालिलें स्फुंदन । धीरें आवरूनियां जाण । शहाणपणा मांडिले ।।१३।। नोवरी नेली रे सुंदर । पडिले समर्थासीं वैर ।





कृष्ण नेटका झूंजार । आणि बळिभद्र महाबळी ।।१४।। हेच दोघे नावरती । येर यादव ते किती । ऐसें विचारूनि चित्तीं । काय वीराप्रती बोलिला ।।१५।। सैन्य पालाणा पालाणा । घाव घाला रे निशाणा । रथ संजोगोनि आणा । रणांगणां जाऊं वेगीं ।।१६।। सन्नद्ध करूनियां दळ । रथीं चढला शिशुपाळ । नगरद्वारा आले सकळ । पुढें घायाळ भेटले ।।१७।। घायीं तुटले सबळ । अशुद्धें झाले बंबाळ । बाणीं भेदलें कपाळ । वीर विकळ पडताती ।।१८।। वीरी घेतलें घायवारें । म्हणती पळा रे पळा रे । मारिले जाल रे बळिभद्रें । साह्य दुसरें कोणी न ये ।।१९।। एकीं घेतला भेदरा । एक कांपती थरथरां । करूं नको गा बलिभद्रा । दास डिंगर आम्ही तुझे ।।२०।। एकाचे तुटले पैं हात । एकीं विचकले दांत । एक कण्हत कुंथत । तवा देत पैं आले ।।२१।। एक घायीं जर्जर बहुत । एक हंबत हुंबत । एकांची लोंबती आतें । घायीं कोतें अडकलीं ।।२२।। एक रडत पडत । एक अत्यंत चरफडित । एक पाणी जी मागत । खुणा हात दाउनी ।।२३।। मस्तक फुटोनि वाहे रुधिर । एकाचें अर्ध तुटले शिर । ऐसाचे घायीं बुडाले तीर । तेणें वीर तळमळतीं ।।२४।। भले गौरविले वऱ्हाडी । थितीं गेलीं लेणीं लुगडीं । एक नागवी उघडीं । मेलीं मढीं वोढिती ।।२५।। घायाळा घालोनि वोडणी । धनुष्यदंडाच्या अडणीं । उचलोनि दोघीं चौघीं जणीं । वीरश्रेणी आणिल्या ।।२६।। एक मार्गी झालें पुरें । एकाचें आणिले खटारें । वीर आपटिले जी वीरें । बळिभद्रें मारिले ।।२७।। राये खोचले मुगुटांचे । अत्यंत प्राण विकळ त्यांचे । सेवक उचलिती पायांचे । डोळे मोरकुंचे वारिती ।।२८।। देखोनि दचकला शिशुपाळ । धांकिन्नलें त्याचें दळ । राजे मारिले सबळ । प्रबळ बळ यादवांचे ।।२९।। युद्धीं झाले पराङ्मुख । राजे भंगले

अनेक। आले जरासंधादिक। मोडले कटक घेउनी ॥३०॥ भेटला शिशुपाळ सन्मुख। अत्यंत कोमाइलें त्याचें मुख। बुडालें सोहळ्याचें सुख। हृदयीं दुःख भीमकीचें ॥३१॥ दुःखे मुख काळवंडलें। दोन्ही ओंठ वाळले। लाजा न बोलवे बोलें। तें देखिलें जरासंधें ॥३२॥ मग म्हणे पुरुषपंचानना। व्यर्थ खेद कां करिसी मना। प्राप्ताप्राप्ताची गणना। आधीन कोणा पैं नाहीं ॥३३॥ संसार म्हणजे खांबसूत्र। चौऱ्यायशीं लक्ष पुतळ्या विचित्र। त्यांचा सूत्रधारी ईश्वर। त्याचिया इच्छें वर्तिजे ॥३४॥ आपण राहोनियां दूरी। हालवी प्राचीनाची दोरी। भूतें तदनुसार सारी। निजव्यापारी वर्तती ॥३५॥ तेथें सुखदुःख निजतंत्र। मांडूनि ठेविलें स्वतंत्र। ते ते तिये गती पात्र। अहोरात्र होताती ॥३६॥ येथें यश आलियाचे सुख। अथवा अपेशाचें दुःख। अहंपणें मानिती मूर्ख। कर्ता देख तो नव्हे ॥३७॥ येथें कर्ता जो मी म्हणे। तो पडे सुखदुःखांचे नागवणे। जन्ममरणांसी अवतणें। दिधलें तेणें सर्वथा ॥३८॥ अहंकर्तेपणाचा भावो। तोचि सुखदुःखांसी ठावो। जन्ममरणाचा निर्वाहो। तेणेंचि पाहाहो होतसे ॥३९॥ यालागीं अहंकर्तव्यता। मनीं न धरावी सर्वथा। भीमकीप्राप्तीची व्यथा। दुर्गमता येवों नेदी ॥४०॥ म्यांचि पाहें पां केवळ। तेवीस अक्षौहिणी दळ। युद्ध केलें सत्रा वेळ। एक वेळ जयो आला ॥४१॥ भंग झालियाचे दुःख। अथवा यश आलियाचें सुख। हें न मानूनियां देख। यथासुखें वर्तावे ॥४२॥ एवं सुखदुःख जें आहे ॥ तें तवं काळाधीन पाहें। तो काळ ज्यासी साह्य होये। तोचि लाहे यशातें ॥४३॥ आजि तुज युद्धासी जातां। यश न ये गा सर्वथा। काळ साह्य श्रीकृष्णनाथा। झाला तत्त्वतां निजबळें ॥४४॥ काळ साह्य झालेपणीं।





प्राप्त झाली बा रुक्मिणी। मजसकट राजे राणी। तृणप्राय जिंकिले ॥४५॥ तो जंव काळ साह्य नाहीं। तंववरी युद्ध करिशील कायी। वीर झोडिजेतील घायीं। योद्धे ठायी पडतील ॥४६॥ जंव अनुकूळ नाहीं काळ। तोंवरी काय करिशील बळ। सिद्धी न पवे गा सकळ। श्रम केवळ पावशील ॥४७॥ यालागीं धीर धरीं शहाणपणीं। जंव होय काळसाह्याची मांडणी। मग यादव जिंकोन अर्धक्षणीं। केवीं रणीं राहातील ॥४८॥ यापरी राजमित्र जरासंध। करीत शिशुपाळासी बोध। मग सोडोनि युद्धक्रोध। निजनगरासी निघाला ॥४९॥ शिशुपाळासी युद्धाआंत। जीवेंचि घेता कृष्णनाथ। आजिचा चुकविला जी अनर्थ। हित मानित दमघोष ॥५०॥ तो म्हणे जरासंधासी। उत्तीर्ण नव्हे उपकारासी। तुवां वांचविले शिशुपाळासी। पुत्रदानासी तूं दाता ॥५१॥ ऐसें मानुनियां सुख। परतला जी दमघोष। घेऊनि सोयरे सेवक। एकेंएक परतले ॥५२॥ युद्धीं यादवीं मारितां। राजे उरले जे झुंजतां। तिहीं मानूनियां हिता। मग सर्वथा निघाले ॥५३॥ घायीं जर्जर नेणों किती। नागविली सैन्यसंपत्ती। आपुलालिया नगराप्रती। वेगें भूपती निघाले ॥५४॥ मग परतला शिशुपाळ। राजे चालिले सकळ। रुक्मिया कोपला प्रबळ। सन्नद्ध दळ तेणें केले ॥५५॥ धुर रणीं होय विन्मुख। तेव्हांचि त्याचें काळें मुख। कवण वांचल्याचें सुख। घेऊनि विख मरावें ॥५६॥ जरासंध शिशुपाळ देखतां। सकळ राजेही ऐकतां। उभा करोनि भीमकपिता। थोर गर्जता तो झाला ॥५७॥ तुम्ही सांडिले पुरुषार्था। मी तंव नेऊ नेदी राजदुहिता। रणी जिणोनि कृष्णनाथा। भीमकी आता आणीन ॥५८॥ कृष्ण विभांडोनि बाणी। हिरोनि नाणींच रुक्मिणी। तरी स्वधर्म सांडिजे ब्राह्मणीं।

मजलागोनी तो दोष ॥५९॥ जे करिती सांधुनिंदा । त्या पापाची मज आपदा । रणीं न जिंकितां गोविंदा । जरी मी नुसधा परतेन ॥६०॥ विद्या होऊन गर्वा येती । विकल्पूनि गुरुसी निंदिती । तीं तीं पापें मज होती । जरी मी श्रीपती न जिंके ॥६१॥ केवळ पूज्य मातापिता । त्यांतें पुत्र हाणे लाता । तीं तीं पापें मजचि आतां । जरी श्रीकृष्णनाथा न जिंके ॥६२॥ देखोनि साधुजनांसी । दोष आरोपिती त्यांसी । तीं तीं पापें मजसी । जरी मी कृष्णासी न जिंकें ॥६३॥ कृष्ण न जिंकितां रणीं । घेऊनि न येतां रुक्मिणी । पुरीं न प्रवेशें कौंडणीं । मुख परतोनी न दाखवी ॥६४॥ ऐसी वाहूनियां आण । कवचें लेइला । वेगें घेऊनि धनुष्यबाण । म्हणे आंगवण पहा माझी ॥६५॥ कृष्ण अज्ञानाची आदी । त्यासी हृदयीं नाहीं बुद्धी । पर्ण पाहे राक्षसविधीं । तें मी सिद्धी जाऊं नेदीं ॥६६॥ कृष्ण गर्वित एकलेपणीं । दुजियातें दृष्टीं नाणीं । हिरोनि नेली माझी बहिणी । तो मी बाणीं दंडीन ॥६७॥ रागें कांपत थरथरां । दांत खातसे करकरां । धूम्र निघत नेत्रद्वारा । रहंवरा चढिन्नला ॥६८॥ रथीं बैसला मदगर्वित । वेगे सारथ्यातें म्हणत । चपळ चौताळों दे रथ । कृष्णनाथ जेथें असे ॥६९॥ आजि कृष्णासी सन्नद्ध । करणें असे द्वंद्वयुद्ध । अगर्वीं धरितो गर्वमद । बुद्धिमंद श्रीकृष्ण ॥७०॥ अजि माझ्या तिखट बाणीं । कृष्ण खिळीन रणांगणीं । चोरूनि नेतो माझी बहिणी । कैसेनि रुक्मिणी जिरेल ॥७१॥ सैन्य अवलोकिले दृष्टीं । वीर चालिले जगजेठी । अश्वगजरथांचिया थाटीं । शस्त्रें मुष्टीं झळकती ॥७२॥ चतुरंग सैन्य सकळ । एक अक्षौहिणी दळ । सन्नद्ध करूनियां सबळ । संख्या केवळ परियेसा ॥७३॥ दोन लक्ष अठरा सहस्र । सातशें अधिक वीर । संख्या अक्षौहिणीप्रकार । केला निर्धार श्रीव्यासें ॥७४॥





किती गज किती रथ । अश्व पदाती समस्त । विभाग संख्या सुनिश्चित । पुराणोक्त सांगेन ॥७५॥ एकवीस सहस्र आठ शत । सत्तरी संख्या जी रथ । तितुकेचि गजभार उन्नत । सैन्य आंत चालती ॥७६॥ एक लक्ष सहस्र नव । तीन शतें पन्नास अश्व । पायांचे वीर अभिनव । सांगेन सर्व परियेसा ॥७७॥ पासष्ट सहस्र सा शतें । एक दशक अधिक तेथें । वीर पायांचे भिडते । युद्धीं पुरते निजगडे ॥७८॥ इतुकी सैन्याची मिळणी । तया नांव एक अक्षौहिणी । संख्या बोलिली पुराणीं । महामुनी श्रीव्यासें ॥७९॥ ऐसें निजसैन्य अद्भुत । त्यामाजी रुक्मिया विराजीत । साह्य आले राजे दक्षिणाद्वत । वीर गर्जत महाबळी ॥८०॥ रणीं जिणोनि जरासंध । मीनले गद हलायुध । अवघे करिती विनोद । थोर आल्हाद जेत्यांचा ॥८१॥ यादव मिळोनि थोर थोर । करिती परतावयाचा विचार । येतां देखोनि पारखे भार । मग सामोरे लोटले ॥८२॥ दोन्ही सैन्यां झाला मेळू । घायीं उठला हलकल्लोळू । वाजंत्र्यांचा ध्वनी प्रबळू । रणवेताळू खवळला ॥८३॥ कोपें चालिला रुक्मिया वीरू । ठाकोनि आला यादवभारू । तेथें न देखे शारंगधरू । रथ सत्वरू पेलिला ॥८४॥ एकाएकीं एकला चक्रपाणी । दुरोनि देखिला नयनी । एके रथीं कृष्णरुक्मिणी । देखोनि मनीं प्रज्वळला ॥८५॥ सांडोनि गोत्रकुटुंबासी । जेवी वैरागी निघे योगासी । तेवीं सैन्य सांडोनि यादवांपासीं । एके रथेंसीं धांविन्नला ॥८६॥ धनुष्य मांडूनि मांडणीं । गुण वाइला तत्क्षणीं । बाण लावूनियां गुणी । वोढी काढोनि चालिला ॥८७॥ श्रीकृष्ण देवांचा आदिदेवो । ईश्वर नियंता नेणे प्रभावो । कुमती धरोनिया मदगर्वो । काय पाहा वो बोलत ॥८८॥ कृष्णासी म्हणे राहें साहें । माझा यावा आला पाहें । चोरी

करून पळसी काये। कोण माय राखेल ॥८९॥ जगामाजी तूं चोर होसी। चोरूनि दिसों नेदिसी मागासी। आजि मी पावलों लागासी। केउता जासी निजचोरा ॥९०॥ उद्देशें देवा इंद्रादिकीं। होम कीजे अग्निमुखीं। ते अवघे तूं खाशी शेखीं। अग्निमुखीं कांहीं नुरे ॥९१॥ देव म्हणती आम्हांसी पावले। त्यांसी ठकवूनि हव्य त्वां नेलें। तें काउळें मत येथें न चाले। सांडीं वहिलें भीमकीसी ॥९२॥ जन्मोनियां यादववंशीं। कुळगोत्रा नाश करिसी। बुडविलें नांवरूपासी। जाती तुजपाशीं तवं नाहीं ॥९३॥ भोग अवघेचि भोगांसी। आणि योगिया म्हणविसी। मूळमाया ते तुजपाशीं। वेष धरिसी कपटाचा ॥९४॥ तुझिया कपटाची झाडणी। करावया आलों मी गुणी। झाडणी करीन रणांगणीं। झणीं पळोन जाशील ॥९५॥ सांडीं सांडीं माझी बहिणी। नाहीं तरी खोंचीन तिखट बाणीं। तीन बाण लावूनि गुणीं। चक्रपाणी विंधिला ॥९६॥ शार्ङ्ग टणत्कारूनि हरी। सा बाण घेतले करीं। तीन सोडूनि माझारीं। धनुष्य करीं छेदिलें ॥९७॥ सवेंचि सोडिलें आठ बाणांसी। चारी चहूं वारूंसी। सारथी पाडूनि धरणीसी। ध्वजस्तंभ छेदिला ॥९८॥ रुक्मिया कोपा चढिन्नला भारी। पंच बाण घेतले करीं ॥ रागें सोडिले कृष्णावरी। बळें निर्धारीं विंधित ॥९९॥ कृष्ण धनुर्वाडा निजगडी। अचुक संधानपरवडी। पांचही बाण वाणें तोडी। धनुष्य पाडी छेदुनी ॥१००॥ आणीक धनुष्य घेतलें वेगें। सन्मुख विंधों आला रागें। तेंही तोडिलें श्रीरंगें। आणीक वेगें घेतलें ॥१॥ बाण लावोनियां वोढी। तेंही कृष्ण सवेंचि तोडी। जें जें धनुष्य रुक्मिया काढी। तें तें तोडी श्रीकृष्ण ॥२॥ धनुष्य घेतलें घाव टाळूनी। अग्निअस्त्र लाविलें गुणीं। धूम्र कोंदला दिशा व्यापुनी। ज्वाळा गगनीं न





समाती ॥३॥ पर्जन्यास्त्र सोडिलें हरी। मेघ वर्षती मुसळधारीं। अग्नि शांत क्षणामाझारीं। वेगें श्रीहरी पैं केला ॥४॥ येरें वायव्यास्त्र लाविलें गुणीं। झंझामारुत सुटला रणीं। वाऱ्यानें जाऊं पाहे अवनी। टाळीं कानी बैसलीं ॥५॥ पर्वतास्त्र सोडी श्रीकृष्ण। वारा सांडिला बुझोन। येरें वज्रास्त्र सोडून। गिरी ताडून सांडिले ॥६॥ रुक्मिया कोपला महाथोर। कृष्णासी म्हणे स्थिर स्थिर। गुणीं लाविलें रुद्रास्त्र। महारुद्र प्रगटला ॥७॥ दाढा विक्राळा तिखटा। माथां मोकळिया जटा। काळिमा चालिलीसे कंठा। मिशा पिंगटा आरक्त ॥८॥ कृष्ण अस्त्रविद्याचतुर। बाणीं योजिला भस्मासुर। बाण देखोनि पळे रुद्र। धाके थोर कांपत ॥९॥ रुक्मिया आणिक शस्त्र विचारी। तंव कृष्णें धनुष्य छेदिलें करीं। सरली कोदंडसमग्री। रथावरी कांहीं नाहीं ॥११०॥ सरली धनुष्याची वोढी। परिघ घेऊन घातली उडी। कृष्ण विंधोनि परिघ तोडी। अपरवडी घायांची ॥११॥ परिघ तुटलियापाठीं। रागें पट्टिश घेऊनि उठी। न धरत पातला उठाउठी। कृष्णदृष्टी सूदली ॥१२॥ कृष्णें विंधिलें कठीण बाणां। पट्टिश उडविला गगना। सवेचि शूळ घेऊनि ताणी। हाणी कृष्णा पै आला ॥१३॥ दांत खातसे कराकरा। शूळ भोवंडी गरगरां। साहें म्हणे शार्ङ्गधरा। घायें पुरा करीन ॥१४॥ कृष्णें बाण सोडिला पाहीं। शूळ तोडिला तीं ठायीं। सवेचि पाडिला भोई। तीं ठायीं त्रिखंड ।१५॥ शूळ वाया गेलां थोरा। रुक्मिया चुरी दोनी कर। सवेचि घेवोनि तोमर। कृष्णासमोर धांविन्नला ॥१६॥ साहें म्हणे कृष्णनाथा। तोमर हाणों आलों माथां। माझारीं विंधिला येतयेता। घायें मागुता सारिला ॥१७॥ बाण आदळला थोर। छेदून पाडिला तोमर। रुक्मिया म्हणे मर मर। शक्ति थोर काढिली ॥१८॥

शक्ति घेऊनियां हातीं । म्हणे कृष्ण तुझा पाड किती । रणीं लावीन रे ख्याती । भद्रजाती लोटला ॥१९॥ कृष्ण जे जे बाण सोडी । शक्तिहस्तें रुक्मिया तोडी । रथ धरी मकरतोंडीं । शक्ति भोवंडां हाणावया ॥१२०॥ कृष्णें बाण सोडिला तिधारा । रुक्मियासी लागला पिसारा । मागें सारिला अउड बारा । शक्ति अंबरा उडविली ॥२१॥ रुक्मियाची क्षीण शक्ति । साह्य आले दक्षिणापती । तिहीं हांकिला श्रीपती । सैन्यसंपत्ति अनिवार ॥२२॥ कृष्ण नेटका झुंजार । बाणीं त्रासिले महावीर । आठ बाणीं खोंचली धुर । हाहाकार ऊठीला ॥२३॥ बाण सोडिले निर्व्यंग । घायीं निवटिलें चातुरंग । त्याच्या सैन्या झाला भंग । रणीं श्रीरंग खवळला ॥२४॥ बाण वरुषे शार्ङ्गधर । सैन्या झाला थोर मार । कोपें खवळला रुक्मिया वीर । साटोप दुर्धर मांडिला ॥२५॥ कृष्ण मारीन हें निर्धारीं । वोडण खांडें घेतलें करीं । पतंग जैसा दीपावरी । तैशापरी धाविन्नला ॥२६॥ रुक्मिया महावीर नेटक । वोडण स्वर्गाचा साधक । थरक सरक दावी चवक । अति निःशंक निजगडा ॥२७॥ वोडण धडकोनि आदळीत । खर्ग तोलोनि तळपत । उल्लाळ देऊनि उसळत । हात मिरवत खर्गाचा ॥२८॥ कृष्ण जे जे बाण सोडी । खर्गधारीं तितुके तोडी । चारी मारावया घोडीं । रथाबुडीं रिघों आला ॥२९॥ दारुक सारथी निजगडा । रथें करूं पाहे रगडा । कृष्णें विंधिला कुऱ्हाडा । रथाबुडीं येऊं नेदी ॥१३०॥ बाण आदळला सत्राणें । आडवें वोडण धरिलें तेणें । वाडण भेदूनियां बाणें । शिरींचा मुगुट पाडिला ॥३१॥ कोण आला रुक्मियासी । वेगें धाविन्नला मोकळे केशीं । हात घांसूनि भूमीसी । हातवशी खर्गातें ॥३२॥ कृष्णासी म्हणे देख देख । घायीं छेदीन रे मस्तक । विकट देऊनियां हांक । वेगीं




सन्मुख लोटला ॥३३॥ कृष्णें विंधिला तिखट बाण । तिळप्राय केलें वोडण । खर्ग छेदूनियां जाण । अणुप्रमाण तें केलें ॥३४॥ बाण वर्षला घनदाट । रुक्मिया भुलविला आली वाट । रथ लोटूनिया घडघडाट । मौर्व्या कंठ बांधिला ॥३५॥ धनुष्य घालूनियां गळां । वोढोनि आणिला घायातळा । कांपिन्नला भीमकबाळा । घनसांवळा देखतसे ॥३६॥ दाटोनि आणिलें जी क्रोधा । झळफळित काढिली गदा । म्हणे याच्या करीन शिरच्छेदा । येरी गदागदां कांपतसे ॥३७॥ काहीं न बोलवे सर्वथा । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । कृपाळुवा जगन्नाथा । यासी सर्वथा न मारावें ॥३८॥ कृष्ण म्हणे परतीं सर । येणें निंदा केली थोर । याचें छेदीन मी शिर । म्हणोनि शस्त्र उचलिलें ॥३९॥ तिखट देखोनि शस्त्रधारा । चरण न सोडीच सुंदरा । बोलोनि मृदु मंजुळ उत्तरा । गदाधरा विनविलें ॥१४०॥ सुरां असुरां तूं दुर्धर । योगिमाजी योगेश्वर । विश्वनियंता ईश्वर । वेदां पार न कळेचि ॥४१॥ ऐशियासी तुज युद्धीं । आवळूं पाहे हा अहंबुद्धी । पिता अवगणूनि तूंतें निंदी । होय अपराधी सर्वथा ॥४२॥ हा अभिमानिया मारिशी रणीं । माय प्राण सोडील तत्क्षणीं । होईल लौकिक टेहणी । माहेर येथूनि तुटेल ॥४३॥ जेथूनि उठे निंदा क्रोधू । त्या लिंगादेहाचा करीं छेदू । मारूं नको ज्येष्ठ बंधू । लोकविरुद्ध न करावें ॥४४॥ धरिलिया कृष्णाकांस । द्यावा दों पक्षीं उल्हास । नांदवावें सावकाश । येथें तेथें समत्वें ॥४५॥ न धरत चालले स्फुंदन । नेत्रीं लोटलें जीवन । झालें कृष्णचरणक्षालन । जगज्जीवन हांसिन्नला ॥४६॥ देखोनि बोलाची चातुरी । मग उचलिली दोहीं करीं । आलिंगिली प्रीतीं थोरी । बंधू न मारीं सर्वथा ॥४७॥ मस्तकवपना आणा पाणी । नाही आड ना विहीरवणी । घाला वाटेचें

## ॥ प्रसंग सोळावा ॥



श्रीगणेशाय नम: ॥ अंत्रपाट आहे ज्यासी। वेगें सावध करा त्यासी। पळ अक्षर निमिषोन्मिषीं। हरिचरणासी चिंतावें ॥१॥ सदुगुरु म्हणती सावधान। घटिका हो आली पूर्ण। वचनीं नेदावें प्रतिवचन। सावधान परिसावें ॥२॥ सांडा चौघींची कळकळ। महामौन्येंसी रहा निश्चळ। लग्नघटिका भरे चपळ। अतिसबळ वेगेसीं ॥३॥ अंगीं धरुनि जाणपण। वचना देती प्रतिवचन। तेणेंचि वचनें त्यांसी दूषण। सावधानपण त्यां नाहीं ॥४॥ अतिसमयो वर्ते लग्न। दोन्हीं पक्षीं सावधान। अच्युतचिंतनीं राखा मन। सावधान निजबोधें ॥५॥ ओंपुण्या पडली मिठी। द्वैतभावना सुटली गांठी। सुटला अंत्रपाट दृष्टी। उठाउठी हरीवरी ॥६॥ भीमकीमाथा एकाएक। कृष्ण अक्षता घाली देख। तोचि मस्तकीं हस्तक। परम सुख पावली ॥७॥ भीमकी कृष्णाचिया माथां। घालूं जाय जंव अक्षता। कृष्णचि देखे सभोवता। सबाह्यता हरि देखे ॥८॥ कृष्ण देखे जिकडे तिकडे। अक्षता घाली चहूंकडे। पुरोहित म्हणती लागलें वेडें। कृष्ण निवाडे नोळखसी ॥९॥ कृष्णालागीं परम पिसी। माळ घालूनि रथीं होतीसी। शेखीं कृष्णासी नोळखसी। केवीं नांदसी संसारीं ॥१०॥ ऐसें हें झालें पाणिग्रहण। कृष्णें प्रकृति पाहिली जाण। मग बांधावया कंकण। शुद्ध सुतें सुतविती ॥११॥ पहिलें सूक्ष्म अति अत्यंत। तेंचि अष्टधा वाढत। स्थूलमानें दृश्य होत। भग तोडित तडातडां ॥१२॥ पहिलें दुखंड केलें जाण। त्रिगुणगुणें घाली वळण। अर्ध स्त्रीनाम कंकण। अर्ध जाण



कृष्णपुरुषा ॥१३॥ एकचि तंतू द्वैत झाला। स्त्री अंगीं बाणला। अर्ध पुरुषत्व पावला। करीं बांधला कृष्णाचे ॥१४॥ फेडिलें मायेचें वधूवस्त्र। अष्टपुत्र्या पीतांबर। नेसली कृष्णमय स्वतंत्र। तेणें सुंदर शोभली ॥१५॥ मलिन वाम सांडी प्रकृती। सांडिलें दोहीं पक्ष न घेती। सलोभ उपाध्ये तें नेती। मग भांडती परस्परें ॥१६॥ भीमकिया वरिला नारायण। झळकत दृश्याचें करीं कंकण। सौभाग्यद्रव्यें देतसे वाण। आहेवपणा श्रीकृष्णें ॥१७॥ दिव्य शोभा शोभे कृष्ण। तेथींची शोभा वर्णी कोण। जाणती अनुभवीं सुजाण। सुख संपूर्ण तेथींचे ॥१८॥ जीवी जीवां पडली मिठी। बाह्य पालवां दिधल्या गांठी। भीमकी कृष्ण पाहें दृष्टीं। हरिख पोटीं न समाये ॥१९॥ विवाह होमलागी श्रीहरी। वेगें चला बोहल्यावरीं। कडे घ्यावी जी नोवरी। लहानथोरी वेढिला ॥२०॥ नोवरी धरितांचि हाती। नारी मिनल्या नेण किती। प्रकृती वेढिली श्रीपती। अडकले गोविंदा ॥२१॥ बाइल हाती धरिल्यासाठीं। कृष्ण गोविला जगजेठी। येरां जीवांची कायसी गोष्टी। बैसता पाठीं गोड लागे ॥२२॥ कृष्ण विचारी निजव्रती। मजचि वरी माझी प्रकृती। माझेनि गमन इसी निश्चितीं। लाजों किती लटिकाचीं ॥२३॥ हे बैसली माझिये कडियें। जीवेंभावें मज हे पढिये। प्रपंचाचे आंतुलेकडिये। नामरूप इचेनी ॥२४॥ मजवीण हे नोवरी। पुढें न चलें पाऊलभरी। लटकी लाज सांडुनि दूरी। वचन करी वडिलांचे ॥२५॥ आंगा नातळत श्रीहरी। हात न लाविता नोवरी। उचलोनी आणली बोहल्यावरी। नरनारी हांसती ॥२६॥ विवाहहोम झाला संपूर्ण। सप्तपदी पाणिग्रहण। भीमकें दिधली वरदक्षिणा जाण। भूरिदान वांटिलें ॥२७॥ कान पिळू मेहुणे भिती। होईल रुक्मियाची गती। परू

वाटवणी। विनोद मेहुणीं मांडिला ॥४८॥ अर्धखांड अर्धमिशी। पांच पाट काढिले शिसीं। विरूप केलें रुक्मियासी। गळा रथेंसीं बांधिला ॥४९॥ रुक्मिणीसी म्हणे श्रीकृष्ण। पाहें बंधूचें वदन। वेगें करीं लिंबलोण। सकळ जन हांसती ॥१५०॥ रुक्मियाचें विरूपकरण। यापरी करी श्रीकृष्ण। बळिराम येऊनि आपण। बंधमोचन करील त्यासी ॥५१॥ परिहारमिषें प्रबोध। भीमकीसी करील हलायुध। एका जनार्दनीं विनोद। परमानंद प्रगटेल ॥१५२॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे रुक्मिपराभवो नाम द्वादशः प्रसंगः ॥१२॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥





## ॥ प्रसंग तेरावा ॥

श्रीगणेशाय नमः ॥ येरीकडे दळभार। देखोनि चालिले यादववीर। लोटले येरयेरांसमोर। घायें निष्ठुर हाणिती ॥१॥ दक्षिणराजे निजभारीं। युद्ध पाहती राहोनि दूरी। रुक्मिया क्षीण केला हरी। कृष्णावरी उठावले ॥२॥ उरलें रुक्मियाचें दळ। यादवीं त्रासिले प्रबळ। वर्षोनियां बाणजाळ। वीर सकळ भेदिले ॥३॥ यादवांच्या तिखट बाणीं। निधडे वीर पडिले रणीं। धडमुंडांकित धरणी। अर्धाक्षणीं तिहीं केली ॥४॥ कृष्णें रुक्मिया बांधिला। उरलिया सैन्या पळ सुटला। जयो यादवांसी आला। मग परतला बळिभद्र ॥५॥ सरोवरामाजी कमळीं। गज करी रवंदळी। तैशी मर्दूनी शत्रुफळीं। कृष्णाजवळी तो आला ॥६॥ रुक्मियाचें विरूपकरण। देखता झाला संकर्षण। कृपा द्रवलें अंतःकरण। दीन वदन देखोनी। सोडोनियां गळबंधन। कृष्णासी म्हणे हे बुद्धि कोण। सोयरियांसी विरूपकरण। तें निंद्य जाण आम्हांसी ॥८॥ शरीरसंबंधासी विरूपबाधू। हा तंव वधाहूनि अधिक वधू। तुवां थोर केला अपराधू। सुहृदसंबंधू लाजविला ॥९॥ याचा वध तूं करितासी। तरी हा पावता निजसुखासी। मान देऊनि सोडितासी। सोयरिकेसी श्लाघ्यता ॥१०॥ क्षत्रिय सांपडे रणसांकडीं। त्यासी द्यावीं लेणीं लुगडीं। युद्धीं खांडमिशी बोडी। हे अपरवडी त्वां केली ॥११॥ सवेंचि म्हणे रुक्मिणीसी। दोष न ठेवावा आम्हासी। जो कर्में करी जैसीं। फळें तैसी तो भोगी ॥१२॥ कृष्ण निजतत्त्व तत्त्वतां। कर्में करूनि अकर्ता। बंधुवैरूप्याचा दाता। नव्हे सर्वथा श्रीकृष्ण ॥१३॥

तुझ्या बंधूचें जें वैरुप्य। तें त्याचें त्यास फळलें पाप। हेंचि जाणोनि भोगाचें निजरूप। सांडीं कोष सर्वथा ॥१४॥ येथें कर्ता तोचि भोक्ता। ऐसी कर्ममर्यादा तत्त्वतां। बोल न ठेवीं कृष्णनाथा। हृदयीं व्यथा न धरावी ॥१५॥ सवेंची म्हणे श्रीकृष्णासी। रणीं विटंबू नये सुहृदासी। बोल लागला क्षत्रियधर्मासी। हषीकेशी हें अनुचित ॥१६॥ दंडा योग्य जरी अपराधू। तरी दंडुं नये सोयरा बंधू। दंडापरीस अधिक बाधू। न मारूनि वधू तुवां केला ॥१७॥ इतरांपासोनि अन्याय झाला। तो आपण पाहिजे क्षमा केला। शेखीं तवां सोयरा दंडिला। बोल लागला निजधर्मा ॥१८॥ जो आवडीनें विष प्याला। तो आपआपणा मारक जाला। त्या अन्याया दंड नाहीं वहिला। घात केला निजकर्में ॥१९॥ यालागीं प्रवर्ते जो अधर्मासी। तेणेंचि कर्में दंडिजें त्यासी। मेलेंचि तूं कां मारूं पाहसी। रुक्मियासी जाऊं दे ॥२०॥ मेलियासीच मारणें। हेंचि आम्हां लाजिरवाणें। विनोद न करावा मेहुणेपणें। सोडूनि देणें सर्वथा ॥२१॥ सवेंचि म्हणे रुक्मिणीसी। कठिण कर्म क्षत्रियांसी। उल्लंघु न करवे आम्हांसी। निजधर्मासी सर्वथा ॥२२॥ विधात्याने नेमिला नेम। क्षत्रियांचें अघोर कर्म। दारुण मांडिलीया संग्राम। आपपर न म्हणावा ॥२३॥ समरंगणीं सन्नद्धू। सन्मुख आलिया पिता बंधू। रणांगणीं करिता वधू। नाहीं बाधू क्षत्रियां ॥२४॥ ऐसें जाणूनि रुक्मिणी। खेद न करीं वो मनीं। सवेंचि म्हणे शार्ङ्गपाणी। विरुद्ध करणी तुवां केली ॥२५॥ राज्यलोभें श्रीमदांध। त्यासी उपजे कामक्रोध। तेणें लोभें होऊनि मंद। थोर विरुद्ध आचरती ॥२६॥ आपुलें राज्य जातां। कीं पुढिलांचे राज्य घेतां। तेणें स्वार्थें क्रोध चित्ता। उठे सर्वथा अनिवार ॥२७॥ नातरी वृत्तिभ्रमिउच्छेद। होतां सज्ञान होय





मंदु। तोहीं करू लागे विरोधु। निंदानुवादू द्वेषाचा ॥२८॥ अथवा धनागमनागमनीं। प्रबळ लोभ उपजे मनीं। वेदविक्रय कीजे ब्राह्मणीं। धनालागीं कलियुगीं ॥२९॥ धनालागीं वेदाध्ययन। धनालागीं पुराणपठण। धनालागीं व्याकरण। शास्त्रश्रवण वेदांत ॥३०॥ धनालागीं घेती दान। धनालागीं होती सज्ञान। धनालागीं नीचसेवन। उपसर्पण हीनाचें ॥३१॥ धनालागीं देह विकिती। धनालागीं दांभिक भक्ती। धनकामना कर्में करितीं। नानावृत्ती धनेच्छा ॥३२॥ त्या धनास होय अवरोधू। तेव्हां सज्ञानियासी उपजे क्रोधू। विवेकीही होय मंदू। प्रबळ विरोधू धनवंता ॥३३॥ आणीक एक थोर कारण। जेव्हां होय दाराहरण। न विचारितां आत्ममरण। वेंचिती प्राण स्त्रीलोभें ॥३४॥ अथवा होतां मानहानी। विवेकी होय अभिमानी। निंदा द्वेष उपजे मनीं। मानालागोनीं सर्वथा ॥३५॥ कां आंगींचेनि शौर्यतेजें। येरयेरां निंदिती राजे। वीर्यशौर्याचेनि माजें। अतिउन्मत्त होउनि ॥३६॥ अणुमात्र स्वार्थाचा अवरोधू। होतां समस्तां उपजे क्रोधू। स्वार्थालागोनि विरोधू। पडे संबंधू द्वेषाचा ॥३७॥ इतुकीं कारणें सर्वथा। तुज तव नाहीं गा कृष्णनाथा। रुक्मियाची विरूपता। कवण्या अर्था तुवां केली ॥३८॥ तूं परिपूर्ण आत्माराम। तुज सर्वथा नाहीं काम। तरी कां केलें निंद्य कर्म। क्षत्रियधर्म हा नव्हे ॥३९॥ सवेंचि म्हणे रुक्मिणीसी। पावोनियां कृष्णचरणासी। विषमबुद्धी तुजपाशीं। निजमानसीं न धरावी ॥४०॥ सुहृद दुर्हृद उदासीन। ऐसें त्रिविध न करी मन। सर्वांभूतीं सदा संपूर्ण। पाहें श्रीकृष्ण सर्वदा ॥४१॥ अभद्र व्हावे शिशुपाळासी। कल्याण रुक्मिया वांछिसी। हें विषमता तुजपाशीं। कृष्णसुखासी प्रतिबद्धक ॥४२॥ म्हणसी शिशुपाळा

कृष्णद्वेषी । सर्वदा अभद्र पाहिजे त्यासी । मातेचि दशा रुक्मियासी । तोहि कृष्णासी द्वेषित ॥४३॥ हा सर्व भूतात्मा हृषीकेशी । ऐशिया द्वेषिती जे कृष्णासी । तैशिया दुष्टां सोयरियांसी । भद्र वांछिसी तें अभद्र ॥४४॥ ऐशिया सर्वभूतद्वेषियासी । दंड मुंडन तें कल्याण त्यासी । तें तूं कल्याण मानिसी । चतुर नव्हेसी निजबोधें ॥४५॥ कृष्ण ज्ञानिया चतुर । विनोदरूपें केला उपकार । रुक्मियाचा नरक घोर । यमप्रहार चुकविला ॥४६॥ कृष्ण युद्धी रुक्मियासी । दंड न करितां खांडमिशांसी । तरी हा होता रौरवासी । अध:पातासी पैं जाता ॥४७॥ कृष्ण सोयरा स्नेहाळू । वपनरूपें अतिकृपाळू । केला निजकरें निर्मळू । फेडिला विटाळू द्वेषाचा ॥४८॥ यालागीं कृष्णें केलें तें भद्र । तूं कां मानितेसी अभद्र । कृष्ण ज्ञानियांचा नरेंद्र । वेदां पार न कळेंचि ॥४९॥ दुर्घट मोहो पैं प्राणिया । केली असे कृष्णमाया । ब्रह्मादिकां न येचि आया । देवमाया देहबुद्धी ॥५०॥ तये देहबुद्धीचें लक्षण । सुहृद दुर्हृद उदासीन । त्रिविध त्रिगुण न करीं मन । देहाभिमान नुपजवीं ॥५१॥ नश्वर देह तंव जाणती । देह निमालिया मृत्यु मानिती । देहसंबंधियां अतिप्रीती । येरां द्वेषिती उपेक्षा ॥५२॥ नाना अलंकारी कनक । तैसा सर्वांभूतीं आत्मा एक । हेचि नेणोनियां मूर्ख । एकासी अनेक म्हणताती ॥५३॥ अनेकां घटीं जेवीं अनेक । प्रतिबिंबोनि भासे अर्क । तैसा विश्वात्मा विश्वव्यापक । दिसे अनेक देहयोगें ॥५४॥ आकाश एकलें एक निर्मळ । मठीं चौकोनें घटीं वर्तुळ । विकारयोगे भासे प्रबळ । नव्हे केवळ निजवाच्य ॥५५॥ तैसा परमात्मा श्रीहरी । नाना आकारविकारीं । एकानेकत्वाते धरी । देहसंचारी देहयोगे ॥५६॥ येथें देहासीच जन्मनाश । आत्मा नित्य अविनाश । घटभंगें घटाकाश । सहजस्थिती





जेवीं विरे ॥५७॥ देहाचें जन्मकरण । महाभूतें गुणप्रमाण । अविद्येनें केलें जाण । जन्ममरण यालागीं ॥५८॥ अविद्येनें नवल केलें । मिथ्या देह सत्यत्वें दाविलें । तेंचि अभिमानें घेतलें । प्रेमें बांधिलें देहबुद्धि ॥५९॥ जयासी देहाभिमान थोर । तयासी कल्पना अनिवार । तेणेंचि दृढमूळ संसार । येरझार न खुंटे ॥६०॥ आतां ऐकें वो सुंदरी । परमात्मा अलिप्त चराचरीं । संयोगवियोगाचि परी । न धरीं संसारीं सर्वथा ॥६१॥ आत्मासंयोगेंविण सहसा । स्वयें संसार चाले कैसा । विकल्प न धरीं वो ऐसा । तेही दशा सांगेन ॥६२॥ जैसा रवि अलिप्त आकाशीं । दृष्टिरूपातें प्रकाशी । तैसा परमात्मा हृषीकेशी । संसारासी द्योतक ॥६३॥ नातरी तैसा खांबसूत्री । अचेतन पुतळ्या नाचवी यंत्रीं । एका जैत्य एका हारी । दोहीं परी अलिप्त ॥६४॥ पुतळ्याचेनि जालेपणे । नाहीं सूत्रधारिया जन्मणें । तयांचेनि निमालेपणें । नाहीं मरणें सर्वथा ॥६५॥ ऐसा अलिप्त कृष्ण प्रसिद्ध । तयासी दंड मुंडण अपराधू । लावितेसी तूं नववधू । नव्हे शुद्ध भाव तुझा ॥६६॥ कृष्णा चालक वेगळेपणीं । तरी व्यापकत्वा आली हानी । ऐसा न म्हणावे वो रुक्मिणी । तेही कहाणी ऐक पां ॥६७॥ जैसें गगन आपणावरी । शीत उष्ण-पर्जन्यधारी । परि अलिप्त तिही विकारीं । तैसा श्रीहरी कर्मासी ॥६८॥ गगन सर्वत्र तत्त्वतां । तयासी चिखल लावूं जातां । चिखलें माखे जो लाविता । गगन सर्वथा अलिप्त ॥६९॥ तैसेंचि जाण कृष्णनाथा । भोग भोगोनि अभोक्ता । कर्म करोनि अकर्ता । अलिप्तता निजबोधें ॥७०॥ कृष्णाअंगीं जे लाविती कर्म । तोचि त्यांसी होय अधर्म । हेंचि कोणा न कळे वर्म । कृष्ण निष्कर्म सर्वथा ॥७१॥ यालागीं तूं वो ऐसें जाण । देहासीच जन्ममरण । आत्मा अविनाश

परिपूर्ण। जीवि हें खूण राखावी ॥७२॥ लोकप्रवाद प्रबळा। नाश मानिती केवळा। चंद्री तुटलिया कळा। म्हणती नासला अंवसेसी ॥७३॥ चंद्रीं चंद्र यथास्थिती। कळाचि तुटती वाढती। तैसा आत्मा सहजस्थिती। नाशउत्पत्ती देहासी ॥७४॥ जैसी वांझेची संतती। तैसी संसारउत्पत्ती। भ्रांत सत्यत्वें मानिती। मिथ्या प्रतीति प्रबुद्धां ॥७५॥ स्वप्नीं देखें आत्ममरण। चितेसी घालूनि देह दहन। जागृती उदयीं मिथ्या स्वप्न। जन्ममरण मज नाहीं ॥७६॥ ऐसाचि जाण संसारक्रम। यालागीं भीमकी सोडीं भ्रम। कृष्ण पावलीसी पुरुषोत्तम। मिथ्या भ्रम करूं नको ॥७७॥ स्वप्नीं सोयरिया जालें दुःख। सत्य मानिती ते तंव मूर्ख। बंधुवैरुप्याचें असुख। सोडीं निःशेष वेल्हाळे ॥७८॥ कृष्ण न पावतांचि आधीं। शोक मोहो जीवासी बाधी। कृष्ण पावलीया आधी। व्याधी जाती त्रिशुद्धी सर्वथा ॥७९॥ कृष्ण पावलियापाठी। मोहो ममता तुझे पोटीं। कृष्ण नोळखसी वो गोरटी। आत्मदृष्टी तुज नाहीं ॥८०॥ आत्मदृष्टीचें लक्षण। दृश्य द्रष्टा आणि दर्शन। तिन्ही होऊनि अकारण। परिपूर्ण श्रीकृष्ण ॥८१॥ तेथे कैचे धरिसी ध्यान। ध्याता ध्येय जालें शून्य। तुटला बोल खुंटले मौन। चैतन्यघन श्रीकृष्ण ॥८२॥ उरलें चिन्मात्र स्फुरण। तेंही मायिक तूं जाण। हेतु मातु नाही लक्षण। ऐसा श्रीकृष्ण जाणावा ॥८३॥ होती कृष्णरूपीं संलग्न। ऐकोनि बळिरामवचन। कृष्णमय झालें मन। तेणें स्फुंदन चालिले ॥८४॥ कृष्णभाव झाला चित्ता। गेली देहबुद्धी सर्वथा। चरणांवरी ठेविला माथा। तिन्ही अवस्था सांडुनी ॥८५॥ वाचा झाली सद्गद। निःशेषे खुंटला अनुवाद। सुखें कोंदला परमानंद। पूर्ण बोध भीमकीसी ॥८६॥ नाठवती भावे दीर। वृत्ति झाली कृष्णाकार। ब्रह्मरूपें चराचर। देखे





सुंदर निजबोधें ॥८७॥ देखोनि भीमकीची निजवृत्ती। हरिख न माये रेवतीपती। उचलोनियां दोहीं हातीं। अतिप्रीती मानिली ॥८८॥ कृष्ण बळिभद्र रुक्मिणी। तिघें मीनलीं पूर्णपणीं। परमानंद रणांगणीं। भावें रुक्मिणी भोगीत ॥८९॥ कृष्णरुक्मिणी हलायुध। तिघां झाला एकचि बोध। एका जनार्दनीं आनंद। परमानंद प्रगटला ॥९०॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंश-संहितासंमते रुक्मिणीबोधे रुक्मिबंधनमुक्तिर्नाम त्रयोदशः प्रसंगः ॥१३॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥

## ।। प्रसंग चौदावा ।।

श्रीगणेशाय नमः ।। यापरी कृष्णपत्नी। रामें प्रबोधिली वचनीं। रुक्मिया दिधला सोडोनी। विरूपपणीं सलज्ज ।।१।। दीन हीन गेली कळा। वीर्यशौर्य मुकला बळा। केवीं मुख दाखवूं भूपाळा। भीमकबाळा न सुटेचि ।।२।। पित्यानें म्हणीतलें नपुंसक। त्या वचनाचें थोर दुःख। दाविता विरूपतेचें मुख। सकळ लोक हांसती ।।३।। प्रतिज्ञा करूनि वाहिली आण। रणीं विभांडोनि श्रीकृष्ण। भीमकी आणीन मी जाण। तोही पण सिद्धी नपवेचि ।।४।। यालागीं न वचें कौंडिण्यपुरा। लाजां राहिला बाहिरा। उभवोनि भोजकटनगरा। वस्तीसी थारा तेणें केला ।।५।। रुक्मिया सोडिल्यापरी। यादवांच्या दळभारी। लागलिया निशाणभेरी। जयजयकारीं गर्जती ।।६।। यापरी रणांगणीं। जिणोनि महावीरश्रेणी। कृष्णें आणिली रुक्मिणी। अतिविंदानी लाघवी ।।७।। कृष्ण निघाला वेगेंसी। आला प्रभासक्षेत्रासी। तेथें पूजोनि सोमनाथासी। दुसें चोपाशीं दिधलीं ।।८।। पाहोनि सावकाश वाडी। कटक उतरलें निरवडी। हट चोहट परवडी। घडामोडी वस्तूंची ।।९।। राजे प्रजा देशदेशिक। नगर नागरिक लोक। उपायनें जी अनेक। येती सन्मुख घेउनी ।।१०।। जिणोनि सकळिकां रायांसी। विरूप करूनि रुक्मियासी। कृष्णें नेले नोवरीसी। भीमकासी श्रुत जालें ।।११।। ऐकोनि जालें अत्यंत सुख। जीवीं न समाये हरिख। मज तुष्टला आदिपुरुख। भाग्य चोख भीमकीचें ।।१२।। मजपासूनि दोघां जन्म। परी दोहींचें भिन्न कर्म। भीमकी पावली पुरुषोत्तम। विरूपकर्म रुक्मिया ।।१३।। रुक्मिया





निंदी कृष्णासी। तेणेंचि कर्में वैरूप्य त्यासी। भीमकीभावार्था कृष्णचरणासी। अर्धांगासी पावली ।।१४।। आपला भावार्थचि जाण। कृष्णप्राप्तीसी कारण। यावेगळें शहाणपण। केवळ जाण दंभार्थ ।।१५।। याचिलागी निजभावेंसीं। शरण जावें श्रीकृष्णासी। भीमकी अर्पूनियां त्यासी। हृषीकेशी भजावें ।।१६।। पाचारून शुद्धमतीसी। वृत्तांत सांगितला तियेसी। येरी म्हणे रहावा श्रीकृष्णासी। कन्यादानासी विधि करूं ।।१७।। कन्यादानाचेनि मिसें। कृष्ण पूजूं सावकाशें। पांचां पंचकाचें फिटेल पिसें। अनायासें मन निवे ।।१८।। भीमक निघाला वेगेंसी। ठाकोनि आला प्रभासासी। लोटांगण श्रीकृष्णासी। निजभावेंसीं घालित ।।१९।। त्राहि त्राहि जी दातारा। नेत्रीं अश्रूंचिया धारा। कृपा उपजली कृष्णवीरा। वेगें सामोरा धाविन्नला ।।२०।। उचलोनियां वेगेंसीं। हृदयीं घरी हृषीकेशी। येरें मिठी घातली कंठेसीं। भावार्थेसी मिसळला ।।२१।। जीवींच्या जीवा झाली भेटी। कांही केलिया न सुटे मिठी। बाप कृपाळू जगजेठी। पूर्णदृष्टीं पाहिला ।।२२।। सच्चिदानंदें झाला तृप्त। सबाह्य देखे कृष्णनाथ। फिटला आर्तीचा मनोरथ। कृतकृत्यार्थ पैं झाला ।।२३।। मग म्हणे जयजय चक्रपाणी। माझे भाग्य तें रुक्मिणी। विनटली तुझ्या चरणीं। कुलतारिणी चिद्गंगा ।।२४।। शुद्ध करीत दोहीं कुळां। जेवीं प्रवाह गंगाजळा। तेवीं जन्मली हे बाळा। सकळ कुळा उद्धार ।।२५।। श्रद्धा शांति निवृत्ति भक्ती। ते हे भीमकी निजमूर्ती। तुज वोपिलो श्रीपती। एक विनंती परिसावी ।।२६।। वीर्यशौर्यें भीमकीहरण। करितां नलगे अर्धक्षण। आतां विधियुक्त कन्यादान। पाणिग्रहण करावें ।।२७।। हेचि विनंती गरुडध्वजा। चारी दिवस माझी पूजा।

अंगिकारावी अधोक्षजा। दास मी तुझा निजभावें ॥२८॥ ऐका श्रीकृष्णविंदान। भक्ताधीन होय आपण। भीमकीचे पाणिग्रहण। भावे जाण करीतसे ॥२९॥ होते श्रीकृष्णाचे मनीं। जे संभ्रमें पर्णावी रुक्मिणी। देवकी सुभद्रादि आणोनी। महोत्सव करावा ॥३०॥ हेंचि भीमकीच्याही चित्तीं। सोहळेनि वरावा श्रीपती। हळदी लावीन आपुलें हातीं। बोहल्याप्रती बैसोनि ॥३१॥ दोघांसीही प्रीतिकर। भीमक बोलिला नृपवर। कृष्णासी मानलें उत्तर। हर्षे निर्भर भीमकी ॥३२॥ कृष्ण म्हणे ज्येष्ठ माझा। दादोजीस विनंती करा जा। राम नमस्कारी राजा। चरण वोजा धरियेले ॥३३॥ कृष्णासी म्हणजे बळिभद्र। होसी कार्यार्थी अतिचतुर। रामे उठवूनि नृपवर। थोर सन्मान त्या केला ॥३४॥ राजा म्हणे गा श्रीहरी। माझा आश्रम पवित्र करीं। आपुल्या दासातें उद्धरीं। कौंडिण्यपुरीं त्वां यावें ॥३५॥ भीमकी म्हणे ऐक ताता। भाग्यें पावलासी कृष्णनाथा। मागें सरों नको सर्वथा। गृहममता सांडावी ॥३६॥ सर्व सामग्री जीवेंभावेंसी। आवडीं आणावी कृष्णापाशीं। भावें पूजिल्या हृषीकेशी। सकळ कुळासी उद्धार ॥३७॥ वचना मानवला बळिदेवो। ऐकोनि हांसिन्नला देवाधिदेवो। पाणिग्रहण मूळमाधवो। मुळींचा ठावो लग्नासी ॥३८॥ भीमक म्हणे कळलें बीज। कृष्णपूजनें आमुचें काज। धन्य धन्य माझी आत्मज। श्रीकृष्ण निजबीज पावली ॥३९॥ इच्या वचनाचें महिमान। पाहतां बुडोनि ठेलें मन। वचनें पळविला अभिमान। मीतूंपण उडविलें ॥४०॥ बाप माझें भाग्य थोर। कृष्ण परब्रह्म साचार। भीमकीयोगें चराचर। ब्रह्माकार पै जाले ॥४१॥ अवचटें श्रीकृष्णचरणी। वंशींचें विनटलिया कोणी। तोचि सकळ कुळातें तारुनी। परब्रह्मभवनी





नांदवी ॥४२॥ ऐशा सुखाचेनि हरिखें। राजा बोलिला निजमुखें। वचन भीमकीचें कौतुकें। अवश्यक मानिलें ॥४३॥ सेवक पाठविले नगरासी। वैभवसामग्री वेगेसीं। नगर नागरिकवासी। मूळमाधवासी आणावें ॥४४॥ सर्वेंचि विनवी श्रीकृष्णासी। मूळ पाठवा जी द्वारकेसी। देवकी आणि वसुदेवासी। सोहळ्यासी आणावें ॥४५॥ भाव जाणोनि मानसीं। संतोषला हृषीकेशी। मूळ पाठविलें द्वारकेसी। सकळिकांसी सोहळिया ॥४६॥ पाचारूनी विश्वकर्म्यासी। आज्ञा दिधली मंडपासी। मूळमाधवीं अतिविशेषीं। शोभा चौपाशीं आणावी ॥४७॥ मूळमाधवी अद्यापवरी। वृक्षमात्र मंडपाकरीं। कृष्णआज्ञा पैं तरुवरीं। अजूनिवरी पाळिजे ॥४८॥ मूळमाधवा आला परी। शोभा देखोनि साजिरी। संतोषला श्रीहरी। निजपरिवारीं उतरला ॥४९॥ तीर्थस्नान केलें सहजीं। मूळमाधवा माधव पूजी। पूजाविधी सांगिजे द्विजीं। पुण्यपूजीं ऋषीश्वरीं ॥५०॥ भीमकी दिधली भीमकापाशीं। थोर उल्हास झाला त्यासी। कन्या नेली निजमंडपासी। हृषीकेशी केळवला ॥५१॥ कौंडिण्यपुरींची आइती ॥ सकळ सामग्री संपत्ती। घेऊन आली शुद्धमती। भावें श्रीपती पूजावया ॥५२॥ कृष्णरुक्मिणींचे देख। पाहावया विवाहसुख। नगरनागरिक लोक। आले सकळिक उल्हासें ॥५३॥ थोर उल्हास श्रीकृष्णासी। मूळें पाठविलीं रायासीं। कुरु- सृंजय-कैकयासी। सोयरियांसी निजलग्ना ॥५४॥ कृष्णविवाह मनोहर। पाहों आले जी सुरवर। शिव शांभव यक्ष किन्नर। नारदादि वैष्णव ॥५५॥ वऱ्हाड निघालें द्वारकेबाहेरी। गणेश चढिन्नला उंदिरावरी। अग्रपूजेचा अधिकारी। निर्विघ्न करी लग्नासी ॥५६॥ सिंहें पसरिलें जाभाडें। दुर्गा येऊनि त्यावरी चढे। मुक्तकेश खांडे उघडें। तेही पुढें

निघाली ॥५७॥ वेगें आल्या अष्टमातृका । एकी चढिन्नली वृश्चिका । बाराही ते सूकरमुखा । वऱ्हाड देखा निघालें ॥५८॥ नेणती वऱ्हाडिणी चरबटा । स्थूल उदर दांत थोटा । उंदिरी चढोनि लुटलुटा । ढेरपोटा कां आला ॥५९॥ विक्राळ सिंहाचे जाभाडें । बाइले हातीं खांडें उघडें । कोण बोलाविलीं वऱ्हाडें । अवघ्यापुढें निघाली ॥६०॥ रोडके आंग चढे वृश्चिका । कोणें बोलाविली हे चंडिका । फजितीचे वऱ्हाड देखा । सूकरमुखा कां आली ॥६१॥ ऐसियांसी नेतां वऱ्हाडें । व्याही हांसती रोकडे । यांसी राहवा मागिलेकडे । वऱ्हाड पुढें चालो द्या ॥६२॥ मिळोनी पांचां पंचकांचा मेळा । निंदूं लागल्या त्या बरळा । कोपला गणेश मातृकांचा मेळा । तात्काळ देखा रुसलिया ॥६३॥ गणेशें केलें गाढें । ठायीं ठायीं मोडती गाढें । रथीचे पांगुळले घोडे । वऱ्हाड पुढें चालेना ॥६४॥ कोपलिया महामातृका । शीतज्वर सोडिला देखा । दुर्गा सोडी विषूचिका । हगी ओकी देखा सुटली ॥६५॥ ओकाओकी वऱ्हाडणी । एकी म्हणती पाणी । उठली माशांची गोंगाणी । साउली पोहाणी घालिती ॥६६॥ कृष्णासी लग्नाची अति गोडी । म्हणे कां न येती द्वारकेचे वऱ्हाडी । मार्गीं कांही पडली आडी । दूत तांतडी पाठविले ॥६७॥ दूत सांगती श्रीहरी । वऱ्हाडणींसी लागली शारी । खटखटां वाजती दांतोरी । रथीं कुंजरीं न बैसवे ॥६८॥ बहुतां जाली विषूचिका । गाडे निःशेष सोडले देखा । तुटी जाली रथांचे आंखां । घोडे देखा पांगुळले ॥६९॥ कृष्ण म्हणे अबला मूर्ख । उपहासिले विनायका । क्षोभल्या महामातृका । दुर्गा देखा कोपली ॥७०॥ कृष्णें स्तविला विनायक । दिधले साखरेचे मोदक । सुखिया जाला गणनायक । विघ्नें देखा निवारिलीं ॥७१॥ [illegible] कृष्णें पूजिली अंबिका । सन्मानूनि महामातृका । मंडपीं देखा स्थापिल्या ॥७२॥ वऱ्हाड पातले





गजरें । वाजती नाना परीचीं तुरें । नरनारी अलंकारें । केले साजिरे रथ गज ॥७३॥ श्रीकृष्णाची जे निजजननी । देवकी बैसली सुखासनीं । करवली सुभद्रा बहिणी । गजारोहिणीं मिरवती ॥७४॥ ज्येष्ठ बंधूची जे राणी । रेवती कृष्णाची वोहिणी । यादवांच्या वऱ्हाडिणी । अनर्घ्य लेणी लेइल्या ॥७५॥ उग्रेसन वसुदेवासमान । दोघां एकसारखाचि मान । वऱ्हाड दाटलें संपूर्ण । भेरी निशाणें गर्जती ॥७६॥ दोहीं मंडपीं झाली प्रतिष्ठा । होम दिधला हव्यवाटा । द्विज पूजिले बरविया निष्ठा । वस्त्रें ज्येष्ठा अर्पिलीं ॥७७॥ आइती केली शुद्धमती । भीमकें आणिली सेवती । नोवरा अभ्यंतरीं श्रीपती । यादवपंक्ती बैसल्या ॥७८॥ समाधिसुख तेंचि आसन । मुक्तमंडित चौक जाण । बैसावया श्रीकृष्ण । भीमकें विंदान मांडिलें ॥७९॥ चाऱ्ही पुरुषार्थांची चवाई । तेंचि आसन त्यावरी पाहीं । पूजावया निजजावई । भीमक ठायीं तिष्ठत ॥८०॥ म्हणती आचार्य सावधान । शब्द सांडून धरा मौन । वर वरिष्ठ श्रीकृष्ण । फल संपूर्ण त्या हातीं ॥८१॥ पाहातां श्रीकृष्णाचें रुपडें । अरूपरूपें कृष्ण चहूंकडे । विस्मयें भीमक झाले वेडे । मागें पुढें कृष्ण देखें ॥८२॥ अनंत रूपें यादवपती । कैसेनि मी पुजूं श्रीपती । पूज्यपूजकतावृत्ती । हेही स्थिती नाठवें ॥८३॥ केवळ प्रपंच तें वऱ्हाड । परी भीमकाचें भाग्य वाड । परत परमार्थाचें कोड । वऱ्हाड गोड त्या झालें ॥८४॥ उदक घाली शुद्धमती । चरण प्रक्षाळी नृपती । तीर्थें चरणतीर्थ मावती । कृष्णपदप्राप्ति दुर्लक्ष ॥८५॥ कृष्णकपाळा पावे कोण । तेथेंही सप्रेम चंदन । भीमकें अर्पिलें शुद्ध सुमन । कृष्णभजन निजभावें ॥८६॥ शुद्धसत्त्वाचें विरजांबर ।

चिद्रत्नांचे अलंकार। भीमकें अर्पूनियां अपार। कृष्ण वरावर पूजियेला ॥८७॥ भीमक गौरवी व्याहीयांसी। व्याहींरूपें देखे कृष्णासी। भूतमात्रीं हृषीकेशी। निजवृत्तीसी ठसावला ॥८८॥ वृद्धपरंपरा ऐसी आहे। वरचरण उटी वोहमाये। शुद्धमती येऊनि लवलाहें। वदन पाहे कृष्णाचें ॥८९॥ मुगुट कुंडलें कौस्तुभमाळा। झळकत पितांबर मेखळा। देखोनिया घनसावळा। दोहीं डोळा निवाली ॥९०॥ झणीं लागेल बाह्यदृष्टी। म्हणोनि घेतली इटीमिठी। निंबलोण उठाउठी। करी गोरटी निजभावे ॥९१॥ कृष्णचरणीं लावितां हळदी। अहंभावेसीं ठकली बुद्धी। लाज विसरली त्रिशुद्धी। मीतूंउपाधी नाठवे ॥९२॥ ज्याचे चरणींचे रज:कण। शिव विरिंची आपण। वंदिताती सांडूनि गुण। ते कृष्णचरण पावली ॥९३॥ अक्षवाणें करी आरती। कृष्णप्रभा दीपदीप्ती। कृष्णीं लागलिया परमप्रीति। चित्तवृत्ती तद्रूप ॥९४॥ चिच्छक्ती न सोडी चिन्मात्रा। तेवीं कृष्णाधाकुटी सुभद्रा। मणिमौक्तिकें रत्नहारां। दिव्यांबरें दीधलीं ॥९५॥ शुद्धमती म्हणे देवकीसी। धन्य धन्य म्हणे तुमची कुशी। जेथें जन्मला हृषीकेशी। म्हणोनिया पायांसी लागली ॥९६॥ मग पूजिली यथाविधीसीं। वस्त्रें भूषणें दिधलीं तिसी। जगन्निवास जन्मला कुशी। मान्य सकळांसी यालागी ॥९७॥ एवं भीमक आणि शुद्धमती। विनीत होऊनि सर्वांप्रती। वस्त्रें भूषणें अर्पिती। सोयरा श्रीपती जोडिला ॥९८॥ सावधान आचार्य म्हणती। झाली रुखवताची आइती। संतोषली शुद्धमती। भावें श्रीपती प्रार्थिला ॥९९॥ कृष्ण परमात्मा भव्यमूर्ती। आवरणपूजा यादवपंक्ती। लाविल्या स्वप्रकाशवाती। शुद्धमती सावध ॥१००॥ तळीं त्रिगुणाची आडणी। त्यावरी ताटाची मांडणी। वाढिताती नवजणी।





खुतखावणी जाणोनि ॥१॥ ऐका रुखवताची स्थिती। वाढीतसे शुद्धमती। जे जे घाले कृष्णपंक्ती। क्षुधा पुढती त्यां नलगे ॥२॥ झळकती खावार्थाचीं ताटें। जडित चतुर्विध चोखटें। स्वानंदरसें भरिली वाटे। वोतू काठें नेणती ॥३॥ खाणीवा खुडिवा तोडिवा। त्रिगुण गुणांच्या सोलिवा। शाका वढिती स्वानुभवा। हावभावा फोडणिया ॥४॥ एकें पचली गोडपणें। एकें सप्रेम सलवणें। एकें नुसतीं अलवणें। बरवेपणें मिरविती ॥५॥ एके सबाह्य आंबटें। एकें अर्धकाचीं तुरटें। एके बहुबीजें कडवटें। एकें तिखटें तोंडाळें ॥६॥ एकें हिरवीं करकरितें। एकें परिपक्वें निश्चितें। एकें जारसे कचकचितें। एकें स्नेहदेठिंहूनी सुटलीं ॥७॥ वाळल्या आनुतापकाचरिया। वैराग्यतळणें अरुवारिया॥ राजसा वाढिला कोशिंबिरिया॥ नाना कुसरी राइतीं ॥८॥ मुखीं घालितां अतितिखटीं॥ नाकीं तोंडी धूर उठी। कुसमुसुनी कपाळ पिटी। दुसरेनि गोष्टी न करवे ॥९॥ एकें वाळोनि कोरडीं। तोंडीं घालिता कुडकुडी। त्यांची अनारिसी गोडी। बहु परवडी स्वादाची ॥११०॥ वळवटाची नवलपरी। एकें पोपळें अभ्यंतरीं। एकें वर्तुळें साजिरीं। सुमनाकारीं पैं एक ॥११॥ परवडी दावी यादवराया। सूक्ष्म सेवेच्या शेवया। मोडों नेदी सगळिया। अतिसोज्वलिया सतारा ॥१२॥ शेवया वळिल्या अतिकुसरी। असार केवळ सांडिलें दूरी। घोळिल्या क्षीरसाखरीं। चवी जेवणारीं जाणिजे ॥१३॥ अत्यंत लाडें वळिले लाडु। विवेकतिळवियाचे जोडु। सुरस रसें रसाळ गोडू। चवीनिवाडु हरि जाणे ॥१४॥ पापड भाजिले वैराग्यआगीं। तेणें ते फुगले सर्वांगीं। म्हणोनिया ठेविले मागिले भागीं। नखें सवेगीं पीठ होती ॥१५॥ उकलतां नुकलती। आंतल्या आंत गुंडाळती।

तापल्या तेलें तळिजेती। कुडी आइती कुरवडिया ॥१६॥ भीमकी प्रिय व्हावी श्रीपती। सांडया न करीच शुद्धमती। जाणे वृद्धाचाररीती। परम प्रीति बोहरांची ॥१७॥ त्रिगुण त्रिकुटीं पचलीं पाहीं। भोकरें खारलीं ठायींच्या ठायीं। कृष्णरंगें रंगलीं पाहीं। आलें ठायीं ठेविलें ॥१८॥ पूर्ण परिपूर्ण पुरिया॥ सबाह्य गोड गुळवरिया। क्षीरसागरींच्या क्षीरधारिया। इडुरिया सुकुमारा ॥१९॥ सफेद फेणिया पदरोपदरीं। शुद्ध शर्करा भरली भरी। अमृतफळें ठेविली वरी। अभेद घारी वाढिल्या ॥१२०॥ नुसधी गोडियेची घडली। तैसी खांडवी वाढिली। गगनगर्भीची काढिली। घडी मांडिली मांडियाची ॥२१॥ स्नेहदेठींहुनि सुटलीं। अत्यंत परिपाकें उतटलीं। वनिताहातींहून निष्टलीं। फळें घातिलीं शिखरिणी ॥२२॥ अत्यंत सूक्ष्म आणियाळें। तांदुळा वेळिलें सोज्वळें। सोहंभावाचें ओगराळें। भावबळें भरियेलें ॥२३॥ खालीं न पडतां शीत। न माखतां वृत्तीचा हात। ओगराळां भरिला भात। न फुटत वाढिला ॥२४॥ अन्नावरिष्ठ वरान्न। विवेकें कोंडा काढिला कांडोन। अवघ्यावरी वाढिले जाण। वरी वरान्न स्वादिष्ट ॥२५॥ लेह्य पेय चोष्य खाद्य। भक्ष्यभोज्य जी प्रसिद्ध। षड-सांचे हे स्वाद। केले विविध उपचार ॥२६॥ जिव्हा चाटून जें घेइजे। लेह्य त्या नांव म्हणिजे। घटघटोनि प्राशन कीजे। पेय बोलिजे तयासी ॥२७॥ रस चोखून घेइजे। बाकस थुंकोनि सांडिजे। चोष्य त्या नाव बोलिजे। खूण जाणिजे रसाची ॥२८॥ अग्नि उदक लवणेंविण। जें खावया योग्य जाण। खाद्य म्हणती विचक्षण। केलें लक्षण सूपशास्त्रीं ॥२९॥ क्षीरभात या नांव अन्न। भोज्य यातें म्हणती जाण। रोटी पोळी आणी पक्वान्न। भक्ष्य जाण यां नांव ॥१३०॥ ऐसी षड-सांची





गोडी। ताटें वाढिलीं परवडीं। चाखों जाणती ते गोडी। निज आवडीचेनि मुखें ॥३१॥ कृष्णस्वादासी जाणतां जाण। अवघियां आणिलें गोडपण। यालागीं वाढिलें वरी लवण। अपूर्ण तें पूर्ण करावया ॥३२॥ नाहीं श्रद्धेची जया भूक। आंगीं अश्रद्धेचें असुख। गोड तेंचि म्हणति विख। थुंकोनि देख सांडिती ॥३३॥ कृष्णपंक्तीची आवडी। श्रद्धाक्षुधा जया गाढी। ग्रासोग्रासी अधिक गोडी। हे परवडी त्यालागी ॥३४॥ कृष्णपंक्तीं नाहीं उणें। जेवितां जेविते जाणती खुणे। रुचलेपणें वाढिती जाणें। सावध म्हणे शुद्धमती ॥३५॥ कृष्ण देखोनियां डोळा। जीवा जीवन देती चपळा। चतुर्विध सुपरिमळा। येळा वाळा उदादि ॥३६॥ चतुर्विधा चारी मुक्ति। शुद्धमती पुढें राबती। जें जें पाहिजे जिये पंक्ती। तें तें देती ठायी ॥३७॥ पहिलें वाढिलें तवजणीं। पूर्ण करिती चौघीजणीं। एका जनार्दन भोजनीं। अतृप्त कोणी राहो नेदी ॥१३८॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंश-संहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे रूखवतवर्णननामचतुर्दशः प्रसंगः ॥१४॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥

## ॥ प्रसंग पंधरावा ॥

श्रीगणेशाय नमः ॥ शुद्धमतीने सगळे । न फोडितां रांधिले कोहळे । चवी आले सोहंमेळें । स्वाद गोपाळें जाणिजे ॥१॥ धालेपणाचे ढेंकर । स्वानंदे देती जेवणार । गोडी नीत नवी अपार । कृष्णदातार जे पंक्ती ॥२॥ स्वाद घेतला जेवणारें । जेवितां कोणी न म्हणे पुरे । गोडी घेतली शार्ङ्गधरें । भाग्यें उदार शुद्धमती ॥३॥ सावध शुद्धमती वाढी । यादवां तृप्ति झाली गाढी । ब्राह्मणांची शेंडी तडतडी । धोत्रें बुडीं ढिलविती ॥४॥ भीमक करताहे विनंती । अवघ्यां झाली परम तृप्ती । उष्टावणलागी श्रीपती । ठायीं ठेविती निजमुद्रा ॥५॥ देखोनि आनंदली शुद्धमती । भीमकीभाग्य वानूं किती । कृष्णमुद्रा चढली हातीं । शेषप्राप्ती निजभावें ॥६॥ कृष्णपंक्ती जे जेविले । ते सवेंचि संसारा आंचवले । कृष्णरंगें सुरंग जाले । विडे घेतले सकळिकीं ॥७॥ कृष्ण देखोनियां डोळां । भीमकीच्या सख्या सकळा । विस्मित राहिल्या वेल्हाळा । आणिक डोळां नावडे ॥८॥ कृष्णउच्छिट घेऊनि हातीं । वेगें निघे शुद्धमती । संतोषोनिया श्रीपती । प्रसाद देती निजमाळा ॥९॥ कृष्णप्रसाद सुमनमाळा । शुद्धमती घाली गळां । लाज विसरोनि वेल्हाळा । चरणकमळा लागली ॥१०॥ कृष्णास रुखवत शेवती । देतां न कळे दिवसराती । ज्योतिषी रायातें म्हणती । उदयप्राप्ति हो आली ॥११॥ वेगी मंडपासी चला । घडवटें आधीं घाला । उशिर न लावा जी फळा । यादवां सकळां सांगिजे ॥१२॥ नमस्कारूनियां श्रीपती । मंडपा आली शुद्धमती । उष्टावण भीमकी हातीं । परम प्रीती दीधलें ॥१३॥ कृष्णप्रसाद





धरिला माथां । भीमकी झाली रोमांचितां । चित्त विसरलें सावधानता । कृष्णशेषें ॥१४॥ जंव जंव कृष्णशेष सेवी । तंव तंव समाधिसुखा वांकुल्या दावी । बाप भाग्याची पदवी । स्वर्गीं देवीं वानिजे ॥१५॥ कृष्णमुद्रा हृदयीं धरी । अभिवंदूनियां शिरीं । मग घातली कराग्रीं । लोण उतरी शुद्धमती ॥१६॥ चढोनि परेचियें उपरी । सद्गुरु सावधान करी । घटिका प्रतिष्ठिली अंतरीं । जीवनावरी सखेच्या ॥१७॥ घडी जेंगटातें हाणत । जेंगट तेणें नादे गर्जत । काळ गेला रे गेला म्हणत । वेळ व्यर्थ जाऊं नेदी ॥१८॥ अक्षर निमिष पळेंपळ । घटिका भरतां न लगे वेळ । लोक व्यापारें बरळ । गेला काळ नेणती ॥१९॥ सद्गुरु सांगे भरली घडी । उगेंचि पाहाती वऱ्हाडी । ज्यासी निजकार्याची तातडी । ते घडिया घडी साधिती ॥२०॥ आळसी लोक निद्रापार । निजमंडपी कृष्ण सादर । विस्तारवी फलसंभार । नानाप्रकार मेचूचे ॥२१॥ शून्य सांडूनि विरजांबर । चिद्रत्नाचे अलंकार । पदकी नीळ मनोहर । जो शृंगार हृदयीचा ॥२२॥ अहंकाराचें बीज भरडी । मोहममतेचा कोंडा काढी । सोलींव डाळीचीं परवडी । भरली दुरडी श्रद्धेची ॥२३॥ विवेकचाळणियां चाळिली । कणीक आणिली तेजाळी । निवडूनि स्वानंदाची नव्हाळी । ठेविली गुळी निजगोडी ॥२४॥ देठीहूनि सुटलीं फळें । अत्यंत परिपाकें निर्मळें । मधमधीत सुपरिमळें । सफळ फळें रुक्मिणी ॥२५॥ अत्यंत पढिये भीमकबाळा । गुणेंवीण सुमनमाळा । अंगें गुंफी घनसांवळा । हार गळां आणि जाळी ॥२६॥ सौभाग्यद्रव्यें ठेविली आधीं । धनीपणें धणे हळदी । जिरें मेळविलें त्यामधीं । जेवीं सद्बुद्धि-विवेक ॥२७॥ गांठी सांडिल्या सोडोनि । घेतला सूक्ष्म तंतू काढोनी । श्रीकृष्ण वोवी कृष्णमणी । ते

रुक्मिणी गळसरी ॥२८॥ सांडोनि कठिणत्वाचें बंड । केवळ रसाचे प्रचंड । कृष्णें कृष्णवर्ण इक्षुदंड । अति उदंड आणिले ॥२९॥ बीजेंवीण वाढलीं फळें । एक त्वचेवीण रसाळें । चमत्काराचीं निर्मळें । कृष्ण फळें विस्तारी ॥३०॥ फळ विस्तारले प्रबळ । यादव शृंगारले सकळ । भेरी त्राहाटिल्या मांदळ । निशाणें ढोल लागले ॥३१॥ अनर्घ्य लुगडीं आणि लेणीं । लेऊनि निघाल्या वऱ्हाडिणी । चारी बारा सोळाजणी । चौघीजणी तयांपुढें ॥३२॥ जीवशिवां वडिल मान । तैसे वसुदेव उग्रसेन । संतोषोनि संकर्षण । करी परिपूर्ण याचकां ॥३३॥ एका दिधलें कांहीं एक । एका दिधलें अनंत सुख । चिद्रत्नें अलोलिक । देऊनि याचक सुखी केले ॥३४॥ फळ चालिलें गजरें । ढळती रत्नदंड चवरें । झळकती पालवछत्रें । दशविध तुरें वाजती ॥३५॥ जैसी श्रद्धा आणि शांती । तैसी सभुद्रा आणि रेवती । मुख्यपणें माजी मिरवती । घेतल्या बुंथी पाचूच्या ॥३६॥ नानापरींच्या घेतल्या बुंथी । तरी अंतरशोभा बाह्य फांकती । अलंकारल्या निजवृत्ती । त्या न झांकती झाकिल्या ॥३७॥ फळ समीप आलें देखा । ऐसें जाणवलें भीमका । तो सावधान अतीनेटका । भावें बैसका घातली ॥३८॥ साउमा येऊनि आपण । वसुदेवादि उग्रसेन । नमस्कारूनि संकर्षण । भीतरीं जाण आणिलें ॥३९॥ विचित्र घातलीं आसनें । सुकुमार मृदुपणें । गाद्या पडगाद्या टेंकणें । वोठंगणें मृदोळिया ॥४०॥ भीतरें आलिया वऱ्हाडिणी । शोभती जैशा दिव्य योगिनी । फळ मांडिलें विस्तारोनी । भावे रुक्मिणी हरिखेली ॥४१॥ पीठ स्थापिलें कुसरीं । शृंगारोनियां नोवरी । वेगें आणिली बाहेरी । मंत्रोच्चारीं द्विजवरीं ॥४२॥ पाहतां भीमकीचें रुपडें । अरूपरूपें तेज गाढें । मंडपामाजी उजियेड पडे । आणिकेकडे पाहों नेदी ॥४३॥





नामरूपाचेनि प्रकाशें । अवघी भीमकीच भासे । देखोनि जीव भुलले कैसे । डोळियां पिसें लाविलें ॥४४॥ उभवूनि स्वरूपठसा । भुलविलें आदिपुरुषा । एकाएकीं धांविन्नला कैसा । कृष्ण पिसा इणें केला ॥४५॥ कृष्ण शहाणपणें अतिगाढा । तोही भीमकिया केला वेडा । वोढूनि नेला आपुलेकडा । दुजें पडिपाडा इसी नाहीं ॥४६॥ भीमकी लावण्याची राशी । कृष्णरूपा भाळली कैसी । सांडूनि जातिकुळासी । कृष्णरूपासी निवटली ॥४७॥ भीमकी कृष्णायोग्य सहजें । कृष्णवर इसींच साजे । यासारिखें न देखों दुजें । बोलों लाजिजें बोलतां ॥४८॥ पाहतां भीमकीची रूपरेखा । टक पडिलें सकळिकां । कृष्ण पारखी गे निका । जोडा नेटका मेळविला ॥४९॥ गोरेपणें अतिसुंदर । विशाळ नयन भाळ थोर । अंगें सर्वांग सुकुमार । मनोहर उभारा ॥५०॥ कृष्ण साधावया निधान । नेत्रीं सूदलें अंजन । पाहतां भीमकीचें वदन । विकल्प मन करूं नेणे ॥५१॥ भुंवया सुरेख सरळ नासिक । गंडस्थळीं तेज अधिक । नाकींचें मोतीं जडितमाणिक । तेणें श्रीमुख शोभतसे ॥५२॥ सरळ बाहू सुपोष । कोंपर मनगटें कळास । पांचां आंगोळियां विन्यास । कळान्यास मुद्रिका ॥५३॥ सुरंग तळवे आणि तळहात । अधरबिंब अति आरक्त । बोलीं मधुरता तळपत । तेणें झळकत दंतपंक्ती ॥५४॥ कटिप्रदेशें शोभत जघन । माज अतिशयेंसीं सान । घोंटी कळाविया सुलक्षण । बरवेपण पाउलां ॥५५॥ माथां मोतिलग जाळी । इळके फरातळीं हांसळी । मिरवे भांग टिळा कपाळीं । तेज झळाळी तानवडां ॥५६॥ नेसली क्षीरोदक पाटोळा । त्यावरी रत्नांची मेखळा । सुनीळ कांचोळी वेल्हाळा । लेइली माळा मोतिलग ॥५७॥ गंगातीरीं चक्रवाकें । तेवीं कुचद्वय सुरेखें । हृदयीं घननीळ

झळके। शोभा पदकें दाविजे ।।५८।। नाकींचें झळकत सुपाणी। तेणें शोभली रुक्मिणी। शोभा आली बाहुभूषणीं। रत्नकंकणी कळाविया ।।५९।। चरणीं गर्जती नूपुरा। भुलोनि मदन आला उदरा। तेही भुलली शार्ङ्गधरा। कृष्णवरा वरावया ।।६०।। नाहीं लग्नासी व्यवधान। वेगीं करा फळार्पण। उठोनि वसुदेव आपण। करी पूजन भीमकीचें ।।६१।। पहिलें करावें गणेशपूजन। तंव गणेश वंदी कृष्णचरण। कृष्णचरणीं समाधान। गजवदन तुष्टला ।।६२।। कृष्णपुरोहित निष्काम। न करिती कलशपूजेचें काम। नवरीचे उपाध्ये सकाम। पुरुषार्थ परम त्यां दिधला ।।६३।। वस्त्रें अर्पूनि सुंदरी। वेगीं नेली अभ्यंतरीं। मायावसन त्याग करी। अंगीकारी श्रीकृष्णवास ।।६४।। फेडूनि मायेचीं परिधानें। लेइली कृष्णमय लेणें। भीमकी अत्यंत शोभली तेणें। निंबलोण जिवेंभावें ।।६५।। सवेंचि आणिली बाहेरी। डोळां न पाहवे सुंदरी। दृष्टी जातसे चाचरी। आधार धरी धैर्याचा ।।६६।। कृष्णीं विनटली वाडेंकोडें। ती कवणाचे दृष्टी न पडे। भाग्य वसुदेवाचें गाढें। तयापुढें बैसविली ।।६७।। कृष्णें पाठविलें फळ। नि:शेष अर्पिले सकळ। मस्तकीं घरी भीमकबाळ। जन्म सफळ येणें फळें ।।६८।। फळें वाढिले प्रबळ। झाले वऱ्हाडी सफळ। हातां आलें कृष्णफळ। खूण प्रेमळ जाणती ।।६९।। भीमकीसी म्हणे पुरोहित। वरासी मूळ निघा त्वरित। यादव परतले समस्त। गुण वर्णीत भीमकीचे ।।७०।। वऱ्हाडिणी सांगती गोष्टी। सगुणगुणाची गोमटी। भीमकीऐसी नाहीं सृष्टीं। कृष्ण जगजेठी पारखी ।।७१।। यासी माया म्हणे वेडा। परी हा देखणा चोखडा। कैसा मिळविला जोडा। निजपडिपाडा समत्वें ।।७२।। आदिकुमारी घेऊनि जाण। कृष्णासी तेल लावी





आपण। बांधोनि दृश्याचें कंकण। जीवें जीव म्हणतसे ।।७३।। तिची करावया बोळवण। कृष्णाआंगी आंगवण। येरा न कळे महिमान। जुनाट जाण वृत्ती तिची ।।७४।। लग्न साधावया चक्रपाणी। भीमक हांकी वऱ्हाडिणी। शुद्धमतीसहित सुवासिनी। चालती निशाणी गर्जत ।।७५।। नाना वाजंत्रीचिया ध्वनी ध्वनी। नाद न समाये गगनी। मधुर शब्दांचिया किंकिणी। गोडपणें गर्जती ।।७६।। घेऊनि पूजेचे संभार। ठाकिले विवाहमंडपद्वार। भीमकें केला अति आदर। वेगें वर आणावा ।।७७।। सहजेंचि नेटुगा दाटुगा। फेडावेडी नाहीं श्रीरंगा। सभे बैसविला समचौरंगा। नयनभृंगा आल्हादू ।।७८।। दृष्टी जडली कृष्णरूपासी। परतोनि न ये दृश्यापाशीं। पारणें होतसे डोळ्यांसी। कृष्णसुखासीं भोगिती ।।७९।। कृष्ण देखोनि धाले नेत्र। देताति तृप्तीचे ढेंकर। तरी भुकेले अपार। वारंवार हरि पाहती ।।८०।। शुद्धमतीनें आपण। कृष्णासी आणिलें तेलवण। सुखसेवयांचे लाडू जाण। तें गोडपण हरि जाणे ।।८१।। सोलींव विवेकांचे तिळवें। स्थूल ना सूक्ष्म अति बरवें। बांधा बांधिले अतिस्वभावें। निजभावें विस्तारी ।।८२।। फोडोनि चार्वाकचारें। निजबीज काढिलें बाहिरें। चारोळियांचे लाडू साजिरे। श्रद्धासाखरे आळिले ।।८३।। आणोनि सडियेली खसखस। धुवोनि सांडिली घसघस। लाडू वळिले सावकाश। अतिसुरस श्रीरंगा ।।८४।। अष्टदळ कमळाचें बीज। फोडूनि सोलोनि काढिलें निज। लाडू वळिले सहज। दाखवी वोज शुद्धमती ।।८५।। वरिवरि वैराग्याचे कांटे। भीतरी अमृताचे सांटे। फणस फोडूनि चोखटे। काढी गोमटें निजबीज ।।८६।। त्याची अवीटतेची गोडी। लाडू वळिले आवडी। शुद्धमती दावी परवडी। प्रीती

गाढी हरिचरणीं ॥८७॥ वरिवरीं दिसती साजिरे। आंत पाहतां आंबट बोरें। त्यांच्या आठोळिया फोडूनि निधरि। काढिलें साजिरें निजबीज ॥८८॥ घालूनि समतेचा गूळ गोडू। त्या बीजाचे वळले लाडू। कृष्ण करूं जाणे निवाडू। पडिपाडू स्वादाचा ॥८९॥ कृष्णालागीं तेलवणें। आणिलीं कडकडीत कडकणें। फुटलें तुटलें द्वंद्वपणें। रजोगुजें तळियेलें ॥९०॥ वांकुढे कानवले तेलवणें। कृष्णासी आणिलें कवणें गुणें। मुरडी मुरडिले अनुसंधानें। गोडपणें अंतरीं ॥९१॥ शुद्धमतीनें आपण। कृष्णासी वाहिलें तेलवण। वस्त्रें अलंकार संपूर्ण। परिपूर्ण स्वानंदे ॥९२॥ तेलवणाचा विस्तार। किती वाढवावा उपचार। होईल लग्नासी उशीर। वर सत्वर चालों द्या ॥९३॥ शुद्धसत्त्वाचा श्वेत वारू। त्यावरी चढिन्नला कृष्णवरू। झाला वाद्यांचा गजरू। मंत्रोच्चारू द्विजांचा ॥९४॥ आठही भाव होऊनि गाढे। वारू धरिला दोहींकडे। छंदें चालती कृष्णापुढें। आणिकेकडे न चालती ॥९५॥ निजबोधाचें आतपत्र। शिरीं तन्मयाचें छत्र। पहावया कृष्णवक्त्र। येती सत्वर नरनारी ॥९६॥ मदें गर्जती अतिगंभीर। अनुभव स्वानंदाचे थोर। दोहीं बाहीं जी कुंजर। सालंकार पताकी ॥९७॥ चंद्रकिरण अतिसाजिरे। तैशीं अतिशुभ्र चामरें। रत्नदंडीं सहजाकारें। मनोहरें ढळताती ॥९८॥ कृष्णें सोडिल्या त्याग देउनी। अष्टमहासिद्धी नाचणी। नाचताती चपळपणीं। देखोनि जनीं भुलीजे ॥९९॥ सिद्धी नाचतां देखती जेथें। जन मीनले त्याभोंवते। पाहोनि विसरले कृष्णातें। नाचणीतें भुलले ॥१००॥ चैतन्यबुका घाली वनमाळी। ज्यासी लागे तोचि परिमळी। देत खुणेच्या अंजली। पसेदान याचकां ॥१॥ कृष्णरंगें सुरंग विडे। वांटिताती वाडेंकोडें। जो राहिला मागिलेकडें। त्यासी





न चढे तो रंग ॥२॥ ऋग्वेदादि सामगायन। गर्जती वेद बंदीजन। त्या शब्दाची निजखूण। सत्य श्रीकृष्ण जाणता ॥३॥ सत्त्वें सात्त्वीक जगजेठी। घेऊनि विवेकाची वेताटी। दृश्य गलबला मागें लोटी। कृष्ण दृष्टी पहावया ॥४॥ कृष्णासी आवडती अतिप्रीती। ते वैष्णव रंगीं नाचती। सांडूनि अहंसोहंवृत्ती। नृत्य करिती निजबोधें ॥५॥ कृष्णासवें सुवासिनी। शांति क्षमा दया उन्मनी। आल्या सुखासनीं बैसोनि। वरासनीं सुभद्रा ॥६॥ निर्धारूनियां तत्त्वतां। निजबोधाच्या अक्षता। घालिती कृष्णाचिया माथां। लक्ष सर्वथा न चुकती ॥७॥ उग्रसेन वसुदेव। वहनीं चढले यादव। अवघ्यांपुढें बळिदेव। महोत्साव करीतसे ॥८॥ सोयरे कृष्णाचे निजभावी। भक्त योगी ज्ञानी अनुभवी। तयांसी वाहनें बरवीं। कृष्णदेवें दिधलीं ॥९॥ एका सलोकतेचा वारू। एकासी समीपताराहंवरू। एकासी स्वरूपताकुंजरू। महा थोर भद्रजाती ॥११०॥ एका दिधलें अमोल। सायुज्यता चवरडोल। त्याचा अनुभव सखोल। निजात्मबोल हरी जाणे ॥११॥ तयासी सर्वथा श्रीहरी। आपणावेगळें क्षणभरी। कोठें जाऊं नेदी दूरी। सरोभरी निजभावें ॥१२॥ वऱ्हाड राखावया निगुती। गुणावतार गुणमूर्ती। करणें मारणें धरणें स्थिती। तिघां हाती भरभारू ॥१३॥ तयां तिघांमागिलेकडां। कृष्ण पुरुष अतिगाढा। दोहीं पक्षी देखणा फुडा। भार वऱ्हाडा त्या माथां ॥१४॥ वऱ्हाडाची घडामोडी। कृष्णाआंगीं नलगे वोढी। अवघे पर बाहिरे दवडी। ऐसी परवडी रचियेली ॥१५॥ विचारितां भरूनि निजनिवाडीं। कृष्णावीण अर्थवडी। इकडील तिकडे नव्हे काडी। वृथा वेडीं बलगती ॥१६॥ भरूनि रजतमाचें औषध। करूनि अग्नियंत्र सन्नद्ध। कृष्णापुढें अतिविनोद। एक प्रबुद्ध दाविती ॥१७॥

अग्नि लावूनि ठायीं ठायीं। ममता जाळिती हवायी। गगना उसळली पाहीं। धुपोनि ठायीं निमाली ॥१८॥ मोहयंत्रीं सुमनमाळा। अग्निपुष्पे भासती डोळां। फुलें म्हणती अबला। पाहतां डोळां ते राख ॥१९॥ अतिलोभाच्या चिचुंदरी। अग्नि लावूनि टाकिती दूरी। पेटल्या पडती जनांवरी। उरीं शिरीं जाळिती ॥१२०॥ देऊनि उपशम-अनळा। जाळिती क्रोधाचा भुईनळा। भडभडां निघती ज्वाळा। तोही निमाला तात्काळ ॥२१॥ हातीं धरूनि कृष्णलीला। जाळिती कामाचा हातनळा। धरूं नेणती त्या अबळा। जीवीं जिव्हाळा पोळत ॥२२॥ पाहतां अत्यंत कठीण। चिन्मात्र अग्नि देऊनि जाण। सांडिती अहंकाराचे बाण। पळे जीवपण दचकोनी ॥२३॥ मदमत्सरधूम्रमेळें। एकाचें झांकले जी डोळे। देहबुद्धीचीं भेडें सकळें। विषयबळें पळालीं ॥२४॥ स्वानुभवाचे महाथोर। उठावले जी कुंजर। रगडूनि अहंकाराचा दूर। निरंतर डुल्लती ॥२५॥ सर्वेचि निजतेजचद्रंज्योति। उजळली जी अवचित्तीं। प्रकटली परम दीप्ती। तेही स्थिती परियेसा ॥२६॥ निःशेष अंधार नाहीं जेथ। उष्णचांदणीयाहूनि अतीत। तेज प्रकटलें अद्‌भुत। संतोषत श्रीकृष्ण ॥२७॥ पदोपदीं नाना त्याग। करीत चाले श्रीरंग। वोंवळण्या जी अनेग। दोहीं भागीं पडताती ॥२८॥ कौतुक दावावया श्रीपती। कपटमहामोहाचा हस्ती। आणूनि पुढा उभा करिती। भद्राजाती मातला ॥२९॥ नेणती त्याची लटकी कळा। देखोनि भय उपजे सकळां। कोण पुरे त्याच्या बळा। चळचळां कापती ॥१३०॥ महामदें झाला मस्त। अहंकारें अतिगर्जत। अव्हासव्हा जी धांवत। लोकांआंत निजबळे ॥३१॥ भेडांपाठीं अधिक लागे। तंव ते [illegible]





नेदी तों ॥३२॥ भेडें लटकींच रगडी। तेणें चरफडती बापुडीं। एकीं त्या भेणें झोंपडी। जीवेंभावें धरियेली ॥३३॥ ऐसा जनांसी लाविला धाक। तंव कृष्णें खुणाविला सेवक। लाता हाणोनिया देख। कपटवेष मोडिला ॥३४॥ धारणाधायें कपट झोडी। भवगज हे गोष्टी कुडी। ऐसी देखणी दृष्टी ज्या चोखडी। भवभयवोढी त्या नाहीं ॥३५॥ चतुर्विधा प्रसिद्ध दासी। शकुनालागीं हृपीकेशी। उभ्या परिपूर्णकलशेंसीं। महाद्वारासी तिष्ठत ॥३६॥ कृष्णभांडार तें अनंत। अखंड श्रीकृष्णासवें चालत। पाहोनियां शुद्ध भावार्थ। उचित पदार्थ हरि देत ॥३७॥ श्रद्धा कीर्ती धृति विरक्ती। त्याही दासी अति तिष्ठती। श्रीकृष्णवासातें वांछिती। जाणे श्रीपती मनोगत ॥३८॥ जें जें कांहीं त्या मागत। तें तें कृष्णनाथ देत। त्याहूनि अधिक दे समर्थ। महाद्वारांत प्रवेशला ॥३९॥ अंतरीं प्रवेशला कृष्णवरू। सकळां स्वानंद झाला थोरू। अवघे करिती जयजयकारू। बैसकारू झाले तदा ॥१४०॥ सिद्धसामग्री मधुपर्कासी। विष्टर दिधला हृषीकेशी। साम्यतेचिया चौरंगासी। श्रीकृष्णासी बैसविलें ॥४१॥ सांडूनि फळाशा समस्त। अर्घ्य अर्पिलें सफळित। सुर नर कौतुक पाहात। सिद्ध समस्त तेथें आले ॥४२॥ पाद्यालागीं आणिलें तीर्थ। त्रिगुणत्रिवेणी अतीत। चैतन्यप्रवाहें शोभत। यथोचित मनकर्णिका ॥४३॥ उदक घाली शुद्धमती। चरण प्रक्षाळी नृपती। जेथोनि तीर्थांचि उत्पत्ती। ते पूजिती श्रीचरण ॥४४॥ चरणप्रक्षाळणा ठेविलें अंबू। तंव पातला तीर्थकदंबू। आम्हांसी लाभों द्या एक थेंबू। चरणांबू श्रीहरीचा ॥४५॥ मूळमाधवीं जाऊनि पाहें। कदंबतीर्थ अद्यापि आहे। भाग्यवंत तो तेथें नोहे। कृष्णपाये तें तीर्थ ॥४६॥ शुद्धमतीनें आपण। कृष्णासी दिधलें आचमन।

तीन वेळां न करी जाण । सर्वापोशन एक वेळां ।।४७।। ब्रह्मपदींचा अधिष्ठाता । त्यासी देती ब्रह्मसूत्रा । मान दे तो वेदविचारा । श्रुतिव्यवहारा संरक्षी ।।४८।। चंदन पुष्पें टिळे माळा । भावें पूजिला घनसांवळा । आनंद भीमकभूपाळा । परब्रह्म डोळां देखत ।।४९।। हस्तमात्रा कर्णमात्रा । कृष्णासी वोपिल्या विचित्रा । बाहुभूषणें जडित मुद्रा । पीतांबरा अर्पिलें ।।१५०।। दधि मधु एकत्रता । करीं घातलें अच्युता । मेहुणे म्हणती कृष्णनाथा । लाज सर्वथा न धरावी ।।५१।। गोकुळीं चोरूनि दधि खातां । तुम्हांसी लाज नाहीं सर्वथा । आम्हीं निजभावें अर्पितां । कां लाजतां निजचोरा ।।५२।। सलज्ज हांसे शुद्धमती । वऱ्हाडी वऱ्हाडिणी हांसती । निष्कर्मासी कर्मप्राप्ती । जन वदती विपरीत ।।५३।। भीमक म्हणे 'प्रतिगृह्यता' । प्रतिगृण्हामि म्हणा अच्युता । टक पडिलें कृष्णनाथा । मग तत्त्वतां विचारी ।।५४।। खूण बोलिला कृष्णस्वामी । 'दान देतों एक आम्हीं' । हाही भाव सांडूनि तुम्ही । मग प्रतिगृण्हामि सर्वचि ।।५५।। संकल्प सोडितां तत्काळ । दधि मधु सेवी गोपाळ । भीमकाचें जन्म सकळ । सफळ कुळ उद्धरलें ।।५६।। देऊनि कृष्णासी आचमन । सर्वेचि केलें करक्षालन । गुरु म्हणती सावधान । नाहीं व्यवधान लग्नासीं ।।५७।। कृष्णचरण शून्य न पडे । घातले परिपूर्ण पायघडे । श्रीकृष्ण चालविला पुढें । वाडेकोडें लग्नासी ।।५८।। भीमकी भावार्थें आइती । पर्णावया निजपती । गौरीहरा सहज स्थिती । उपचारप्रीतीं पूजितसे ।।५९।। कृष्णासी अंत्रपाट पुढें । बोलतां बोलणें हें कुडें । श्रोते म्हणती न सुचीं झाडे । लग्न निवाडें लागों द्या ।।१६०।। आधींच कृष्णकथा सखोल । त्याहीवरी तुझे रसाळ बोल । जाणसी प्रेमाची बोल । येताती डोल



सुखाचे ।।६१।। ऐकोनि श्रोतयांचे वचन । आनंदला एक जनार्दन । मनें करूनि लोटांगण । वंदिले चरण निजभावें ।।६२।। इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणी स्वयंवरे लग्नअतिकालसमयोनाम पंचदशः प्रसंग ।।१५।।

।। श्री गोपालकृष्णार्पणमस्तु ।।

विटंबील श्रीपती। याची ख्याती तिहीं लोकीं ॥२८॥ त्यांचा जाणोनियां भावो। कृष्णें फेडिला संदेहो। मेहुणे गौरविले पहा हो। दिव्यांबरीं भूषणीं ॥२९॥ भीमक कृष्णासी विनंती करी। चतुर्थहोम आमुचे घरीं। करावा जी कृपेंकरीं। सहपरिवारीं सुदृदेशीं ॥३०॥ पाहावया सुनमुखासी। मूळ पाठवा वरमायेसी। भंवरिया कळस आहे तिजपाशीं। निघे वेगेंसी शुद्धमती ॥३१॥ कृष्ण वसे हृदयासी। धन्य धन्य तिची कुशी। शुद्धमती लागे पायांसी। देवकीसी प्रार्थिलें ॥३२॥ देवकी बैसविली सुखासनीं। लागल्या वाजंत्र्याच्या ध्वनी। विंजणें वारिती दोघीजणी। पायरावणी पदोपदी ॥३३॥ शुद्धमती देतसे विडिया। पीक धरावया सुवर्णघडिया। श्रीगिरीवरी बोलती गुडिया। पायघडिया पदोपदीं ॥३४॥ चांदवें मोतिलग विस्तारें। दोहीं बाहीं ढळतीं चवरें। देवकी समारंभें थोरें। आणिली गजरें मांडवा ॥३५॥ कृष्णरुक्मिणी अतिगोमेटीं। साजिरीं वोहरें देखिलीं दृष्टीं। ऐसा जोडा नाहीं सृष्टीं। माझी दृष्टीं झणीं लागे ॥३६॥ देवकी घेऊनि आपण। दोघां उतरीं निंबलोण। कृष्णनिंबलोणा हुताशन। मुख पसरोन धांविन्नला ॥३७॥ कृष्णनिंबलोण पडतां मुखीं। तेणें मुख सरतें तिहीं लोकीं। हे जाणोनियां याज्ञिकीं। अतिसाक्षेपीं सादर ॥३८॥ कृष्णनिंबलोण अतिसाक्षेप। करितां हरलें त्रिविधताप। जाऊनि देहसंताप। सुखरूप तो जाला ॥३९॥ सून बैसवूनि मांडिवरी। कृष्णश्रवण जडित भोवरीं। कानीं घातली निर्धारी। कळस त्यावरी धैर्याचा ॥४०॥ मुक्तमोतिलग गंभीर। श्रवणी बाणल्या साचार। तेणें शोभलीं सुंदर। मनोहर सकळिकां ॥४१॥ लग्न लागलिया येरे दिवशी। सोहळा मांडिला वोहरांसी। मूळ पाठविले हळदीसी। यादवांसी भीमकें ॥४२॥ मूळ पाठविलें





सकळां। दोहीं बाहीं बारा सोंळा। करवली सुभद्रा वेल्हाळा। चाले सुढाळा उन्मनी ॥४३॥ अत्यंत शाहाण्या सुवासिनी। आणीक आल्या नवजणी। कृष्णाची खुतखावणी। त्या जाणोनी वर्तती ॥४४॥ वडिलपणें अतिश्रेष्ठ। सकळांमाजी वरिष्ठ। शांति चालिली चोखट। अतिलोभिष्ट श्रीकृष्णा ॥४५॥ सभा बैसली निजबोधें। ढवळे गाती स्वानंदें। हळदी आरंभिली विनोदे। झालीं सावधें अधिकारें ॥४६॥ पाहों जाणती कृष्णकौतुक। तेही सावध झाले लोक। अनधिकारिया लगबग देख। पाहाती मुख वनितांचें ॥४७॥ वोहरें पाहातां निवे मन। दोन्हीं पक्षी सावधान। कोणा न बोलवे वचन। पडिलें मौन सकळिकां ॥४८॥ चौघीजणी अतिचपळा। कुजबुजती वेळोवेळां। कैशा झाल्याती तोंडाळा। शब्दचाळा न सोडा ॥४९॥ शांति म्हणे परत्या सरा। सांगेन तें तुम्ही करा। कुरवंडी श्रीकृष्णवरा। लोण उतरा सर्वस्वें ॥५०॥ स्नेहें उजळूनियां वाती। भीमकीसन्मुख दाविती। येरी नातळे जी हातीं। स्नेहवृत्ती नावडे ॥५१॥ कुरवंडी न धरितां हातीं। माय धाय शंकल्या चित्तीं। मग बोलली निजशांती। नव्हे श्रीपती हें योग्य ॥५२। जया दीपाचिये मेळीं। न निघे स्नेहधूम्र काजळी। तैसा दीप उजळी। मग वोवाळी श्रीकृष्णा ॥५३॥ ऐकोनि भीमकी झाली सुखी। खूण बाणली नेटकी। जीवीं जीवाची वोळखी। परम पारखी तो जाणे ॥५४॥ निर्धूम अग्नीच्या निजमेळीं। कृष्णदीपें दीप उजळी। आकाश लोपलें प्रभेतळीं। भावें वोवाळी श्रीकृष्ण ॥५५॥ न कळे भीमकीचें लाघव। सकळही म्हणती धन्य भाव। आतां घेऊनिया नांव। पाय मागें कृष्णाचे ॥५६॥ ऐकोनि जनांचियां गोष्टी। भीमकी दचकली पोटीं। काय आतां बोलों वोठीं। न दिसे दृष्टि नामरूप ॥५७॥

याच्या नामरूपभेदा। व्यक्ति नाणवेचि वेदा। पुढारी वाटले नच शब्दा। नेति अनुवादा परतल्या ॥५८॥ पाहातां रूपाचा दुकाळ। घालितां साकारतेचा आळ। लाविती नामाचा विटाळ। तेणें गोपाळ शोभेल ॥५९॥ सवेचि म्हणे कळलें चित्ता। गोइंद्रियांचा हा नियंता। यासी गोपाळा म्हणतां। दोष सर्वथा मज नाहीं ॥६०॥ ऐसें विचारूनि वेल्हाळा। लक्ष लाविजे चरणकमळा। वेगीं पाय द्या गोपाळा। भीमकबाळा बोलिली ॥६१॥ तंव पिटिली टाळिया टाळी। ऐकोनि हांसिजे सकळीं। भीमकीये भली केली रांगोळी। खुण वनमाळी जाणत ॥६२॥ ऐकोनि भीमकीच्या बोला। कृष्णदेवो मानवला। वर्तत खुणा आपुल्या। देत पाउला स्वानंदें ॥६३॥ अबला सांगती वडिलां। येणें अभिमान सांडिला। कृष्ण बाइलेआधीन झाला। तिच्या बोलामाजी वर्ते ॥६४॥ कृष्ण देखोनि बहु काळा। हळदी लावी वेळोवेळां। उटूनिया घनसांवळा। अति सोज्वळा करूं पाहे ॥६५॥ जें जें कृष्णाअंगीं लागे। तें तें कांहीं केलिया न निघे। भीमकी उटी लागवेगें। मळी न निघे सर्वथा ॥६६॥ अत्यंत निर्मळ वनमाळी। निज निर्मळ न निघे मळी। चाकाटली भीमकबाळी। न देखे तळीं मळवटू ॥६७॥ पाहातां कृष्णचरणरेखा। चरणीं देखे तिहीं लोकां। भीमकी कृष्णमय देखा। उटणें हरिखा होतसे ॥६८॥ कृष्णचरणीं निजस्वरूप। देखतां आला स्वेदकंप। कंठीं दाटला जी बाष्प। विकळरूप मूर्च्छित ॥६९॥ सद्गुरु म्हणती सावधान। कृष्णचरणीं दृढ मन। धैर्य बळें राखोनि जाण। विकळपण येवों नेदीं ॥७०॥ मोहें धांविन्नलो धाये। म्हणे तुज झालें काये। झणीं दिठी लागेल माये। उचलोनि कडिये घेतली ॥७१॥ कृष्णचरणीं जें अनुभविलें। तें तंव न बोलवे बोलें।





भीमकीया शहाणपण केलें। खुणें वारिलें धायेतें ॥७२॥ पाळी आली कृष्णाकडे। एकेचि हातें फेडा बिरडें। न फिटे तरी रोकडें। दंडवत घडे भीमकीसी ॥७३॥ मेहुणेपणाचे परिपाटीं। विषयतृष्णेचिये दृष्टीं। बिरडा पडिल्या सुबद्ध गांठी। केवीं जगजेठी सोडील ॥७४॥ मेहुणे म्हणती हा जगजेठी। जाणे बिरडियाची हातवटी। अभ्यास केला यमुनेतटीं। दाटोदाटी गौळणींसीं ॥७५॥ वर्मेंकर्में बोलती खुणा। यादव म्हणती श्रीकृष्णा। बिरडिया पाडु तो केसणा। तूं देखणा निजदृष्टीं ॥७६॥ महावीरांचें बिरडें पडलें। तें तुवां एकलेनि फेडिलें। मेहुणे न लाजती बोलतां बोलें। रुक्मिया दिधलें तें यासी दीजे ॥७७॥ सासुसासरियांची आवडी। देवकीवसुदेवांचिये गोडी। म्हणती कृष्ण बिरडें फेडीं। वचन न मोडीं वडिलांचें ॥७८॥ कृष्ण अवलोकी कृपादृष्टीं। बिरड्या सुटल्या जी गांठी। द्वैतकांचोळी समदृष्टी। फेडी जगजेठी तत्काळ ॥७९॥ पहा गे येणें नवल केलें। कृष्णदृष्टीच उगवले। न सोडितां पैं फेडिलें। बिरडें काढिलें निजदृष्टीं ॥८०॥ पाहतां कृष्णदृष्टीकडे। फिटे संसारबिरडें। त्यासी हें दुर्घट केवढें। फेडितां बिरडें नोवरीचें ॥८१॥ नाना व्रतें तपें दानें। योगयागादि साधनें। करितां शिणले योगिजन। तरी कृष्णचरण न ठाकती ॥८२॥ भीमकी दैवाची पैं चांग। परम भाग्यें अतिसभाग्य। पावली कृष्णाचें अर्धांग। भावें श्रीरंग भोगित ॥८३॥ श्रीकृष्णासन्मुख भीमकी। बैसविली जी कौतुकीं। लाजा जाली अधोमुखी। कृष्णाकडे पाहे ॥८४॥ तंव तळवटीं एकाएक। देखती जाली कृष्णमुख। पाठमोरी पाहता देख। देखे सन्मुख श्रीकृष्ण ॥८५॥ वाम सव्य दोहींकडे। देखे कृष्णाचें रूपडें। आतां मी रिघों कोणीकडे। चहूंकडे हरि दिसे ॥८६॥ ऐशापरी

अतिसंकटीं। लाजतां कृष्ण देखे दृष्टीं। लाज सांडूनि गोरटी। उघडी दृष्टीं हरिरूपीं ॥८७॥ भीमकी सुकुमार गोमटी। कृष्णा इसीं हळूचि उटीं। कठिणहस्त तूं जगजेठी। मल्ल मुष्टीं मर्दिले ॥८८॥ तुझा लागतांचि हात। देह बुद्धीचा करिती घात। याचलागीं जीव भीत। तुझी मात न करवे ॥८९॥ रेवती म्हणे जी यादवा। आधीं घ्यावें इच्या नांवा। मग इसी हळदी लावा। देवाधिदेवा श्रीकृष्ण ॥९०॥ कृष्ण म्हणे हळदीमिसे। मजसी लावूं आल्या पिसें। नांवरूप मज न दिसे। काय म्यां कैसें म्हणावें ॥९१॥ नामरूपाची व्यवस्था। रुक्मिणीच जाणे तत्त्वतां। माझ्या आंगीं नाहीं सर्वथा। नाम घेता मी नव्हें ॥९२॥ आग्रह न करावा गोपाळा। नामरूपा तूंचि जिव्हाळा। व्यर्थ चाळविशी अबळा। सुखसोहळा तुझेनी ॥९३॥ कृष्ण खूण सांगें जीवींची। नामरूपें अतिरूपाची। सगुणगुणें हे गुणाची। प्रिया आमुची निजदृष्टीं ॥९४॥ कृष्ण म्हणे रुक्मिणी देवी। नामरूप तूंचि अवघी। मजपरीस तूंचि बरवी। हांसिजे सर्वी ऐकोनी ॥९५॥ हळदी घेऊनि श्रीरंगें। उटित भीमकीचीं अष्टांगें। येरी निवतसे सर्वांगें। जाणती आगें अनुभवी ॥९६॥ चरणीं उद्धरली शिळा। ते कर भोगी भीमकबाळा। मृदुपणाचा जिव्हाळा। जाणती कळा निजभक्त ॥९७॥ हा तंव ब्रह्मादिकांचा ईश। हळदीमिसें हृषीकेश। झाला भीमकीचा दास। जगन्निवास जगाचा ॥९८॥ दासांचेंही दास्य करणें। हें तंव श्रीकृष्णचि जाणे। उच्छिष्ट भक्तांचें काढणें। स्वामिपणें फुगों नेणे ॥९९॥ कृष्ण साचार देवाधिदेवो। फेडी भक्तांचा संदेहो। जैसा जयाचा भक्तिभावो। तैसा देवो तयासी ॥१००॥ भक्तभावाच्या आवडी। धृत रणांगणीं घोडीं। भक्तभावाची निजगोडी। जाणे धडफुडी श्रीकृष्ण ॥१॥



कृष्णचरणीं सत्य समता। सुरंग भावार्थअक्षता। भीमकीये ठेवीं माथा। लाज सर्वथा न धरावी ॥२॥ ऐकोनि हरिखेली वेल्हाळा। धन्य दशा झाली कपाळा। चरण वंदीन गोपाळा। भीमकबाळा उल्हासली ॥३॥ हरिखें नमूं पाहे गोरटी। तंव पूर्वील सख्या वक्रदृष्टी। देखतां लाज आली पोटीं। भेद उठी शंकेचा ॥४॥ तेणें चुकविले समचरण। वृथा गेलें जी नमन। मायेसकट हांसती जन। येरी अभिमान धरियेला ॥५॥ थोर अभिमानली बाळी। धरी अंगुष्ठ करतळीं। नमन चुकों नेदी ये वेळीं। देखोनि वनमाळी हांसत ॥६॥ येरी मस्तक जंव लोटी। तंव समचरणा पडली तुटी। अभिमानें केली फुटी। पाय ललाटीं न लागती ॥७॥ नमस्कारालागीं भलें। येरी मागुती अंगविलें। तंव समसाम्य पाउलें। कांहीं केल्या नातुडती ॥८॥ जितुकें अभिमानाचें बळ। तितुकें निजदृष्टिपडळ। तेणें चुकविलें चरणकमळ। वेगें वेल्हाळ गजबजली ॥९॥ वियोग न साहवे पोटीं। ऊर्ध्वश्वासें स्फुंदे गोरटी। चरण न लागती लल्लाटीं। कपाळ पिटीं निजकरीं ॥११०॥ दुःखें म्हणतसे कटकटा। मर मर दुष्टा अदृष्टा। कृष्ण पावलिया गोष्टी फुकटा। चरण लल्लाटा न लागती ॥११॥ लोक म्हणती सकळ। धन्य भीमकीचें कपाळ। तें हें आजि झालें निर्फळ। श्रीकृष्णचरण नातळती ॥१२॥ मनीं होती ऐसी आस। करूनि उटणियांचे मिस। कृष्ण नमीन सावकाश। तेंही उदास भाग्य जालें ॥१३॥ चरण न पावेचि कपाळ। जीवीं लागली तळमळ। गात्रें जाताती विकळ। परम विव्हळ होतसे ॥१४॥ चंडवाते जैसी कर्दळी। उलथों पाहे जी समूळीं। त्याहून अधिक भीमकबाळीं। गात्रें सकळीं कांपती ॥१५॥ नेत्रीं अश्रूंचिया धारा। अंग कांपतसे थरथरां। चरणवियोगें सुंदरा। शरीरभारा उबगला ॥१६॥ गळती अलंकार

भूषणें । करमुद्रिका आणि कंकणें । पडली अवशेषित प्राणें । सत्त्वगुणें मूर्च्छित ॥१७॥ जीवनावेगळी मासोळी । तेवी तळमळी भीमकबाळी । उद्धव कळवळिला तये वेळीं । आनंदजळीं वर्षत ॥१८॥ उद्धव म्हणे कृष्णनाथा । तुझी अवस्था शोधित चित्ता । विनोद करिसी भक्तहिता । चरणीं माथा ठेवूं दे ॥१९॥ मग धांवोनियां लवलाहें । धरूनि भीमकीची बाहे । म्हणे उठीं उठीं वो माये । वंदीं पाय कृष्णाचे ॥१२०॥ सांडीं सांडीं लज्जाभिमान । निर्विकल्प राखीं मन । वृत्ति करूनि सावधान । हरिचरण वंदावें ॥२१॥ मग उद्धवाचे वचनीं । देत विश्वास रुक्मिणी । लाज सांडिली उपडोनी । हरिचरणीं निर्लज्ज ॥२२॥ समचरणाचिये भेटी । सुटल्या अहंसोहं गांठी । उटूं विसरली गोरटी । घातली मिठी हरिचरणीं ॥२३॥ वृत्तीसी जालें समाधान । खुंटला शब्द तुटलें मौन । भोगिताहे चैतन्यघन । समचरण वंदितां ॥२४॥ उपरमली विषयदृष्टी । निजानंदें कोंदली सृष्टी । तेथें हरपली त्रिपुटी । उठाउठी निजलाभ ॥२५॥ कृष्णचरणीं जडली कैसी । देह विदेह नाठवे तिसी । विसरली विवाहसोहळ्यासी । कृष्णसाम्येंसी समरस ॥२६॥ नोवरा नोवरी नाठवे हेतू । आणवाहूनि गेला दृष्टांतू । अर्थ स्वार्थ आणि परमार्थू । झाला अनंतू अनंतीं ॥२७॥ हरि म्हणे वेल्हाळ । दिसे देहभावीं विकळ । माय धाय करिती कोल्हाळ । सोयरे सकळ मिळोनी ॥२८॥ ऐशा करितील पां गोष्टी । पायां लागलियासाठीं । जीवभावा पडली तुटी । वर जगजेठी वरूं नये ॥२९॥ लौकिक परमार्थासी सळ । दोहीं पक्षीं पडेल विकळ । मजवरी रचिती किडाळ । नानाशब्द जाळ तर्काचे ॥१३०॥ ऐसी उफराटी विकडी । पडली देवांसी सांकडी । सावधान हे धडफुडी । केवीं तांतडी होईल ॥३१॥ भीमकी निजसुखा अंतरीं । वेगें प्रवेशला





श्रीहरी । तोही विसरला सुंदरी । सावधान करावया ॥३२॥ देवो देवी झालीं एक । भेद फिटला निःशंक । लागली निजसुखटकमक । चेतवी देख कोण कोणा ॥३३॥ सहजीं सहजमेळीं । निजबोधें वनमाळी । स्वभावें भीमकबाळी । सावध करी सवेगें ॥३४॥ निजीं निजसुखावेगीं । न निवडे कवणें काळीं । करूनि अहंकाराची होळी । होय वेल्हाळी सावध ॥३५॥ तिसी देहावरी जरी येणें । तरी मी देह ऐसें न म्हणे । अवघें आंगेंचि आंगवणें । पूर्णपणें रचिलीसे ॥३६॥ चराचर जें जें दिसे । तें तें अवघें मीच असें । जीव शिव झाले मदंशें । रितें न दिसे मजविण ॥३७॥ यापरी कृष्णरुक्मिणी । सावध झालीं ऐक्यपणीं । माया गेली निंबलोण करूनी । वोंवाळूनि सर्वस्वें ॥३८॥ ऐक्याचिया बहुल्यावरी । दोघें वोहरे सांजिरीं । बैसलीं अभिनव प्रीतिकरीं । निजनिर्धारीं स्वलीला ॥३९॥ सरली नमस्काराची वारी । तंव श्रीकृष्णें केली चोरी । लिंगदेहाचे गांठीभीतरीं । डाव श्रीहरीं चोरिला ॥१४०॥ पालवा पालव बांधल्या साठी । चहूं देहांच्या सोडिल्या गांठी । पायां लागतां गोरटी । नेदी महाहटी हटवादी ॥४१॥ चैतन्य चोर हा निजदृष्टीं । सोडीत अभ्यंतरींच्या गांठीं । घेतले देऊं नेणे जगजेठी । व्यर्थ चावटी कां करावी ॥४२॥ आंबा शिंपावया गोरटी । कडे घेऊनि कृष्ण उठी । आइती केलीसे गोमटी । कुंकुमें वाटी परिपूर्ण ॥४३॥ ओंकार आळां दृढमूळ । सहज वृक्ष तो सुनीळ । वाढिन्नला सकोमळ । अर्धमात्रापरियंत ॥४४॥ आगमनिगम तेचि पानें । वैराग्यमोहराचीं सुमनें । मोहरला कवणें मानें । श्रद्धाजीवें सपोष ॥४५॥ परिमळा लोधले साचार । रुंजी करिती मुमुक्षुभ्रमर । आमोदरस भाव सादर । झणत्कार सांडूनी ॥४६॥ स्वानंदवसंताचें रिघवणें । वृक्ष नित्य नवा तेणें गुणें ।

संतकोकिळाचीं सुटलीं मौनें। टाहो करिती निजबोधे ॥४७॥ सकळ फळें फळल्यापाठीं। आम्रवृक्ष फळे शेवटीं। रसास्वादाचिया खोटी। पोटींची आंठी सांडिलिया ॥४८॥ निजसेजे जो मुराला। तोचि सज्जनीं सेविला। बहु काय बोलों बोला। आंबा शिंपों आला श्रीकृष्ण ॥४९॥ तेथें केली नवलकुसरी। सन्मुख पाहातां नोवरा श्रीहरी। विन्मुख पाहतांचि नोवरी। मांडियेवरी बैसविली ॥१५०॥ शेंड्याहूनि समूळीं। अखंड एक धार लागली। आंबा शिंपी भीमकबाळी। चौघी वेल्हाळ तेथें गाती ॥५१॥ प्रकृती पुरुष दोघेंजणें। आंबा शिंपिती एकपणें। चूत विस्तारला अच्युतपणे। आंबा म्हणवणें जगाचा ॥५२॥ आंबा शिंपोनी गोरटी। कृष्णसहित वेगें उठी। हातींची रिती नव्हे वाटी। कृष्ण पूर्णदृष्टीं पाहातसे ॥५३॥ त्रिगुण गुणातीत जाण। तिसरे दिवशीं तेलवण। करूनि नोवरीसी अर्पण। वाणपालटण चतुर्थी ॥५४॥ श्रीकृष्णासी वाणपालटण। नामरूपाचें वास संपूर्ण। स्थितिकाळासी देऊनि मान। लीला श्रीकृष्ण नेसला ॥५५॥ वाणपालटण नोवरीस। अक्षयाचे सपूर वास। नेसोनियां सावकाश। निजसुखेसी वर्तती ॥५६॥ वोहरें बैसवोनि वाडेंकोडें। समसाम्य वाहूनि साडे। ऐरणी विस्तारावया पुढें। शुद्धमती सावध ॥५७॥ व्याही गौरवितां कौतुक। कृष्णासमान मानी भीमक। सकळिकां देऊनि सुख। एकेंएक गौरविलें ॥५८॥ भीमकें मांडिलें विंदान। भवऐरणी संपादून। कृष्णासी वंशपात्रदान। विधीविधान वेदोक्त ॥५९॥ वंश विस्तारितां सुख। सोळा कळांचे सोळा कर्क। प्रकृतिस्वभाव सुपल्या देख। ज्ञानदीपें सोज्वळ ॥१६०॥ शुद्धमतीनें तत्त्वता। एका जनार्दन पाहतां। वंश ठेविला कृष्णमाथां। जुनाट कथा परिसिजे ॥६१॥





पूर्वी पितामहाचा पिता। तयासी प्रसन्न सुभानु होता। तेणें भानुदासें वंश सरतां। केला तत्त्वतां हरिचरणीं ॥६२॥ प्रल्हादाचे कृपेसाठीं। बळींचें द्वार राखी जगजेठी। तैसीच हेही आहे गोष्टी। कृपादृष्टी कृष्णाची ॥६३॥ सांगतां वंशपात्रदान। लागलें निजयशाचें अनुसंधान। आमुचे वंशी वरदान। परम भक्त कृष्णाचे ॥६४॥ मी जन्मलों धन्य वंशीं। म्हणोनि हरिभक्ति आम्हांसी। संत सोयरे निजसुखासी। वंश कृष्णासी निरविला ॥६५॥ जें जें जयासी निरविलें। तेणें तें पाहिजे सांभाळिलें। आमुचें चाळकपण कृष्णासी आलें। कांसे लाविलें जनार्दनें ॥६६॥ कथेसी झाली आडकथा। म्हणोनि न कोपावें श्रोतां। धेंडा नाचवील कृष्णनाथा। रसाळ कथा पुढें आहे ॥१६७॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणीस्वयंवरे विवाहसंभ्रमो नाम षोडशः प्रसंगः ॥१६॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥

## ॥ प्रसंग सतरावा ॥

श्रीगणेशाय नम: ॥ श्रोते म्हणती नवल । ऐकता याचे रसाळ बोल । अति अनुभव आणि सखोल । येताती डोल प्रेमाचे ॥१॥ मग म्हणती कविपोषका । थोर मिळविलें सुखा । पार नाहीं आजिचिया हरिखा । कथा सांग कां नि:शंक ॥२॥ महाप्रसाद जी आतां । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । कोणें नाचविलें कृष्णनाथा । नोवरी नाचविता कोण झाला ॥३॥ दोहीं पक्षींच्या दोघां जणां । कांस घालोनि आले रंगणा । सभा देखोनि दाविती खुणा । कळा नाचणीं दाविती ॥४॥ बोधें कृष्ण घेऊनि खांदी । नाचत ऐक्यतालें तिहीं छंदीं । चुकों नेदी समान बुद्धी । नाना छंदी नाचत ॥५॥ देहाभिमानें घेतली नोवरी । दावित नाना छंद कुसरी । द्वंद्वतालातें सांवरी । देतसे भोंवरी भवस्वर्गीं ॥६॥ बोध नाचत घेऊनि कृष्ण । नोवरी घेऊनि देहाभिमान । आपुलाले पक्षीं जाण । दोघेजण नाचती ॥७॥ ओंवाळूनि श्रीकृष्णासी । अनंत मुद्रा याचकासी । देऊनि आभर केलें त्यांसी । मागों आणिकांसी विसरले ॥८॥ ओंवाळणी हातीं चढे । तों न पाहे आणिकांकडे । वानिती श्रीकृष्णाचे पवाडे । मागणें त्यापुढें खुंटलें ॥९॥ श्वेतपीत त्रिगुणवास । वोवाळूनि सावकाश । त्याग करिती कृष्णदास । अतिउल्हास सोहळियाचा ॥१०॥ ओंवाळणी नोवरीकडे । अमित विषयसुख पडे । घेतां अधिक तृष्णा वाढे । चहूंकडे ते मागती ॥११॥ न सुटती अभिलाषाच्या गाठी । सोडूनि देतां कांपती मुष्टी । मागुती लोलंगता दृष्टी । कवडीसाठीं झोंबती ॥१२॥ त्यागितां जीर्ण देहाचें वास । दाते होती





कासाविस । न सरे मागत्याची आस । त्यातें बहुवस वानिती ॥१३॥ पाहतां अत्यंत जर्जर झालें । दिसे नवांठायीं तरकेलें । पाहिजे अविमुक्ती त्यागिलें । वायां गेलें दो दिसां ॥१४॥ ऐकोनि त्यागाची भात । अधोमुख होय गृहस्थ । लोभ न संडी पोटाआंत । क्रोधें निंदित शिकविल्या ॥१५॥ तुम्हीं कैसेनि त्याग केला । शिकवूं आलेती पुढिलांला । आम्ही नायकों तुमच्या बोला । म्हणोनि रुसला त्यागासी ॥१६॥ त्याग नोहे नोवरीपक्षीं । देखोनि हांसिजे मुमुक्षीं । कृष्णवऱ्हाडी अतिदक्षी । त्याग विषयीं उद्धट ॥१७॥ कृष्ण घेऊनि नाचतां । बोध शिणला तत्त्वतां । हळूच उतरूनि कृष्णनाथा । होय निघता लाजोनी ॥१८॥ अभिमान पैं नोवरी । कांहीं केल्या न उतरी । पळे उठी पळे दूरी । लाज न धरी सभेची ॥१९॥ त्यासी धरूं धांविन्नले एक । नोवरी घेऊनि पळे देख । कोंडूं जातां अधिकाधिक । ठकूनि लोक तो पळे ॥२०॥ त्यासी संतीं केली विधी । हळूचि आणिला सोहंबुद्धी । तेही सांडुनि त्रिशुद्धी । नोवरी संधी उतरली ॥२१॥ तेथें झाली जी नवलपरी । भक्तिं प्रार्थिला मुरारी । नोवरी घेऊनि खांद्यावरी । रंगीं श्रीहरी नाचावें ॥२२॥ भक्तिभावा भुलला देवो । वचन नुल्लंघीच पाहा हो । नोवरी घेऊनि देवाधिदेवो । दावी निर्वाहो नृत्याचा ॥२३॥ निजीं निजरूपावरी । समसाम्य निजनोवरी । घेऊनियां खांद्यावरी । नृत्य करी स्वानंदें ॥२४॥ पहिलेनि तालें जी तत्त्वतां । अकार हाणोनियां लातां । उकारमकारांचिया माथां । पाय पिटिता होय कृष्ण ॥२५॥ उल्लाळ देत कवणे परी । वैकुंठ-कैलासांहूनि वरी । शून्य सोडूनियां दुरी । चिदंबरीं नाचत ॥२६॥ नोवरी वाढवी आपणावरी । आपण वाढें नोवरी । क्षणा तळीं क्षणा वरी । नानापरी नाचत ॥२७॥ पहातां पहातां

पडलें टक। नोवरी नोवरी झाली एक। जीव शिव हे सरली भाक। निजसुख स्वानंदें ॥२८॥ कृष्णासी आठवलें देख। आम्ही दोघें होऊनि एक। नाचतां जीवसकळिक। जीवपणासी मुकतील ॥२९॥ यालागीं काळाचिये स्थिती। नोवरी उतरी श्रीपती। जयजयकार कीजे भक्तीं। वोंवाळिती सर्वस्वें ॥३०॥ धेंडा नाचविलियावरी। तळी आणिली बाहेरी। फळीं पुष्पीं अति साजिरी। ज्ञानदीपें सोज्वळ ॥३१॥ दिधली अनुभवाच्या हाता। वंदूनि झाला तो बोलता। वेगीं सांगा कुळदेवता। नाचविता मी होईन ॥३२॥ आधीं सांगा नोवरीकडे। नांवें एकों द्या निवाडे। ते नाचवीन वाडेंकोडें। वराकडे मग पुसों ॥३३॥ नोवरीकडील कुळदेवता। मायाराणी आणि ममता। कल्पनाकामाक्षी सर्वथा। माजघरी खेळतसे ॥३४॥ वासनादेवी सकळी। बाळा बगळा मुकी मैराळी। मारको मेसको कराळी। उच्छिष्ट चांडाळी भाणाची ॥३५॥ आशा तृष्णा दोघीजणी। आमुच्या कुळी मुळींहूनी। निंदादेवी महादारुणी। तिसी सज्जनी कांपिजे ॥३६॥ मोहमातंग आमुचे कुळी। लोभवेताळ त्याजवळी। क्रोध झोटिंग महाबळी। आधीं सळी शुभकार्या ॥३७॥ जें जें दैवत सांगे पैं गा। तें तें नातळत आणि रंगा। न ये त्या वाटा लावी वेगा। नाचवूनि उगा तो राहे ॥३८॥ कृष्णपक्षी अलौकिक। अवघें कुळदैवत एक। नाचतां अनुभव कौतुक। पडलें टक सकळिकां ॥३९॥ कृष्ण कुलदैवत एक। दुजें नाहीं नाहीं देख। एका जनार्दनीं सुख। अति संतोष नाचतां ॥४०॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमतें रुक्मिणी स्वयंवरें धेंडानृत्यं नाम सप्तदशः प्रसंगः ॥१७॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥





## ॥ प्रसंग अठरावा ॥

श्रीगणेशाय नमः ॥ हातीं दुधातुपाची वाटी। देवकी बैसवूनि पाटी। पुढें दिधली भीमकी गोरटी। उदर शिंपी शुद्धमती ॥१॥ धन्य धन्य तुमची कुशी। जेथें जन्मले हृषीकेशी। म्हणोनि लागली चरणांसी। रुक्मिणीसी निरवित ॥२॥ चौघां पुत्रांहूनि आगळी। वाढविली हे वेल्हाळी। आतां दिधली तुम्हांजवळीं। कृष्णस्नेहें पाळावी ॥३॥ दोघीजणीं मातापितरीं। हातीं धरूनियां नोवरी। यादवांचे मांडीवरी। यथानुक्रमें बैसविली ॥४॥ गहिंवर न धरवे भीमकासी। प्रेम लोटलें तयासी। मिठी घालोनि कृष्णचरणांसी। उकसाबुकसी स्फुंदत ॥५॥ लाज सांडोनि शुद्धमती। पाया लागली श्रीपती। भीमकी देऊनियां हातीं। वैकुंठपती जोडिला ॥६॥ पाहाती नरनारी सकळा। आसवें आलीं त्यांचियां डोळां। खंतीं न भीमकबाळा। मायेकडे न पाहेचि ॥७॥ कृष्णीं लागलिया प्रीती। मायमाहेराची खंती। सर्वथा न करी चित्तीं। निजवृत्ती हरिचरणीं ॥८॥ वोहमायेसी कळवळा। पायां लागे वेळोवेळा। आसुवें पूर्ण आलीं डोळा। म्हणे प्रतिपाळा भीमकीसी ॥९॥ शुद्धमती म्हणेज रायासी। मज आंदण द्या भीमकीसी। होईन कृष्णाची निजदासी। चरण सेवेसी निरंतर ॥१०॥ राजा म्हणे शुद्धमती। जीवप्राण आणि संपत्ती। सर्वस्व अर्पिले श्रीपती। विकल्प चित्तीं न धरावा ॥११॥ भाव विश्वास दोघेजण। दिधले भीमकीसी आंदण। कृष्णसेवेलागीं जाण। अहर्निशीं सादर ॥१२॥ द्विपदा आणि चतुष्पदा। नाना रत्ने धातु अष्टधा। भीमकें आंदण

गोविंदा। बहुत संपदा दीधली ॥१३॥ वसुदेवादि उग्रसेन। भीमकासी करिती आमंत्रण। भोजनाचा आग्रह जाण। केला सन्मान सर्वांचा ॥१४॥ भीमकें विनविलें कृष्णासी। विनंति आहे पायांपाशी। पुत्र झालिया भीमकीसी। निजपंक्तीसी शेष दीजे ॥१५॥ चतुर्विधा सूत्रधारी। तुझी आज्ञा आमुचे शिरीं। भोजनाचा आग्रह न करीं। वचन श्रीहरी मानलें ॥१६॥ वरात निघाली वेगेंसी। गृहप्रवेश द्वारकेसीं। आज्ञा दिधली भीमकासी। निजनगरासी तो निघे ॥१७॥ दोघें वधूवरें गजस्कंधीं। भोंवतीं यादवांची मांदी। गीत नृत्य अतिविनोदीं। द्वारकेंमध्यें उत्सवो ॥१८॥ मदगजगंधाचे पैं सडे। कुंकुम कस्तूरी चहूंकडे। मखरें श्रृंगारली पुढें। वाडेंकोडें झळकती ॥१९॥ नगर श्रृंगारिलें कुसरी। गुढिया तोरणें घरोघरीं। कर्दळीस्तंभ रोविले द्वारीं। फळें त्यामाझारीं शोभती ॥२०॥ पूर्णकुंभ द्वारोद्वारीं। प्रदीप्त दीप ठेविले वरी। दधि-अक्षता-दूर्वांकुरीं। सुमनहारीं सुगंध ॥२१॥ वोहरें पहावया कौतुक। नगरनागरिक लोक। मुडपघसणी होतसे देख। एकेंएक धांविन्नले ॥२२॥ एक चढलीं माडिया गोपुरीं। पुष्पांजुळी देती नरनारी। देव वर्षती अंबरीं। जयजयकार प्रर्वतला ॥२३॥ पाहता कृष्णस्वरूपासी। अराणुक नाहीं डोळियांसी। यालागीं न येती दृश्यापाशीं। कृष्णसुखासी पकडले ॥२४॥ पदोपदीं दीपावळी। वोंवाळिती वनमाळी। बाप दैवाची नव्हाळी। भीमकबाळी अर्धांगी ॥२५॥ वेश्या आणि संन्यासी। मुडपघसणी होतसे कैसी। कोप आला श्रीपादासी। दंडें वेश्येसी ठोकिलें ॥२६॥ येरी विसरली देहासी। वृत्ति लोभली कृष्णस्वरूपासीं। रागें लाता हाणोनि तिसी। म्हणे विटाळ [illegible]





हांसोनि कपाळ पिटी। अजुनी क्रोध न सोडी पाठी। विटंबिली दंड कांसोटी। आत्मदृष्टी तुम्हां नाहीं ॥२८॥ मी उत्तम पैल हीन। विषमभेदाचें अज्ञान। सर्वांभूतीं समसमान। निजात्मज्ञान तुम्हा नाहीं ॥२९॥ नाहीं निजशांती रोकडी। तंव कां केली तडातोडी। भगवीं नाशिलीं लुगडीं। उपाधि गाढी श्रीपादा ॥३०॥ शेंडी सांडिली उपडोनी। वासना वाढविली चौगुणीं। श्रीकृष्ण देखिलिया नयनीं। विटाळ मानी तो निजांध ॥३१॥ ऐसा करितां वाग्वाद। तंव दुरी अंतरला गोविंद। आड ठाकला जनसंबंध। न दिसे मुकुंद सर्वथा ॥३२॥ वोहरे आली महाद्वारा। लोण उतरिती सुंदरा। मूद वोवाळी सुभद्रा। कृष्ण पुढारां चालिला ॥३३॥ पूर्ण कलशेंसीं आल्या दासी। अनंत वाणें परिवस्त्रेंसी। ते ते मेचू देऊनि त्यांसी। नानाविधेंसीं अलंकार ॥३४॥ शोभा आली भाणववासी। कृत्रिम लक्ष्मी शोभली कैसी। साच मानलें जनांसी। तिणें सकळांसी भुलविलें ॥३५॥ येतां देखोनि कृष्णनाथा। लक्ष्मी लाजली तत्त्वतां। सांडूनियां कृत्रिमता। निजस्वरूपता प्रगटली ॥३६॥ भीमकीया देखिलें लक्ष्मीसी। विस्मय वाटला तियेसी। विचारितां निजमानसीं। दोहीं रूपेंसीं आपणचि ॥३७॥ विधि गृहप्रवेशासी। वोहरें बैसविली भाणवसासी। करविती लक्ष्मीपूजनासी। विधिवेदेंसीं द्विजवर ॥३८॥ परमामृतें भरूनि वाटी। देवकी लावी सुनेच्या वोठीं। पुसे वृद्धाचारगोष्टी। सुनें घालीसी पोटीं निजमाये ॥३९॥ येरीं म्हणे परमानंदें धाल्यें। कृष्णसुखें नित्य निवाल्यें। तुमचे सेवेसी पावल्यें। प्राप्त झाल्यें हरिचरणा ॥४०॥ रेवती येऊनि भीमकीपाशीं। वेगीं निरवी भाणवसासी। हातीं धरूनि नोवरीसी। काय तियेसी

सांगत ॥४१॥ वरूनि आलीसी कृष्णनाथा। तरी हें सर्व तुझे माथां। देणेंघेणें कार्यचिता।
कर्तव्यता तुज आली ॥४२॥ येथींची ऐसी आहे रीती। सुचित्त राखावी चित्तवृत्ती। सकळ मानावी
कृष्णस्थिती। जेणें श्रीपती संतोषे ॥४३॥ जें कां खरकटलें पाळें। अत्यंत गोंगाणी गोंगाइलें।
तें भाणवसाबाहेर पाहिजे केलें। नेऊन घातलें वोंवळ्यांत ॥४४॥ जें कां उठंडळ डळमळी।
अत्यंत झणत्कारें गडबडी। आश्रमआळां ठेवीं रोकडी। वेळणी तोंडीं विधीची ॥४५॥ जें कां
कांठफरा उललें। देखसी ज्याचें बुड भंगलें। ते न पाहिजे हालविलें। असो संचरले
निजआळां ॥४६॥ तपें तापली तुपाची। स्वर्गसिंका बैसका त्याची। सामुग्री वेंचिल्या तेथींची।
मग उलंडूनि सांडिती ॥४७॥ कामक्रोधाचे उंदीर। कोरूनि टोलर करिती अपार। त्यांच्या मुखीं
घालूनि पाथर। येतें द्वार बुजवावें ॥४८॥ लाविल्या लोण नलगे ज्यासी। लोणलक्षण त्या काय
पहासी। ते तंव नाणावे पंक्तीसी। चवी त्यांसी पैं नाहीं ॥४९॥ सगळे शिजविता अवघड। काकड
करिती कडकड। समजावें भरडीं दृढ। होतील गोड परिपाकें ॥५०॥ कणिक चाळावी असकट।
पाखडूनि सांडावें कसपट। होईल परिपाक चोखट। पूर्णपुरिया सिद्धलाडू ॥५१॥ कृष्णभाणवसा
त्रिशुद्धी। अष्टमहासिद्धी नवनिधी। तेथें तुवां वागावें सोहंबुद्धी। जीवउपाधी सांडूनी ॥५२॥
सासु सासरे भावे दीर। आदिकरून लहान थोर। होऊनि अवघ्यासी सादर। अति तत्पर
सेवेसी ॥५३॥ वडील जाऊ आपण। भीमकीकरीं निजकांकण। घालूनि करी निरवण।
पाणिग्रहण भाणवसा ॥५४॥ [illegible]





मनोहर। येरीं नमस्कार तिसी केला ॥५५॥ बाई जें जें तुम्ही शिकविलें। तें तें मज हितासी
आलें। रेवती हरिखेली येणें बोलें। आलिंगिलें भीमकीसी ॥५६॥ एवं द्वारकेमाझारीं। परमानंद
घरोघरीं। देव वर्षती कुसुमें अंबरीं। जयजयकार प्रवर्तला ॥५७॥ यापरी गृहप्रवेश। करूनियां
हृषीकेश। रमायुक्त जगन्निवास। द्वारकावास करीतसे ॥५८॥ शुक म्हणे परीक्षिती। गृहस्थ जाला
श्रीपती। भीमकीहरणाची ख्याती। तुजप्रती सांगितली ॥५९॥ एवं हरण पाणिग्रहण। तुज केलें
गा श्रवण। ज्याचेनि श्रवणें जाण। दोष दारुण नासती ॥६०॥ ग्रंथपीठिका संपूर्ण। कथेसी
श्रीकृष्ण कारण। कळसा आलें निरूपण। प्रेम सज्जन जाणती ॥६१॥ रुक्मिणीहरणवार्ता।
जुनाट होय सर्वथा। परी पाणिग्रहण व्यवस्था। नवी कथा कवित्वाची ॥६२॥ ऐसा विकल्प
मानाल झणीं। जें बोलिले श्रीव्यासमुनी। तोचि अर्थ विस्तारूनी। प्रगट केला प्राकृतें ॥६३॥
यथाविधि पाणिग्रहण। मुळीं आहे व्यासवचन। तें सूत्रपाय निरूपण। श्लोकार्थ जाण
बोलिलों ॥६४॥ साच न मानी ज्याचें चित्त। तेणें पाहावें श्रीभागवत। तेथील श्लोकीचा श्लोकार्थ।
ऐसाचि असे सर्वथा ॥६५॥ राजे जिणोनि दारुण। भीमकी आणोनी आपण। कृष्णें केलें
पाणिग्रहण। हें निरूपण मुळींचें ॥६६॥ येणेंचि पदें पदविस्तारीं। कथा चालिली पुढारी। खोडी
ना ठवावी चतुरीं। ग्रंथ निर्धारीं न पाहतां ॥६७॥ जैसें वटबीज अल्पप्राय। परी विस्तार गगना
जाय। तैसीच हे कथा होय। थोडेनि बहू विस्तार ॥६८॥ मूळ सांडूनि सर्वथा। नाहीं वाढविलें
ग्रंथा। पाहातां मूळींच्या पदार्था। अर्थकथा चालिली ॥६९॥ नाहीं ग्रंथारंभसंकल्प। नव्हता

श्रोतयांचा आक्षेप। ग्रंथीं उजळला कृष्णदीप। सुखरूप हरिकथा ॥७०॥ जेणें हा ग्रंथ करविला। तो आरंभींच उपरमला। पुढें ग्रंथ कैसा चालिला। बोलतां बोला न बोलवें ॥७१॥ नेणों काय कृष्णनाथा। हे आवडली ग्रंथकथा। तोचि होऊनि श्रोता वक्ता। अर्थ परमार्थां आणिला ॥७२॥ ये ग्रंथींचें निरूपण। जीवशिवां होतसे लग्न। अर्थ पाहतां सावधान। समाधान सात्त्विकां ॥७३॥ येथें विवेकी व्हावा वक्ता। समाधान पाहिजे श्रोता। त्याचेनि संवादे हरिकथा। सुख समस्तां होईल ॥७४॥ होऊनि अनुभवकसवटी। कथा चालिली मऱ्हाठी। वोवी न चले फुकासाठीं। श्रद्धा पोटीं धरिलिया ॥७५॥ हे कृष्णकथा अलोलिक। महादोषांसी दाहक। भवरोगासी छेदक। अर्धमात्रा सेविलिया ॥७६॥ हे मुमुक्षीची कुलदेवता। मुक्तांची करी नित्य मुक्तता। येरां संसारियां सर्वथा। नवरसें निववीत ॥७७॥ जरी कोणी स्वभावें पुढें। उघडती कानींचीं कवाडें। अर्थ ऐकतां निवाडें। पुढें पुढें अतिगोड ॥७८॥ गोडपणें पडल्या मिठी। सुटती जीवशिवांच्या गांठी। कृष्णकथा हे गोमटी। उठाउठी विजलाभू ॥७९॥ येथें भीमकीचे पुरले आर्त। तो हा आदरें वाचितां ग्रंथ। श्रोतयांचे मनोरथ। कृष्ण समर्थ पुरवील ॥८०॥ माझे पुरवाया मनोरथ। तों मनचि झाले कृष्णनाथ। एका जनार्दनीं नित्य तृप्त। परंगत हरिचरणीं ॥८१॥ एका जनार्दना शरण। म्हणतां गेलें एकपण। सहज खुंटलें निरूपण। महामौन कथेचें ॥८२॥ मुखीं जनार्दनचि वक्ता। जनार्दनचि झाला श्रोता। जनार्दनचि ग्रंथ लिहिता। सत्य सर्वथा हे वाणी ॥८३॥ एका एकजनार्दनीं। जनार्दनचि एकपणीं। निर्मळ जान्हवीचें पाणी। मनकर्णिका अतितीर्थ ॥८४॥ वाराणसी महापुरीं। मनकर्णिकेच्या तीरीं। रामजयंतीमाझारीं। ग्रंथ निर्धारीं संपविला ॥८५॥ शके चवदाशे त्र्याणव। प्रजापति संवत्सराचें नांव। चैत्रमासाचें वैभव। पर्व अभिनव रामनवमी ॥८६॥ ते दिवशीं सार्थक अर्थी। रुक्मिणीस्वयंवरसमाप्ती। एका जनार्दन कृपास्थिती। ग्रंथ वाराणसीप्रति संपविला ॥८७॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे हरिवंशसंहितासंमते रुक्मिणी स्वयंवरे एकाकारटीकायां अष्टादशः प्रसंगः ॥१८॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥ संपूर्ण ओवीसंख्या १७०८.

॥ समाप्तोऽयं ग्रन्थः ॥

## महाराष्ट्र-कविवर्य मोरोपंतकृत

# रुक्मिणीहरणगीत



कुरुक्षेत्रीं येतां सूर्यग्रहपर्व। स्नाना आले सर्व यदू कुरु ॥१॥ द्रुपदाची कन्या सद्गुणांची खाणी। पांडवांची राणी होती जेथे ॥२॥ श्रीकृष्णाच्या भार्या साष्टशत सोळा। सहस्रही गोळा झाल्या तेथें ॥३॥ द्रौपदी सर्वांचा करी बहुमान। त्यांचें देहमान उरों नेदी ॥४॥ रुक्मिणीस म्हणे ॥ ''सांग निज लग्न–। कथा मन मग्न सुखीं होऊ'' ॥५॥ रुक्मिणी म्हणे ''हो असो स्तव; यथा–। मती लग्नकथा सांगेन मी ॥६॥ विदर्भदेशांत कुंडिननगरीं। भीष्मकाचे घरीं जन्म माझें ॥७॥ माझ्या जननीचें नाम शुद्धमती। जिचा भाव पति महेश्वर ॥८॥ बंधु माझे पांच वडील अवघे। आहेत चवघे ताताधीन ॥९॥ देवब्राह्मणांचा भक्त माझा बाप। ज्याला स्वप्नीं पाप ठावें नाहीं ॥१०॥ रुक्मिणी हें माझें, माहेरींचें नाम। जातीपुष्पदाम भावांचें मी ॥११॥ रुक्मी ज्येष्ठबंधु मोठा अहंकारी। घरींदारीं भारी तेज त्याचें ॥१२॥ स्वामीचा म्यां साधुमुखें बडिवार। आयकिला फार बाळपणीं ॥१३॥ कारण आनंदसिंधुमज्जनाचे। येणें सज्जनाचें मज होय ॥१४॥ श्रीकृष्णगुणांची लागलीच गोडी। पळही न सोडी मन माझें ॥१५॥ तात म्हणे द्यावी संसारवैद्याला। देईन चैद्याला दादा म्हणे ॥१६॥ दादापुढें कांहीं न चाले बापाचें। ते फळ पापाचें माझियाचि ॥१७॥ आणविला चैद्य धरियेले लग्न। झालें





चिंतामग्न मन माझें ॥१८॥ चिंता नाहीं कळों दिली म्यां जनांत। योजिले मनांत सात श्लोक ॥१९॥ लिहिली पत्रिका आपुल्याच हातें। संकट महा तें काय सांगू ॥२०॥ सुदेव ब्राह्मण विनविला आर्य। पाठविला कार्य साधावया ॥२१॥ पत्रिका घेऊनि गेला द्वारकेला। तेणें फार केला श्रमी देह ॥२२॥ ब्राह्मणाची भीड स्वामींस पडली। तरीच घडली मज सेवा ॥२३॥ विप्रहस्तीं देती हात पुण्यश्लोक। सात पुण्यश्लोक वाचितांचि ॥२४॥ पूर्ण अनुग्रह स्मितें जाणविला। रथ आणविला त्याचि वेळे ॥२५॥ स्वरथीं प्रथम चढवूनि विप्र। माझे स्वामी क्षिप्र आरूढले ॥२६॥ आले गांवें एका रात्रीत शंभर। स्वामी विश्वंभर दयासिंधु ॥२७॥ द्विज गेल्यावरी शिशुपाळ आला। चिंताज्वर झाला मला भारी ॥२८॥ माय दे लावूनी देहाला हळद। हे हालाहलद न तो पाप ॥२९॥ करूनी भलतें एक मिष वाटे। पाहें विष वाटे अन्नपान ॥३०॥ पुसतां सांगें मी अश्रुहेतु तेल। उत्तरीं गुंतेल नव्हे कधीं ॥३१॥ 'लग्नपूर्वदिनीं वृष्णीबळपूर्ण। होऊनि या तूर्ण हरावया' ॥३२॥ ऐसें जें लिहोनी पाठविलें होतें। आठविलें हो! तें शतदां म्यां ॥३३॥ न आले त्या दिशीं मध्यरात्रीं मात्र। चिंताज्वरें गात्र तापविलें ॥३४॥ त्या रात्रीं लागला नाहीं माझा डोळा। प्राण कंठीं गोळा झाले होते ॥३५॥ भक्तचिंतामणि गौरीहर परी। रुसल्यें त्यावरी शतदां मी ॥३६॥ मी म्हणें कपाळीं हा नवरा जीवा। हा! नवराजीवाऽमलनेत्रा! ॥३७॥ कृष्णास दे कीं हे तनु पावकास। अंबे! पाव कास घालूनियां ॥३८॥ वाहीन मी नित्य श्रीशंकरा। बेल विशंक राबेल मन पायीं ॥३९॥ देईन मी नित्य

नव सदा दानें। नवस दानानें किती केले ॥४०॥ काय करावें त्या सज्जनें वाडवें। मद्दैव आडवें झालें
वाटे ॥४१॥ जाणों पत्रिकेंत लिहितां चुकल्यें। तरीच मुकल्यें महासुखा ॥४२॥ धाडिला चोरोनी
स्वभावा लाखोटा। स्वभावाला खोटा कोण म्हणे ॥४३॥ न पावावें हे तो त्यांची नव्हे रीती। न ते
अव्हेरिती विनवितां ॥४४॥ ऐसी नानापरी चिंतेंत पडल्यें। दुःखें मी रडल्यें सारी मात्र ॥४५॥ जों
ऐसें मन्मन चिंतेंत राहाटे। स्फुरला पहाटे डावा बाहू ॥४६॥ स्फुरे नेत्र नाशी सर्व ताप डावें। सर्वथा
पडावें सुखी येणें ॥४७॥ हर्षलें काही तों सुदेव देखिला। तो विप्र लेखिला महादेव ॥४८॥ तो म्हणे
आणिला आला वासुदेव। हा लावा सुदेव वाटे शीघ्र ॥४९॥ म्यां त्याच्या चरणीं ठेविलें मस्तक।
तेणेंही हस्तक माझ्या माथां ॥५०॥ त्या प्राणदात्याला काय म्यां अर्पावें। अमृत तर्पावें कोणें
रसें ॥५१॥ जें जें दिलें तें तें सद्गुरूला अल्प। वंदनचि कल्पतरुपूजा ॥५२॥ ज्याला भक्तवाण
दुष्टदंड पाठ। आले पाठोपाठ भावोजीही ॥५३॥ भारी बळभद्रभावोजींचें सैन्य। येतां आलें दैन्य
चैद्यादिकां ॥५४॥ सीमांतपूजन केलें जनकाने। जैसे जनकीनें मिथिलेंत ॥५५॥ उतरले प्रभु
कुंडिनाबाहेर। हर्षलें माहेर दादाविणें ॥५६॥ अंबिकेला न्यावी नवरी बाहेरी। हा माझ्या माहेरी
कुळधर्म ॥५७॥ मज रक्षावया कटकाचा कोट। केला वाटे लोट सिंधूचा तो ॥५८॥ या कन्यारत्नाला
केली सेना पेटी। अंबिकेच्या भेटी नेते झाले ॥५९॥ जगदंबेची म्यां पूजा केली भावें। कार्य सिद्ध
व्हावें न कां मग ॥६०॥ उजवा अशोक प्रसाद मागतां। चरणा लागतां दिला मज ॥६१॥ प्रसाद





घेऊनि करूनी नमन। तेथूनी गमन जैसें केलें ॥६२॥ जे मजभोंवते होते उभे मेले। अंबेनें ते केले वेडे
सर्व ॥६३॥ गळालीं मेल्यांच्या हातींचीं हातेरें। पळांत मातेरें झालें त्यांचें ॥६४॥ न गणिलें
रथगजानीका गदा। ग्रजांनीं कागदा मान दिला ॥६५॥ प्रकटले स्वामी लाजल्यें मीं बाळा। सखी
म्हणे माळा आधीं घालीं ॥६६॥ ज्यांच्या तेजें रवि-शशी मालवले। ते घ्याया लवले माला
माझी ॥६७॥ धरूनियां करीं स्यंदनीं वाहिलें। हें प्रेम पाहिलें कोठें कोणही ॥६८॥ बैसवूनी अंकीं
उराशीं धरिलें। मज उद्धरिलें चिंतेतूनी ॥६९॥ मला नेतां वीर एकही न बोले। वाटले ते कोल्हे, सिंह
स्वामी ॥७०॥ त्या कटककोटा स्वर्ग मज सुधा। म्हणा चक्रायुधा पक्षिराज ॥७१॥ यापरी हरूनी
मज दूरवर। आले शूरवर धनी माझे ॥७२॥ पावले दुर्जन असा वध हो! ते। असावध होते
घडीभरी ॥७३॥ मग मज नेलें ऐसें त्या कळलें। वदन मळलें अपयशें ॥७४॥ ते दुष्ट म्हणती तापोनी
कोपानें। हरिली गोपानें कन्या कीर्ती ॥७५॥ जिंकोनियां यदुनंदनास मज। मंद नासमज हरूं
आले ॥७६॥ शाल्व जरासंध चैद्य शिशुपाळ। धांवले भूपाळ रणासाठी ॥७७॥ योजूनी स्वामीला
गट करायाचें। कटक रायाचें गांठी घाली ॥७८॥ स्वामींना पावता भयें तनु कंपा। केली अनुकंपा
मजवरी ॥७९॥ बोलिले 'कोमलें आंग कांपतीस। सांग कां पतीस पावोनही? ॥८०॥ शत्रुभयें
झाला प्रगट कांप हा। स्वकटका पहा भिऊं नको ॥८१॥ चैद्यादि तृणाच्या पहा या दवातें। अहा
यादवांतें कोण साहे ॥८२॥ फिरले आमुचे बळदेव दादा। तेजें सिंहानादा करितात ॥८३॥ भेदितील

तेजें पर्वता पाहा तें। सर्व ताप हातें हरितील ।।८४।। यांच्या जळतील तेजें पळतील। वैरी मळतील अकीर्तीनें ।।८५।। केला नसे कोण्ही रामासम रण। रामास मरणभय नाहीं ।।८६।। यांचे देवांनींहि हळ नवसावें। पळ न बसावें पुढें काळें ।।८७।। भ्यालीस कां अहा मुग्धे। स्वस्थ रहा। चमत्कार पहा संगराचा' ।।८८।। या स्वामीच्या बोले साध्वस उडालें। आजंदीं बुडालें मन माझें ।।८९।। पाहें तों ऊठलें बळाचे सागर। मुसळ नांगर घेऊनियां ।।९०।। त्यां स्वल्प पन्नास वर्ण वाखाणाया। अर्णवा खाणाया समर्थ ते ।।९१।। स्वर्गज होम कां न कोहाळा हळा। नको हाळाहळा गंध ज्याचा ।।९२।। घटबीं शोषाया तप नदीपा न। तपन दीपा न लोपवील ? ।।९३।। झाले और्व परबळ पारावरा। बळ पारावरा किती जाणे ? ।।९४।। परसेनार्णवीं बळ मंदराग। खळ मंद राग त्याचा येतो ।।९५।। वाहिली क्षोणीतें खणीत शोणितें। वर्णावें कोणी तें महायुद्ध ।।९६।। वीर अभिमुखप्रहारें जे मेले। अप्सरांनीं नेले वरूनी ते ।।९७।। नाचले त्या रणरंगांत कबंध। कीं पातकबंधमुक्त झाले ।।९८।। विस्तार तूं पुसों नको, टिके सरी। न कोटिकेसरीजवळ यांच्या ।।९९।। वैरिवीर बहु रणांत गळाले । उरले पळाले मृत्युभये ।।१००।। जयश्रीचा लाभ सर्वाही यादवां। किती तीं या दवा वैरीतृणे ? ।।१०१।। दादानें देखिलें, स्वरक्त रंगले। जे रणी भंगले चैद्यादिक ।।१०२।। म्हणे, 'पाहा कैशी सोडवितों कन्या ? हें कार्य म्या अन्या सांगो नये ।।१०३।। यादवांच्या रक्तें क्षोणिला न्हाणितों। भगिनी आणितों घडीमाजी ।।१०४।। धरीन चोराला, त्रैलोक्य धुंडीन। नातरी कुंडीन पाहें न मी' ।।१०५।। जिंकावया





केली तयां प्रतिज्ञा ते। जयांप्रती ज्ञाते उपासिती ।।१०६।। अक्षौहिणी सैन्य घेऊनी धांवला। क्षणांत पावला दादाराय ।।१०७।। जयांच्या पायाला भाविक लागती। भावी कलागती त्यांशीं बरी ।।१०८।। दादानें रथासीं रथ मेळविला। क्षण खेळविला प्रभूनीं तो ।।१०९।। स्वामींचें जें तेज अजित रणीं ते। अजी तरणीतें तापवील ।।११०।। न मर्मे खंडिलीं कोदंडकवचें। तो दंडक वचें सांगवेना ।।१११।। स्वामींची दुर्जनीं उग्रता बाहेर। मानस माहेर करुणेचें ।।११२।। विरथ विशस्त्र दादा केला भग्न। मग खड्ग नग्न वधावया ।।११३।। होता बंधुतेज मंद, कालवलें। नंदका लवलें मन शिर ।।११४।। ऐकिली न नतघातलीला जुनी। घातली लाजूनी पायीं मिठी ।।११५।। सोडोनिया कोप सकळ वळलें। न कळवळलें कोणा अर्ती ।।११६।। ठेवुनी नंदक ध्वजाशीं बांधिलें। खावें जें रांधिलें जैसें स्वयें ।।११७।। भावाची सांगों मी काय काय शोभा ? नायका यशोभा यदूंच्याचि ।।११८।। स्वामींनीं दादाची दादाच्याचि दोषें। विटंबिली रोषें तनु जैशी ।।११९।। विटंबिती सेना भावोजीही कोपें। दोघांसही सोपे चरित्र हें ।।१२०।। मुक्त केला दादा भावोजींनी आंगें। थोरपण सांगे असें कोठें ? ।।१२१।। यांच्या भक्तिरसें भुलविला भर्ग। केले तुच्छ स्वर्गसुधाभोग ।।१२२।। ज्यासाठीं ब्रह्मादि सुर सदा दास। सुरस दादास रुचेना तो ।।१२३।। तेथेंचि राहिला न गेला कुंडिना। कोणी का धुंडीना, असा नाहीं ।।१२४।। माझा निववीला भावोजींनी खेद। यांच्या बोल वेद, भेद नाहीं ।।१२५।। श्रीमूर्ती श्रीगंगा या देहा ओहळा। स्वीकारी सोहळा पुरवाया ।।१२६।। द्रौपदीबाई ! हे माझी लग्नकथा।

स्वामी मनोरथा पुरविती' ॥१२७॥ नाशी कामक्रोधलोभपाप व्यथा। स्वयंवरकथा रुक्मिणीची ॥१२८॥ लावी धर्मन्याय भक्तिज्ञानपथा। स्वयंवरकथा रुक्मिणीची ॥१२९॥ भेटवी देऊनी प्रेम पक्षिरथा। स्वयंवरकथा रुक्मिणीची ॥१३०॥ मयूरासी वर्षा सज्जना हे तथा। स्वयंवरकथा रुक्मिणीची ॥१३१॥

॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥ रुक्मिणीहरणगीत समाप्त॥

For Hariom Astrologers

Proprietor














अमोल प्रकाशन
१३२४, सदाशिव पेठ, भरतनाट्य मंदिराजवळ, पुणे ४११ ०३०.
फोन : २४४३३९९०, २४४३३९९१

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers

hariom astrologers

hariom_astrologers

hariomastrologers@gmail.com

www.hariomastrologers.com